सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १५ डिसेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक १९ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



# महाराष्ट्राचा विकास आता थांबणार नाही : मुख्यमंत्री फडणवीस

### राज्याच्या रचनात्मक कार्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन

### हिवाळी अधिवेशनाचे वाजले सूप


**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**नागपूर, दि. १४ डिसेंबर -**

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था देशातील सर्वाधिक सक्षम आणि स्थिर असून, सर्व आर्थिक निकषांवर राज्य पात्र ठरत आहे. कर्ज, राजकोषीय तूट, गुंतवणूक, रोजगारनिर्मिती, सिंचन, वीज, दळणवळण, कायदा-सुव्यवस्थेच्या क्षेत्रात राज्याने भरीव काम केले आहे, असे सांगतानाच विदर्भाचा विकास वेगाने होईल, त्याचबरोबर सूर्य चंद्र असेपर्यंत महाराष्ट्रापासून मुंबई कोणीही तोडू शकणार नाही. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी ठणकावून सांगितले.

हिवाळी अधिवेशनात विधानसभेत नियम २९३ अन्वये मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी जवळपास २ तास भाषण करीत सर्वबाबींची सविस्तर आढावा मांडला.

दरम्यान, हिवाळी अधिवेशनाचे सुप वाजले असून पुढील वर्षाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी पासून मुंबईत होणार आहे .

फडणवीस म्हणाले,, नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर आलेल्या विविध आव्हानांना सामोरे जात निर्णयक्षम आणि समन्वयातून कारभार सुरु आहे. आता या सर्व गोष्टी मागे टाकून महाराष्ट्र पुढे नेण्याचा प्रयत्न राज्य शासन करत आहे. अमृत महोत्सवी महाराष्ट्र घडवण्याच्या दिशेने वाटचाल करताना सभागृहातील सर्वांनी रचनात्मक कामातून राज्याच्या प्रगतीसाठी एकत्र यावे. अमृत महोत्सवाकडे वाटचाल करताना सकारात्मकता आणि विकासकेंद्रित दृष्टिकोन आवश्यक असल्याचे नमूद करत ''अब आगे बढ़ चुका हूँ मैं अब पग नहीं रुकने वाले,'' असे म्हणत विकासाच्या मार्गावर राज्याची वाटचाल थांबणार नसल्याचा निर्धार व्यक्त केला.



**शेतकऱ्यांसाठी भरघोस मदत**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांसाठी घोषित केलेल्या ३२ हजार कोटी रुपयांच्या पॅकेजपैकी १५ हजार ७ कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. रब्बी हंगामासाठी जाहीर केलेली १० हजार रुपयांची अतिरिक्त मदत ९१ लाख शेतकऱ्यांना मिळाली आहे. कापूस खरेदीमध्ये शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून सरासरी उत्पादकता १२७७ किलो प्रति हेक्टरवरून २,३६८ किलो प्रति हेक्टर करण्याचा निर्णय घेतला आहे. कर्जमाफीच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला असून, कर्जमाफीचा फायदा थेट शेतकऱ्यालाच व्हावा, बँकांना नव्हे, यासाठी समिती स्थापन केली आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर १ जुलैपर्यंत कर्जमाफीची योजना व धोरण निश्चित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विदर्भ आणि मराठवाड्यातील १३ लाख ८३ हजार हेक्टरचा सिंचन अनुशेष जवळपास संपुष्टात आला आहे, असे सांगून ते म्हणाले की, इंडिकेटर बॅकलॉग समितीने निश्चित केलेल्या या अनुशेषापैकी १३ लाख ३४ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यात आले असून, आता केवळ ४९ हजार हेक्टरचा अनुशेष शिल्लक आहे. हा अनुशेष प्रामुख्याने अकोला, बुलढाणा आणि हिंगोली या तीन जिल्ह्यांपुरता मर्यादित आहे. अकोल्यात उर्वरित १४,५३० हेक्टरच्या अनुशेषाच्या बदल्यात २०२६-२७ पर्यंत १९,३३५ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार असून, बुलढाण्यात २९ हजार हेक्टरच्या अनुशेषाविरुद्ध १ लाख ६८ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. विशेषतः झीगाव प्रकल्पासाठी यंदा २,३९९ कोटींची तरतूद करण्यात आली असून, या एका प्रकल्पामुळे बुलढाणा जिल्हा अनुशेषातून थेट अधिशेषात जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नागपूर-गोवा शक्तिपीठ द्रुतगती महामार्गामुळे प्रवासाची वेळ आठ तासांवर येणार असून या महामार्गामुळे मराठवाड्याचे चित्र पालटणार आहे. तसेच नवीन प्रस्तावित मुंबई-कल्याण-लातूर जन कल्याण द्रुतगती महामार्ग जाहीर करण्यात आला आहे. यामुळे लातूर ते मुंबई प्रवास केवळ ४.५ तासांवर येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

विधानसभेत गृह विभागावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी राज्यातील कायदा-सुव्यवस्थेची आकडेवारी सादर केली. ऑक्टोबर २०२४ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत पुण्यात गुन्ह्यांची घट झाल्याची माहिती दिली. नवीन फौजदारी कायदे लागू झाल्यानंतर दोषसिद्धीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढून ९६.२४ टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. डायल ११२ सेवेचा प्रतिसाद वेळ १५ मिनिटांवरून सुमारे ७.३७ मिनिटांपर्यंत कमी झाल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. महिला व बालकांवरील गुन्ह्यांबाबत बोलताना तक्रारींच्या नोंदीचे प्रमाण ९९ टक्क्यांहून अधिक असल्याचे सांगून महिलांवरील गुन्ह्यांमध्ये ६० दिवसांत चार्जशीट दाखल करण्याचा दर ऑक्टोबर २०२५ पर्यंत ८७.८ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

'ऑपरेशन मुस्कान' आणि 'ऑपरेशन शोध'च्या माध्यमातून हजारो हरवलेल्या महिला व बालकांचा शोध घेण्यात आले आहे. अपहरणाच्या नोंद झालेल्या प्रकरणांपैकी राज्यात सुमारे ८६ टक्के व्यक्ती एका वर्षात सापडतात, तर मुंबईत हा दर ९९ टक्क्यांपर्यंत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. सायबर गुन्हे, अमली पदार्थ आणि संघटित गुन्हेगारीविरोधातही कारवाई तीव्र केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. 'महासायबर'च्या माध्यमातून सायबर फसवणूक, फेक कॉल सेंटर्स आणि डिजिटल अरेस्टसारख्या गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यात येत असून महासायबर हे देशातील सर्वात आधुनिक सायबर हेडक्वार्टर ठरले आहे. अनेक राज्यांनी आणि दोन देशांनी सहकार्यासाठी विनंती केली आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. अमली पदार्थांविरोधात झिरो टॉलरन्स धोरण राबवले जात असून, पेडलर्सवर मोका व एमपीडीए अंतर्गत कठोर कारवाई केली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गेल्या दहा वर्षांत ८८ हजारांहून अधिक पोलिस भरती झाल्याची माहिती देत, गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाई सुरूच राहील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

### विदर्भ व मराठवाड्यात गुंतवणुकीचा ओघ

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विदर्भात इलेक्ट्रॉनिक्स, संरक्षण, स्टील आणि कोल गॅसिफिकेशनमध्ये मोठी गुंतवणूक येत आहे. मराठवाडा 'ईव्ही कॅपिटल' म्हणून विकसित होत आहे, ज्यात टोयोटा, स्कोडा, एथर यांसारख्या मोठ्या ब्रँड्सची गुंतवणूक झाली आहे. मिहानमध्ये ३१ कंपन्या कार्यरत असून नवीन २२ कंपन्या सुरू होत आहे. यातून १ लाख २७ हजार लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे. अमरावती विमानतळावर एशियातील सर्वात मोठी हवाई प्रशिक्षण संस्था सुरू होत असल्याचे त्यांनी सांगितले. गडचिरोली जिल्हा हा एक गुंतवणुकीचा नवीन मॅग्नेट तयार झालेला आहे. सर्वाधिक गुंतवणूक आता गडचिरोलीमध्ये येत आहे. अवकाश आणि संरक्षण साहित्य निर्मिती क्षेत्रामध्ये विदर्भामध्ये २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आली आहे. त्यातून दहा ते पंधरा हजार रोजगार होणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि निर्मिती, सेमीकंडक्टर, सोलर पॅनल आणि मॉड्यूल याच्यामध्ये १,५५,००० कोटी रुपयांची गुंतवणूक आलेली आहे. त्यातून ६५ हजार प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे. कोल गॅसिफिकेशनची सर्वात मोठी गुंतवणूक विदर्भात आली असून सोलरमध्येही विदर्भ प्रथम क्रमांकावर राहणार असल्याचा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. नागपूरमध्ये बीकेसीच्या धर्तीवर नवीन नागपूर (आयबीएफसी) ची निर्मिती केली जाईल, जिथे ५ लाखांपेक्षा जास्त रोजगार निर्मिती अपेक्षित असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मराठवाड्यात सुमारे ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आली आहे. त्यातून सुमारे ४० हजार रोजगार निर्मिती झाली आहे. याशिवाय महाराष्ट्राच्या पुणे, सातारा, कोल्हापूर या भागातही मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येत आहे. मिहानमध्ये आयटी क्षेत्रातील 'बिग सिक्स' पैकी सहाही कंपन्या कार्यरत असून, १ लाख २७ हजार २२५ लोकांना अप्रत्यक्ष रोजगार प्राप्त झाला आहे. 'महाभरती' उपक्रम सुरू करून तीन वर्षांमध्ये १ लाख २० हजार शासकीय नोकऱ्या दिल्या असून, पुढील दोन वर्षांत तेवढ्याच नोकऱ्या देण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

### ऊर्जा क्षेत्रात मोठे बदल

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यासाठी राज्य शासन २६ हजार ६८१ कोटी रुपये खर्च करत आहे. तसेच, एशियातील सर्वात मोठा १६,००० मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प महाराष्ट्रात सुरू आहे. यामुळे २०३० पर्यंत महाराष्ट्राची ५२ टक्के ऊर्जा हरित स्रोतांवर आधारित असेल. पीएम कुसुम योजनेत देशात स्थापित झालेल्या ११.९० लाख सौर पंपांपैकी ७ लाख ३८ हजार पंप एकट्या महाराष्ट्रात आहेत आणि एका महिन्यात ४५ हजार ९११ पंप लावून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे.

ग्रीड स्टॅबिलाईज करण्यासाठी आवश्यक असलेल्या पंप स्टोरेजच्या निर्मितीसाठी महाराष्ट्रात ७६,००० मेगावॅटचे करार झाले आहेत. पुढील सहा महिन्यांत १ लाख मेगावॅट क्षमता निर्मितीचे लक्ष्य आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### गुंतवणुकीत महाराष्ट्र आघाडीवर

महाराष्ट्र राज्याने उद्योग, गुंतवणूक, रोजगार निर्मिती, ऊर्जा, कृषी आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केली असून देशात सर्वांगीण विकासाचा आदर्श उभा केला आहे, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गुंतवणुकीच्या बाबतीत महाराष्ट्र खूप पुढे गेला असून, केवळ सामंजस्य करार नाही, तर त्यांची अंमलबजावणी होत आहे. दावोसमध्ये झालेल्या १७ लाख ५७ हजार ८०१ कोटी रुपयांच्या करारांपैकी ७५ टक्के करारांची अंमलबजावणी सुरू झाली आहे. विदेशी थेट गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात अव्वल असून, २०२४-२५ मध्ये विक्रमी १ लाख ६४ हजार ७७५ कोटी रुपयांची गुंतवणूक आली. देशाच्या एकूण गुंतवणुकीपैकी ३१ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे. २०२५-२६ मध्ये आतापर्यंत ९१,३३७ कोटी रुपये एवढी परकीय थेट गुंतवणूक महाराष्ट्रामध्ये आलेली आहे.

### मुंबई महाराष्ट्रातच राहील

मुंबईबाबत स्पष्ट भूमिका मांडताना फडणवीस यांनी सांगितले की, मुंबई महाराष्ट्राचीच होती, आहे आणि कायम राहील. संयुक्त महाराष्ट्र लढ्यात एकशे सहा हुतात्म्यांच्या बलिदानातून महाराष्ट्र घडला असून यासंदर्भात कुठलाही संभ्रम ठेवण्याची आवश्यकता नाही. छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवलेल्या मार्गावर, संविधानाच्या चौकटीत महाराष्ट्र चालत राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. सीबीएसईच्या नव्या अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या इतिहासाला २१ पानांचा सविस्तर समावेश करण्यात आल्याची माहिती देत त्यांनी केंद्र सरकारचे आभार मानले. महाराष्ट्रासाठी तयार करण्यात आलेल्या व्हिजन डॉक्युमेंटचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या विकासासाचा रोडमॅप तयार करताना २०३०, २०३५ आणि २०४७ असे तीन टप्पे निश्चित करण्यात आले आहेत. २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र घडवण्याचे उद्दिष्ट असून २०२९-३० दरम्यान देशातील पहिली ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था महाराष्ट्राची असेल, या दिशेने काम सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. राज्य शासनाच्या विविध योजनांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, 'लाडकी बहीण' योजना, शेतकऱ्यांसाठी मोफत वीज यांसह सर्व योजना सुरू असून त्या पुढील पाच वर्षेही सुरू राहतील, असे ठामपणे त्यांनी सांगितले. राज्याची आर्थिक स्थिती मजबूत असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, देशातील मोठ्या राज्यांचा विचार केल्यास आजही सर्व निकषांवर महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पात्र ठरते. राज्याच्या विकासासाठी कर्ज उभारणे आवश्यक असते आणि राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या २५ टक्क्यांपर्यंत कर्ज उभारण्याची परवानगी असताना, केवळ १८.८७ टक्के कर्ज घेतले आहे. राजकोषीय तूटही तीन टक्क्यांच्या आत राखण्यात यश आले असून, लाडकी बहीण योजना आणि शेतकऱ्यांना मदत देऊनही हे शक्य झाले. कॅगने घालून दिलेल्या तिन्ही आर्थिक अटी पूर्ण केल्या असून, केंद्र सरकारने घालून दिलेल्या निकषांपेक्षा जास्त भांडवली गुंतवणूक महाराष्ट्राने केली आहे.

---

# ग्रंथालयाच्या मागण्यां Aसंदर्भात मुख्यमंत्री

### सदाशिव बेडगे; मोर्चास शिवसेना उपनेत्या शुभांगी पाटील यांचा पाठिंबा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी नागपुरला झालेल्या मोर्चात सहभागी होण्यासाठी या ऐतिहासिक इतिहासचे साक्षीदार होण्यासाठी महाराष्ट्रातील ग्रंथालय कर्मचारी यांना दिलेल्या हाकेला ३००० पेक्षा जास्त संख्येने सहभागी झाले यासाठी परिषदेचे गंगाधर पोतंगले, विद्यासागर हणमंते, संतोष करमले, उमा पुदाले, निलेश क्षिरसागर मनोहर गायकवाड,केशव वनंजे, बालाजी कांगणे आदीने खूप परिश्रम घेतले. ग्रंथालय प्रलंबित मागण्या सोडविण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना निवेदन देण्यासाठी यशवंत स्टेडियम येथून विधान भवनवर मोर्चा काढण्यात आल्याचे श्री. बेडगे यांनी सांगितले. या मोर्चात नाशिक येथील ग्रंथालय चळवळीतील उदध्व ठाकरे शिवसेना उपनेत्या शुभांगी पाटील यांनी मोर्चात येऊन पाठिंबा देऊन सहभागी झाल्या यावेळी त्यांनी ग्रंथालय कर्मचारी यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी मागण्यासंदर्भात सकारात्मक आहेत त्याबाबत आपल्या शिष्टमंडळाला सोबत लवकरच बैठक आयोजित करण्यात येईल ४०% अनुदान वाढ, दर्जा बदल लवकरच आदेश काढण्यात येतील असे सांगितले असल्याचे श्री. बेडगे यांनी मोर्चातील उपस्थितांना सांगितले. यावेळी सुनिलदत्त पाटील, धोंडिराम जेवूरकर, नरसिंह मिसालोलू, राम चंद्र वग्गे, गिरीश मठपती, वैशाली दुरुगकर, महाराष्ट्रातून कर्मचारी महिला व बंधू उपस्थित होते.

# कुपोषणामुळे तीन वर्षात राज्यात साडेचौदा हजार बालकांचा मृत्यू

### टाळू वरील लोणी खाणाऱ्यांची चौकशी करा : रोहित पवार

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १४ डिसेंबर-**

कुपोषण निर्मूलनासाठी दरवर्षी कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च केला जात असताना गेल्या तीन राज्यात तब्बल साडे चौदा हजार बालमृत्यूकेवळ कुपोषणामुळे झाले आहेत, हे दुर्दैवी आणि लज्जास्पद असून टाळूवरील लोणी खाणाऱ्यावर कारवाई करण्याची धमक सरकार दाखवणार का?, असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आ. रोहित पवार यांनी विधानसभेत उपस्थित केला.



प्रश्नोत्तराच्या कालावधीत याबाबत बोलताना ते म्हणाले,' कुपोषण निर्मुलनावर राज्य सरकारचा दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च होऊनही यातून नेमकं कुणाचं पोषण होते? असा गंभीर प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे. सरकारने याची संपूर्ण वस्तूनिष्ठ चौकशी करून बालकांच्या टाळूवरचं लोणी वरपणाऱ्यांचे खरे चेहरे पुढं आणावेत, अशी मागणी देखील रोहित पवार यांनी कली आहे.

छापील उत्तर देण्यापलीकडे सरकारने काहीही केलेले नाहीयापूर्वी अनेक अधिवेशनात कुपोषणामुळं होणाऱ्या मृत्यूचा विषय मांडला, पण केवळ छापील उत्तर देण्यापलीकडं सरकारने काहीही केलं नाही. आतातरी सरकारने संवेदना दाखवाव्यात आणि जग पाहण्यापूर्वीच जगातून एक्झिट घेणाऱ्या बालकांचा जीव वाचवावा अशी मागणी केली. त्यावर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सादर केलेल्या लेखी उत्तरात महायुती सरकारच्या कार्यकाळात म्हणजे २०२२-२३ ते २०२४-२५ या ३ वर्षात राज्यात कुपोषणामुळे १४ हजार ५२६ बालमृत्यू झाल्याची कबुली दिली आहे. हे बालमृत्यू मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, अकोला आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये शून्य ते पाच वर्षे वयोगटातील मुलांचे आहेत. आबिटकर यांनी विधानसभेत उपस्थित झालेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात देण्यात आली आहे. कुपोषणामुळे होत असलेले बालमृत्यूं रोखण्यासाठी राज्य सरकार करोडो रुपये खर्च करुन विविध योजना राबवीत आहे.

# ई-पीक पाहणीतून सुटलेल्या शेतकऱ्यांसाठी 'ऑफलाईन'चा पर्याय

### महसूल मंत्री बावनकुळे यांच्या घोषणेने शेतकऱ्यांत समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

ई-पीक पाहणीसाठी शेतकऱ्यांना तीन वेळा मुदतवाढ देऊनही अनेक शेतकरी तांत्रिक अडचणी वा इतर कारणांमुळे नोंदणी करू शकलेले नाहीत. त्यांच्यासाठी आता सरकारने दिलासा देत ऑफलाईन नोंदणी करण्यासाठी १५ जानेवारीपर्यंत मुदत दिली आहे. यामुळे शेतकरी बांधवांत समाधानाचे वातावरण पसरले आहे. 'ई-पीक पाहणी' ची ऑनलाईन मुदत संपल्याने हजारो शेतकरी शासकीय खरेदी केंद्रावर आपला माल विकण्यापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली होती. आता या शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत राज्य सरकारने आता 'ऑफलाईन' पीक पाहणीची संधी उपलब्ध करून दिली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतीच विधानसभेत यासंदर्भात घोषणा केली. ज्या शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी राहून गेली आहे, त्यांना आता १५ जानेवारीपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांकडे ऑफलाईन अर्ज करता येणार आहे.

---

# आमदार देवेंद्र कोठेंची नागपूरच्या अधिवेशनात जोरदार बॅटिंग

## आयटी पार्क, उड्डाणपूल, बी टू जमिनी, डीपी रोड, गो-तस्करी आदी मुद्दयांवर अभ्यासपूर्ण मांडणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात शनिवारी अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना सोलापूर शहर विकासाच्या प्रश्नांवर आमदार देवेंद्र कोठे यांनी शनिवारी जोरदार 'बॅटिंग' केली. आयटी पार्क, उड्डाणपूल, बी टू जमिनी, डीपी रोड, गो-तस्करी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आदी विषयांवर अभ्यासपूर्ण मांडणी करत शासनाचे लक्ष वेधले.

या अधिवेशनात आमदार कोठे म्हणाले, सोलापूरच्या विमानसेवेचा रखडलेला प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे सोडविला गेला. विमानसेवेमुळे सोलापूर जगाच्या नकाशावर आल्यामुळे सोलापूरचा विकास होण्यास प्रारंभ झाला आहे. सोलापूरला आयटी पार्क मंजूर झाल्यामुळे सोलापूरच्या विकासाची पोकळी भरून निघणार आहे.

सोलापुरातील अनेक चाळींवर चुकीच्या पद्धतीने बी टू लावण्यात आलेला आहे. ब्रिटिश काळापासून अस्तित्वात असलेल्या १००-१५० वर्षांपूर्वी तयार झालेल्या १४ मोठ्या चाळींचा पुनर्विकास होणे गरजेचे आहे. या चाळींमधून १० हजार नागरिक राहतात. हजारो कामगारांच्या घरांचा प्रश्न असल्यामुळे आणि याकरिता सरकारकडे कोणत्याही निधीची मागणी नसल्यामुळे या चाळींच्या पुनर्विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालून ही समस्या सोडवावी, अशी मागणीही आमदार देवेंद्र कोठे यांनी अधिवेशनात केली.



केंद्र सरकारच्या काही जागा ताब्यात न आल्यामुळे गेल्या १० वर्षांपूर्वी सोलापूर शहरासाठी मंजूर झालेल्या २ उड्डाणपूलांच्या कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. केंद्र सरकारच्या जागेचे भूसंपादन होण्यासाठी महाराष्ट्र सरकारने पुढाकार घ्यावा आणि लवकरात लवकर उड्डाणपूलांचे काम सुरू करावे, अशी मागणीही आमदार कोठे यांनी केली.

१९६६ साली सोलापूरला मंजूर झालेले शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अद्याप सोलापूरला मिळालेले नाही. तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोलापूरला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मंजूर केले आहे. सध्या सुरू असलेल्या शासकीय तंत्रनिकेतनच्या ३४ एकर जागेचा आणि उपलब्ध इमारतींचा उपयोग करून २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सोलापूरात सुरु व्हावे. क वर्ग आणि ड वर्ग महानगरपालिकाच्या हद्दी मध्ये डीपी रोड, रिंग रोड करण्यासाठी निधी उपलब्ध नसल्याच्या नियमाचा फटका सोलापूरला बसत आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने डीपी रोड करण्यासाठी विशेष योजना आखावी आणि या माध्यमातून १२ मीटरपेक्षा जास्त मोठ्या रस्त्यांचा विकास करावा, अशी मागणीही आमदार देवेंद्र कोठे यांनी केली. शासनातर्फे सोलापूरला मंजूर झालेल्या १०० इलेक्ट्रिकल बस प्राधान्यक्रमाने सोलापूरला मिळाव्यात, असेही आमदार देवेंद्र कोठे याप्रसंगी म्हणाले. दरम्यान, हिवाळी अधिवेशनात सोलापूर शहराच्या विकासाचे प्रश्न मांडण्यासाठी आमदार देवेंद्र कोठे हे शनिवारी रात्री १०.३० पर्यंत ठाण मांडून बसले होते. रात्री उशिरा आमदार देवेंद्र कोठे यांनी विविध मुद्दे मांडत सोलापूरकरांच्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले.

### गो-तस्करांची गाडी स्क्रॅप करण्याची मागणी

सोलापूर शहरात मोठ्या प्रमाणावर गो-तस्करी होत आहे. ज्या गाडीतून गो तस्करी केल्याबद्दल संबंधित गाडीला दंड लावण्यात आला आहे, अशा गाडीतून पुन्हा एकदा गो तस्करी झाल्यास ती गाडी शासनाने स्क्रॅप करावी, अशी मागणीही आमदार कोठे यांनी केली.

### कर्तव्यदक्षतेबद्दल मानले पालकमंत्र्यांचे आभार

सीना नदीला गेल्या ७० वर्षांमध्ये यंदा प्रथमच मोठा पूर आला. त्यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पुढाकार घेऊन शेतकरी आणि नागरिकांना शासनाच्या माध्यमातून मोठी मदत केली आहे. त्याबद्दल सोलापूरकरांतर्फे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आमदार देवेंद्र कोठे यांनी आभार मानले.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणजे 'इन्फ्रामॅन'

आमदार देवेंद्र कोठे यांनी आपल्या भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख 'इन्फ्रामॅन' असा केला. शिक्षण, उद्योग, रोजगार आदी सर्वच क्षेत्रात राज्य सरकार चांगले काम करत आहे. अक्कलकोट रस्ता औद्योगिक वसाहतीत पूर्वीच्या आमदारांनी कोणत्याही सुविधा उपलब्ध करून दिल्या नाहीत. परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या औद्योगिक वसाहतीसाठी ५६ कोटींच्या रस्त्यांना मंजुरी दिली आहे. सरकार राज्यभर करत असलेल्या कामाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संपूर्ण मंत्रिमंडळाचे आमदार देवेंद्र कोठे यांनी अभिनंदन करत आभार मानले.

CMYK

सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोमवार, १५ डिसेंबर २०२५

# मावळत्या सुर्याच्या साक्षीने ऐतिहासिक रेल्वे पूलाचा अस्त

## नव्या पुलाचेही आयुर्मान राहणार १०० वर्षे

**तभा वृत्तसेवा । मकरंद ढोबळे**
**सोलापूर, दि.१४ डिसेंबर-**

ब्रिटीशकाळात म्हणजे सन १९२२ साली सोलापूर यार्डमधील रेल्वे किमी ५४४/४-५ या मार्गावरील दमाणी नगर येथे रेल्वे ओव्हर ब्रिज अर्थात पूल बांधण्यात आला होता. दमाणी नगरासह परिसरातील लोकवस्त्यांना सोलापूर शहराशी जोडणारा हा पूल रविवार, १४ डिसेंबर २०२५ रोजी सोलापूरकरांचा निरोप घेतला. सकाळी ८.३० ते १०.३० यावेळेत रेल्वे इलेक्ट्रिक लाईन खाली आणले गेले. १०.३० वाजल्यापासून पुलावरील चुना, वाळूचे बांधकाम तोडण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली होती. पुलाच्या खाली असलेले २० गर्डर क्रेनच्या साह्याने पाच टप्प्यांत काढले गेले. मावळल्या सुर्याच्या साक्षीने म्हणजे, रविवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास हा पूल पूर्णपणे पाडण्यात आला. दरम्यान, नव्याने बांधण्यात येत असलेल्या येथील पूलाचे आयुर्मान १०० वर्षाचे राहणार असून पन्नास वर्षानंतर किरकोळ दुरुस्ती करावी लागणार असल्याचे सांगण्यात आले.



विघटनादरम्यान जमिनीवरील वायर्स ट्रॅक पॉइंट्स आणि यंत्रसामग्रीचे संरक्षण करण्यासाठी प्लायवूड, सीट्स, स्टील प्लेट्स, लोखंडी ब्लॉग्स तसेच वाळूने भरलेले एचडीपी पिशव्या वापरण्यात आल्या. हेवी ड्युटी ब्रेकर एक्सकेटर आणि गॅस कटरच्या साह्याने गर्डर कापले गेले.

प्रत्येक टप्प्यात दोन गर्डर उचलले गेले. भय्या चौक व मरिआई चौकाच्या दोन्ही टोकांवर प्रत्येकी एक २०० मेट्रिक टन क्रेन कार्यरत तर मरीआई चौकाच्या टोकावर तिसरी क्रेन स्टॅन्ड बाय ठेवण्यात आली. या संपूर्ण मोहिमेसाठी सुमारे ८० ते १०० कामगार प्रत्यक्ष घटनास्थळी कार्यरत होते. ओएचइ कमी करणे व पुनर्सचयित करण्यासाठी टीआरडीच्या देखरेखीखाली ७० ते ८० कामगार तैनात होते. याशिवाय क्रेन ऑपरेटर, वाहनचालक, रेल्वे अभियंते, एनएचएआईचे पर्यवेक्षण कर्मचारीही सज्ज होते. दरम्यान, सकाळच्या सत्रात तीन रेल्वेगाड्या मार्गस्थ झाल्या. विघटन प्रक्रिया पूर्ण होताच या मार्गावरील रेल्वेसेवा पूर्ववत करण्यात आली.

**(अधिक वृत्त पान ५ व ८ वर...)**

## विचारपुष्प



'स्वस्थ'मध्ये दोन शब्द आहेत. 'स्व' आणि 'स्थ'. 'स्थ'चा अर्थ जेथे आपण आहोत तेथेच स्थिर राहणे. दोन सैन्यामधील युद्ध थांबविण्याकरिता जो त्रयस्थ मध्ये येतो त्याला मध्यस्थ म्हणतात. तसेच डोक्यावर एखादी वस्तू अथवा टोपी असेल तर तिला मूर्धस्था म्हटले जाते. म्हणजेच जो स्वत:मध्ये स्थित आहे तो 'स्वस्थ'.

**- रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी सकाळी रेशीमबाग येथील स्मृतिमंदिरात जाऊन स्मृतिस्थळाचे दर्शन घेतले. देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत आ. चैनसुख संचेती आणि राज्यमंत्री आशिष जयस्वाल, तर एकनाथ शिंदे यांच्यासोबत नीलम गोऱ्हे उपस्थित होत्या (छाया : अनंत मुळे)

# मुख्यमंत्र्यांसह भाजपा, सेनेच्या मंत्री,आमदारांचे आरएसएसच्या मुख्यालयाला अभिवादन

### अजित पवारांच्या आमदारांची यंदाही पाठ!

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**नागपूर, दि. १४ डिसेंबर:**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजपा व शिवसेना शिंदे गटाचे मंत्री, आमदारांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयाला रविवारी सकाळी भेट दिली.सरसंघचालकांच्या समाधीचे दर्शन घेऊन अभिवादन केले. दरवर्षीच्या प्रथा परंपरेनेनुसार, विधिमंडळच्या हिवाळी अधिवेशनासाठी नागपूर शहरात येणारे भाजपा आणि शिवसेनचे आमदार, मंत्री, मुख्यमंत्री आणि पदाधिकारी आवर्जुन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) डॉ. हेडगेवार स्मृती मंदिर दर्शन व संघाचे बौद्धिक ज्ञान प्राप्त करतात. यंदा मात्र बौद्धिक सत्र भरवण्यात आले नाही.


आज रेशीमबागच्या स्मृती मंदिरात गेल्यानंतर सर्वांनी सरसंघचालकांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे समाधीस्थळी नतमस्तक झाले. सर्व नेत्यांनी सरसंघचालकांच्या समाधीचं दर्शन घेतले. त्यानंतर महर्षी व्यास सभागृहाच्या खाली तळमजल्यात असलेल्या हॉलमध्ये सर्वांचा चहापान कार्यक्रम झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे या दोघांनी एकत्रित कॉफी घेतली. कॉफी घेतल्यानंतर दोघंही सोबतच बाहेर आले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंदुत्ववादी विचारधारेवर आधारित संघटना आहे, तर शिवसेनाही प्रखर हिंदुत्वाचा विचार मांडणारा पक्ष असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मुंबईत अनेकदा संघाच्या शाखेत हजेरी लावून त्यानंतर शिवसेनेच्या शाखेत सहभागी होणारे अनेक शिवसैनिक असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यामुळं गेल्या शंभर वर्षांत संघानं केलेलं कार्य समजून घेण्यासाठी जगभरातून लोक रेशीमबाग स्मृतीभवन इथे येत असतात. आमदार, मंत्री आणि विविध क्षेत्रातील व्यक्ती राजकारणाची आणि संघाच्या कार्यपद्धतीची माहिती घेण्यासाठी येतात, अशी माहिती भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

संघाच्या स्मृती भवन परिसरात येण्याचा आनंद काही वेगळाच आहे. महायुती सरकारमधील आमदार येऊन संघाचा विचार घेऊन जातात. असे विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.

## विनम्र अभिवादन



लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज पुण्यतिथी




# १ जुलैपर्यंत कर्जमाफीची योजना, धोरणनिश्चिती

## विधानसभेत मुख्यमंत्र्यांची घोषणा

◆ **नागपूर, १४ डिसेंबर**

विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांसाठी घोषित केलेल्या ३२ हजार कोटी रुपयांच्या पॅकेजपैकी १५ हजार ७ कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. रब्बी हंगामासाठी जाहीर केलेली १० हजार रुपयांची अतिरिक्त मदत ९१ लाख शेतकऱ्यांना मिळाली आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला असून, कर्जमाफीचा फायदा बँकांना न होता थेट शेतकऱ्यालाच व्हावा, यासाठी समिती स्थापन केली आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर १ जुलैपर्यंत कर्जमाफीची योजना व धोरण निश्चित करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, कर्जमाफीसाठी ३२ हजार कोटींचे पॅकेज घोषित केले होते. त्यात दहा हजार कोटी रुपये इन्फ्रास्ट्रक्चरचे होते. दोन हजार कोटी नरेगातून देणार होतो व बाकी सगळी थेट मदत होती. या पॅकेजमध्ये तीन हेक्टरची मर्यादा ठेवली होती. तीन हेक्टरच्या एनडीआरएफच्या मर्यादेत पैसे दिल्यानंतरदेखील आपण रब्बीच्या हंगामाकरता दहा हजार रुपये अतिरिक्त हेक्टरी देण्याचा निर्णय घेतला होता. पशुपालकांना पशुधनहानीसाठी पैसे द्यायचे कबूल केले होते. त्याचे आपण सर्व पैसे दिले आहेत. २७ हजार विहिरींच्या दुरुस्तीकरिता ८० कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत.

सार्वजनिक उपयुक्त सुविधा, विद्युत कामे, रस्ते, इमारती, लघु व मध्यम तलाव व दुरुस्तीपूर्ण बांधणी या संदर्भातील कामांनादेखील आपण पैसा उपलब्ध करून दिला आहे. काही कामांसाठी सांगितले आहे की, पुढच्या बजेटमध्ये निधी उपलब्ध करून देण्यात येईल. शेती पिकाच्या नुकसानीसाठी जे पैसे दिले होते आणि बी-बियाणांकरिता पैसे दिले होते, त्या संदर्भात दोन जीआर काढले होते. पहिला जीआर १० हजार पाचशे १६ कोटींचा, दुसरा जीआर ९ हजार ६११ कोटींचा होता. यापैकी १५ हजार ७ कोटी रुपयांची थेट मदत शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष खात्यात गेलेली आहे, असेही फडणवीस म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, इथे आरोप करण्यात आला की, दहा हजार रुपयांची घोषणा करण्यात आली. पण, ते गेले नाहीत. दहा हजार रुपये ९१ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात पाठविण्यात आले आहेत. राज्यात कापूस खरेदीसंदर्भातही प्रश्न निर्माण झाला होता. विशेषतः यावर्षी सीसीआयने पहिल्यांदाच उत्पादकतेवर आधारित कापूस खरेदी करण्याचा निर्णय घेतला. काही ठिकाणी सरासरी उत्पादकता बाराशे क्विंटलची आल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत होते. त्या संदर्भात आपण केंद्र सरकारला विनंती केली. केंद्र सरकारशी चर्चा करून हा निर्णय केला की, उत्पादकता पकडत असताना उत्पादकतेतले पहिले तीन जिल्हे आहेत, त्यातील सर्वाधिक उत्पादकता जी आहे त्यालाच ग्राह्य धरावे. त्या संदर्भातील निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. १२७७ किलो प्रति हेक्टर सरासरी उत्पादकतेच्या ऐवजी २,३६८ किलो प्रति हेक्टर पद्धतीने आपण निर्णय घेतला आहे. यामुळे कुठल्याही शेतकऱ्यांचा कापूस परत जाणार नाही. (तभा वृत्तसेवा)

## विधानसभेचे हिवाळी अधिवेशन संस्थगित

**● पुढचे अधिवेशन २३ फेब्रुवारीला मुंबईत ● ७ दिवसांत १० मिनिटे वाया**

**नागपुरात ८ डिसेंबरपासून सुरू झालेले हिवाळी अधिवेशन रविवारी संस्थगित झाले. पुढील अधिवेशन २३ फेब्रुवारीला मुंबईत घेण्याची शिफारस राज्यापालांकडे करण्यात आली आहे.**

**विधिमंडळाच्या सात दिवसांच्या कालावधीत ७२ तास ३५ मिनिटे कामकाज झाले. अन्य कारणांमुळे अवघी १० मिनिटे वेळ वाया गेला. रोज १० तास २२ मिनिटे सरासरी कामकाज झाले.**

### मिहान हे देशातील आयटीमधील 'बिग सिक्स'

मिहान हे देशातील आयटीमधील 'बिग सिक्स' आहे. या माध्यमातून प्रत्यक्ष १ लाख २५ हजार लोकांना रोजगार मिळाला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली. शेतकऱ्यांपासून ते तरुणांपर्यंत व राज्यातील गुंतवणुकीपासून ते लाडक्या बहिणींपर्यंत अनेक गोष्टींचा उल्लेख करत फडणवीसांनी वेगवेगळ्या विषयांची आकडेवारी मांडली. यावेळेस फडणवीसांनी सरकारी नोकऱ्यांचा उल्लेख करीत महाभरतीची घोषणा केली आहे.

### इतिहासातील सर्वांत मोठी भरती

राज्यात सरकारी नोकरभरती मोठ्या प्रमाणात केली जाणार असल्याचे फडणवीसांनी जाहीर केले. 'महाराष्ट्रात महाभरती सुरू केली. या तीन वर्षांत १ लाख २० हजार सरासरी नोकरी दिल्या आहेत. पुढील दोन वर्षांत तेवढ्याच देणार आहोत. इतिहासातील सर्वांत मोठी भरती असेल, असे फडणवीस म्हणाले. म्हणजेच पुढील दोन वर्षांमध्ये जवळपास सव्वा लाख लोकांना सरकारी नोकरीत सामावून घेणार असल्याचे फडणवीसांनी स्पष्ट केले आहे.

## महत्त्वाचे

### एसबीआयकडून एफडी व्याजदरात कपात

**नवी दिल्ली :** भारतीय स्टेट बँकेने मुदत ठेवींच्या (एफडी) व्याजदरात कपात केली आहे. एसबीआयने आपल्या अमृत वृष्टी या विशेष मुदत ठेव योजनेच्या व्याजदरात ०.१५ टक्क्यांची कपात केली आहे. आता अमृत वृष्टी योजनेअंतर्गत ४४४ दिवसांसाठी केल्यास वार्षिक ६.४५ टक्के व्याज मिळेल. ज्येष्ठ नागरिकांना वार्षिक ६.९५ टक्के दराने व्याज मिळेल. याव्यतिरिक्त बँकेने २ वर्षांपासून ते ३ वर्षांपेक्षा कमी कालावधीच्या एफडीमध्ये ०.०५ टक्क्यांची कपात केली आहे. आता यावर ६.४५ टक्क्यांऐवजी ६.४० टक्के व्याज मिळेल. नवीन व्याजदर १५ डिसेंबरपासून लागू होतील.

### बायजूसनंतर दुसऱ्या एडटेक कंपनीचे पतन

**बंगळुरू :** एडटेक कंपनी अनॲकेडमी आता विलीनीकरण आणि अधिग्रहणाचे (मर्जर आणि ॲक्विझिशन) पर्याय शोधत आहे. कंपनीचे सह-संस्थापक गौरव मुंजाल यांनी सांगितले आहे की, ते कंपनी विकण्याची तयारी करीत आहेत. अनॲकेडमीची सुरुवात एका युट्यूब चॅनलवरून झाली होती. २०१५ मध्ये त्याचे प्लॅटफॉर्म लॉन्च झाले होते. २०२१ मध्ये त्याचे मूल्यांकन २९,०५० कोटी रुपये होते.

# नितीन नबीन भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष

### बिहारमधील युवानेते

◆ **नवी दिल्ली, १४ डिसेंबर**

बिहारमधील भाजपाचे युवानेते, नितीशकुमार मंत्रिमंडळातील सार्वजनिक बांधकाम मंत्री नितीन नबीन यांची भाजपाचे नवे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून रविवारी नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीमुळे भाजपाचा नवा राष्ट्रीय अध्यक्ष कोण ही चर्चा संपली आहे.



भाजपाचे नवे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून भाजपा सांसदीय मंडळाने आज नितीन नबीन यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथसिंह, भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे विद्यमान राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्यासह अनेक मान्यवरांनी या नव्या जबाबदारीसाठी नितीन नबीन यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला.

भाजपाचा नवा राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार अशी चर्चा सुरू असताना भाजपाने नितीन नबीन यांच्या रूपात पुन्हा एकदा सर्वांना धक्का दिला आहे. नितीन नबीन यांची भाजपाचे नवे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्यामुळे ते पक्षाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष असतील, हे निश्चित झाले आहे.

४५ वर्षीय नितीन नबीन भाजपाचे सर्वांत तरुण राष्ट्रीय अध्यक्ष ठरणार आहेत. याआधी अमित शाह ५० व्या वर्षी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. कायस्थ समाजाचे नितीन नबीन बिहारमधील भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार नवीन किशोर सिन्हा यांचे पुत्र आहेत. (तभा वृत्तसेवा)

### इन्स्टाग्रामवर नवीन एआय टूलची सुरुवात

**नवी दिल्ली :** टेक कंपनी मेटाने इंस्टाग्राममधील रील्स फीड अधिक पर्सनलाइज्ड करण्यासाठी नवीन युवर अल्गोरिदम हे फीचर लॉन्च केले आहे. हे सध्या अमेरिकेत लॉन्च करण्यात आले आहे, लवकरच इतर देशांमध्येही ते सुरू केले जाईल. भारतातही ते आणले जाणार आहे. नवीन फीचर वापरकर्त्यांना त्यांच्या रील्स फीडवर पूर्ण नियंत्रण देते. एआयच्या मदतीने वापरकर्ते पाहू शकतील इन्स्टाग्रामचा अल्गोरिदम त्यांच्यासाठी कोणते विषय निवडत आहे.

खरा आहे, आरोग्यासाठी चांगला आहे

बैद्यनाथ च्यवनप्राश स्पेशल




संपूर्ण कुटुंबासाठी आयुर कवच

पॉवर ऑफ 3

चांगली इम्यूनिटी | जास्त ऊर्जा | शक्ति आणि स्फूर्ती

च्यवन-फीट शुगरफ्री पण उपलब्ध

बैद्यनाथ च्यवनप्राश शुद्ध तुपात तयार केले जाते

सर्व मेडिकल स्टोर्स व आयुर्वेदिक औषधालयात मध्ये उपलब्ध. 844 844 4935

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# नेमेचि निलंबन, पण शून्य निष्पन्न

नागपुरात दरवर्षी होणाऱ्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात बाकी काही घडो अथवा न घडो, दोन-चार शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या निलंबनाची घोषणा मात्र ठरलेली. दोघा-चौघांचे निलंबन ठरलेले. सभागृहात एखाद्या विषयावर तावातावात चर्चा होते. अमक्या अधिकाऱ्याला निलंबित करा, तमक्याची बदली करा, याच्यावर कारवाई करा, त्याला दंडित करा, अशा मागण्या आमदारांकडून केल्या जातात. मंत्री उत्तर देताना निलंबनाची घोषणा करतात. जात पडताळणी ते अवैध वाळू उपसा इथपर्यंतच्या प्रकरणात अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना निलंबित केले जात असल्याची घोषणा सरकार करते. विषय संपतो. परंतु, निलंबित केलेल्या अधिकाऱ्याची खरोखर आणि व्यवस्थित चौकशी झाली काय, त्याने नेमके काय केले होते, त्याला पुन्हा सरकारी सेवेत घेतले गेले काय, याची माहिती पुढच्या अधिवेशनातही मिळत नाही. संबंधितांना निलंबित केल्याचे समाधान त्या विषयाची कळकळ असलेल्यांना मिळू शकते. सरकारलाही कर्तव्यपूर्तीचा आनंद मिळू शकतो. त्या पलीकडे या निलंबनातून फारसे हाती लागत नाही. वास्तवात निलंबन ही शिक्षा किंवा दंड नाही. ती फक्त तात्पुरती प्रशासकीय कारवाई असते. बहुतेक प्रकरणांत कोणतीच कारवाई होत नाही, असे जाणकार सांगतात. याचा अर्थ असा की, अधिवेशनाच्या काळातील निलंबनाच्या बहुतांशी घोषणा हा निव्वळ सोपस्कार असतो. ते तात्पुरते समाधान असते किंवा तणाव संपवण्यासाठीचा मार्ग म्हणून या कारवाईचा वापर होतो. निलंबनाचा मुख्य उद्देश संबंधित व्यक्तीचा त्या विषयाच्या चौकशीतील हस्तक्षेप टाळणे आणि गंभीर गैरव्यवहार झाल्यास पुढील तपास सुलभ करणे हा असतो. निलंबन हे कधीही अंतिम शिक्षा म्हणून गणले जात नाही. विभागीय किंवा तत्सम चौकशीनंतर शिक्षेचा किंवा दंडाचा निर्णय घेतला जातो. निलंबन काळात कर्मचाऱ्याचे पद कायम राहते आणि त्याला अर्धा पगारही मिळतो. सर्वसाधारण प्रक्रिया अशी आहे की, निलंबित अधिकारी किंवा कर्मचाऱ्याची निश्चित मुदतीत चौकशी व्हावी आणि त्यावरून शिक्षा निर्धारित केली जावी. समर्थनीय कारणास्तव चौकशीला मुदतवाढ मिळू शकते. परंतु, बहुतांशी प्रकरणांत मूळ आरोपातच दम नसल्याने किंवा निलंबनाच्या घोषणेनंतर चौकशी व्यवस्थित न झाल्याने सहा-आठ महिन्यांत निलंबनाचे कवित्व संपते. तो अधिकारी किंवा कर्मचारी मूळ पदावर, फारच फार तर बदलीच्या जागी रुजू होतो आणि सरकारी व्यवस्थेचे रहाटगाडगे जुन्याच पद्धतीने पुन्हा सुरू होते. वर्षानुवर्षे हे असेच चालत आले आहे. काही वेळा फार तर बढती किंवा वेतनवाढ रोखणे असे घडतेही. पण ते अपवादात्मक. एरवी सरकारी कर्मचाऱ्यांकडून सरकारी कर्मचाऱ्याला सांभाळून घेण्याची रीतच आहे. मग तो सनदी अधिकारी असो वा साधा कारकून. शासन असो वा प्रशासन, यांच्यात ही एकमेकांना सांभाळून घेण्याची ही जी रीत आहे, तेच आपल्या व्यवस्थेच्या प्रभावशून्यतेचे कारण आहे.

आतापर्यंतचा अनुभव असा दिसतो की, निलंबन ही प्रशासकीय कारवाई असली तरी त्यातून प्रशासनात कोणत्याही प्रकारचा दर्जात्मक बदल घडलेला नाही. अधिवेशनाच्या काळात सरकारवर जनतेचा, माध्यमांचा आणि विरोधकांचा दबाव असतो. एखादा विषय तापलेला असतो. तत्काळ कारवाईची मागणी होते. अशा वेळी निलंबन हा सरकारसाठी सर्वांत सोपा, स्वस्त आणि सुरक्षित पर्याय असतो. एखाद्याचा दोष सिद्ध न करता 'कठोर पाऊल उचलल्याचा' आभास सरकारला निर्माण करता येतो. यात ना न्यायालयाचा धोका, ना प्रशासकीय यंत्रणेशी थेट टक्कर. मंत्री महोदयांच्या एका घोषणेत विषय संपुष्टात येतो. ''संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत,'' अशी घोषणा झाल्याबरोबर टाळ्या पडतात. विरोधक शांत होतात, माध्यमांना मथळा मिळतो आणि प्रशासन मोकळा श्वास घेते. वास्तवात हे सगळे केवळ अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या नैतिक अध:पतनामुळे घडते का?...की या अवस्थेसाठी अन्य कारणेही आहेत? अवैध वाळू उपसा, बोगस जात प्रमाणपत्रे, बनावट दिव्यांग दाखले, भ्रष्ट भरती प्रक्रिया, जमिनीचे फेरफार, अनधिकृत बांधकामे ही सगळी प्रकरणे अचानक उद्भवलेली नसतात. ती वर्षानुवर्षे चालू असतात. सामान्य माणसांचे हाल सुरूच असतात. संबंधित अधिकारी बदलत असतात, पण पद्धत बदलत नाही. कारण यातील दोष हा वैयक्तिक नसून संरचनात्मक स्वरूपाचा आहे. व्यवस्थाच तशी झालेली आहे. आज निलंबित झालेला अधिकारी कालपर्यंत ''काम करणारा'', ''फायली वेळेवर काढणारा'', ''व्यवहारकुशल'' म्हणून ओळखला जात असतो. उद्या तो पुन्हा सेवेत येतो आणि पुन्हा तीच व्यवस्था पुढे चालवतो. एक काळ असा होता की, जास्तीत जास्त वेळा ज्याला निलंबनाच्या कारवायांना सामोरे जावे लागले असेल, तोच कर्मचाऱ्यांच्या संघटनेचा नेता होण्यास पात्र ठरायचा. असे कर्मचारी इतरांचे रोल मॉडेल्स ठरायचे. कारण निलंबनाच्या कारवाईतून अंतिम निष्पन्न बहुतेकदा शून्यच येते, याचा अनुभव प्रशासनातील किंवा नोकरशाहीतील मंडळींनी वर्षानुवर्षे घेतलेला आहे. निलंबनानंतरची आरोपांची चौकशी ही संपूर्ण प्रक्रियेतील सर्वांत दुबळी बाब असते. त्यात पुरेसे गांभीर्य नसते आणि हेतू स्वच्छ असेल असेही नाही. चौकशी अधिकारी बहुतेकदा त्याच विभागातील असतात. अनेकदा त्याच कॅडरमधील किंवा भविष्यात ज्यांच्यासोबत काम करायचे आहे असे असतात. ''आज मी तुझी चौकशी करतो, उद्या तू माझी करशील कदाचित,'' असा सारा प्रकार असतो. त्यामुळेच मग एकमेकांना सांभाळून घेण्याचा कार्यक्रम सुरू असतो. अखेरीस, अपेक्षेप्रमाणे, असा निष्कर्ष निघतो की ''आरोप पूर्णपणे सिद्ध होत नाहीत'' किंवा ''तांत्रिक कारणांमुळे कारवाई शक्य नाही.'' हा निर्णय कुणासाठीही धक्कादायक नसतो. तो साऱ्यांसाठी अपेक्षित असतो. साऱ्यांनीच अशा निलंबन कारवायांचे फलित गृहीत धरलेले असते. त्यामुळे व्यक्ती निलंबित झाली तरी व्यवस्थेत फारसा बदल होत नाही. यातले वास्तव एकदा तरी तपासले गेले पाहिजे. त्यासाठी गेल्या दशकभरातील अधिवेशनांमध्ये झालेल्या निलंबनांचे आकडे काढून पाहा. किती अधिकाऱ्यांना निलंबित केले गेले, किती जणांची चौकशी पूर्ण झाली, किती जण दोषी ठरले, किती जणांना शिक्षा झाली आणि किती जण पुन्हा सेवेत आले, याची माहिती संकलित केली तर धक्के बसतील. प्रशासन सुधारण्यासाठी दोन गोष्टी अत्यंत आवश्यक असतात. त्यातील पहिली असते संबंधित कर्मचारी किंवा अधिकाऱ्याची निश्चित जबाबदारी आणि ती न निभावल्यास केल्या जाणाऱ्या शिक्षेची भीती. आपल्या व्यवस्थेत सध्या दोन्हींचा अभाव आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांना हे चांगलेच कळते की, काहीही झाले तरी फार-फार तर निलंबन होईल. बदली होईल. काही काळ शांत बसावे लागेल. पण नोकरी जाणार नाही. पेन्शन धोक्यात येणार नाही. समाजात मानहानी होईल, पण ती तात्पुरती असेल. शिक्षेची भीतीच नसते, तेव्हा नियम पाळण्याची प्रेरणाच संपुष्टात येत असते. आपल्या प्रशासकीय व्यवस्थेचे तसेच झाले आहे. त्यामुळे अशी कितीही निलंबने झाली तरी व्यवस्था बदलण्याची शक्यता नाही. आपण साऱ्यांनी हे समजून घ्यायला हवे की, निलंबन हा आपल्या प्रशासकीय व्यवस्थेत निर्माण झालेल्या दोषांवरील उपचार नाही. ते फक्त तात्पुरते वेदनाशामक आहे. तो तात्पुरता दिलासा आहे. प्रश्न निलंबन किती जणांचे झाले याचा नाहीच. किती जणांवर खरोखर कारवाई झाली, त्यातून किती जण सुधारले आणि किती विषय खरोखर निकाली निघाले हा खरा प्रश्न आहे. आज आपण देश प्रगतिपथावर आहे, असे उच्चरवात म्हणतो. जगातील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये भारताचे नाव समाविष्ट झाले आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था देशात सर्वाधिक वेगाने वाढत असल्याचेही सांगितले जाते. मात्र, या प्रगतीच्या उंचावत असलेल्या आलेखाला पाठबळ देण्याची जबाबदारी असलेली लोकनियुक्त मंडळी आणि प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी यांच्यात उत्तरदायित्वाच्या संस्कृतीचा अभाव आहे. निलंबनात समाधान मानण्याऐवजी उत्तरदायित्वाची संस्कृती रुजवण्यावर अधिक भर दिला तर राज्याचे, लोकांचे, शासन-प्रशासनाचे आणि देशाचेही भलेच होईल.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# रुपयाची वाटचाल शंभरीकडे!

१९४७ मध्ये एका डॉलरसाठी ३ रुपये ३० पैसे मोजावे लागत असत. आता त्याच डॉलरसाठी ९० रुपये मोजावे लागत असून , २०२७ पर्यंत एका डॉलरसाठी १०० रुपये मोजावे लागतील अशी चिन्हे आहेत. मात्र याला अर्थव्यवस्थेची कमजोरी मानता येणार नाही. डॉलरच्या तुलनेत रुपया घसरण्याचे फायदे आणि तोटे असे दोन्ही पैलू आहेत.

**१५ वर्षे स्थिर :** १९५० ते १९६५ अशी पंधरा वर्षे डॉलर- रुपया यांचा विनिमय दर स्थिर होता. एका डॉलरसाठी ४ रुपये ७६ पैसे मोजावे लागत होते. १५ वर्षांत या विनिमयदरात काडीचाही म्हणजे एका पैशाचाही बदल झाला नाही. त्यानंतर दोन वर्ष रुपयाची किंमत घसरून एका डॉलरसाठी ७.५० रुपये मोजावे जाऊ लागले. नंतर रुपया पुन्हा ४.७६ या विनिमय दरावर स्थिर झाला. १९८२ पर्यंत डॉलरसाठी रुपयाची किंमत एकेरी आकड्यात होती. म्हणजे एका डॉलरसाठी कधी ८ तर कधी ९ रुपये मोजावे लागत होते.

**१९९१ नंतर... :** रुपयाची दुर्गती की अधोगती सुरू झाली ती १९९१ नंतर. त्यावेळी देशात चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त सरकार होते. आर्थिक स्थिती अतिशय गंभीर होती. प्रथमच देशाला आपले सोने गहाण ठेवावे लागले होते. देश दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर होता. त्या वर्षात एका डॉलरसाठी २२ रुपये ७४ पैसे मोजावे लागत होते. देशाची सूत्रे हाती घेतल्यानंतर पी. व्ही. नरसिंहराव यांनी देशाची अर्थव्यवस्था सांभाळली. मात्र त्यांच्याच कार्यकाळात रुपया - डॉलर दर ३५ रुपयांवर जाऊन पोहोचला. आणि १९९८ मध्ये वाजपेयींचे सरकार येईपर्यंत तो ४१ रुपयांवर जाऊन पोहोचला होता. २००४ मध्ये वाजपेयींचे सरकार गेले तेव्हा एका डॉलरसाठी ४५ रुपये मोजावे लागत होते. म्हणजे स्वातंत्र्यानंतर पहिल्या ४७ वर्षांत रुपयाचा दर ४२ रुपयांनी वाढला. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास डॉलरच्या तुलनेत एका वर्षात एका रुपयापेक्षाही कमी वाढ होत होती आणि नंतरच्या २० वर्षांत रुपया नव्वदीच्या घरात पोहोचला. डॉलरच्या तुलनेत ही वाढ दरवर्षी सरासरी दोन रुपये आहे. मागील दोन वर्षात डॉलरच्या तुलनेत रुपया १० रुपयांनी घसरला आणि हाच दर कायम राहिल्यास दोन वर्षांत एका डॉलरसाठी १०० रुपये मोजावे लागतील.

**तेल महाग, निर्यात स्वस्त :** रुपया घसरल्याचा मोठा फटका कच्च्या तेलाच्या आयातीला बसत असतो. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाची किंमत डॉलरने ठरत असते. रुपया घसरल्याने या आयातीसाठी जास्त किंमत मोजावी लागते . मात्र याचा दुसरा फायदा निर्यातकांना होतो. निर्यात स्वस्त होते. याचा फायदा निर्यातक उठवू शकतात. याचा परिणाम आयात-निर्यात यांच्यातील तूट कमी होण्यात होते. रुपया घसरण्याचे हे काही फायदे असले तरी सर्वसाधारणपणे घसरता रुपया हे अर्थव्यवस्थेसाठी सुचिन्ह



मानले जात नाही. पण, याचा अर्थ अर्थव्यवस्था कमजोर होत आहे वा झाली आहे असाही नाही. विशेषत: आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यासाठी घसरता रुपया फायद्याचा विषय ठरू शकतो. त्याचप्रमाणे औषधी तयार करणाऱ्या कंपन्यांनाही याचा फायदा होणार असून, त्यांची निर्यात वाढेल व परिणामी नफाही वाढेल. ऑटो क्षेत्रातील कंपन्यानांही रुपया घसरणे फायदेशीर राहात आलेले आहे.

**डॉलर मजबूत? :** रुपया कमजोर झालेला नाही तर डॉलर मजबूत झाला आहे असा एक युक्तिवाद केला जात आहे. डॉलर मजबूत झाल्याने स्वाभाविकच रुपया कमजोर होत आहे. याचा भारताच्या अर्थव्यवस्थेची काहीही संबंध नाही असाही एक तर्क दिला जात आहे.

**ट्रम्प काय करणार? :** जागतिक अर्थकारणात अमेरिकेचा दबदबा मोडावयाचा असेल तर डॉलरला कमजोर केले पाहिजे या व्यूहरचनेतून रशिया-चीन नवे चलन निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत असे मानले जाते. हीच बाब अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प वारंवार म्हणत आहेत. त्यांचा रोख ब्रिक्स देशांकडे आहे. या संघटनेत भारतही आहे. ट्रम्प यांनी भारतावर नाराज होण्याचे हेही एक कारण असल्याचे म्हटले जाते. भारत आता रशिया-चीन गोटात सामील झाला असल्याचे त्यांचे आकलन आहे. मागील काही महिन्यांपासून ट्रम्प यांनी भारताच्या विरोधात जे आर्थिक निर्णय घेतले आहेत त्याचा स्वाभाविक परिणाम डॉलरच्या तुलनेत रुपया घसरण्यावर होत आहे. डॉलर कमजोर करण्याचा प्रयत्न काही देश करीत असले तरी ते प्रयत्न यशस्वी होणार नाहीत असे ट्रम्प सांगत आहेत. त्यांचा सारा रोख चीनकडे आहे.

**चीनचा धसका :** जागतिक राजकारणात व अर्थकारणात चीनचा दबादबा वाढू लागला आहे. याचा फटका डॉलरलाही बसू शकतो याची जाणीव असल्याने ट्रम्प अशी विधाने करीत आहेत. मात्र अमेरिका-चीन वादात भारताचा रुपया विनाकारण भरडला जात आहे. येणाऱ्या काळात ट्रम्प डॉलरला मजबूत करण्यासाठी आणखी काही निर्णय घेण्याची शक्यता असल्याचे मानले जाते. ते भारताच्या विरोधातही काही निर्णय घेऊ शकतात. म्हणजे याचा दबाव रुपयावर येत तो आणखी कमजोर होऊ शकतो.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांच्यासाठी नव्या वर्षात रुपया सावरण्याचे एक मोठे आव्हन राहणार आहे. यासाठी त्या कोणते निर्णय घेतात याची कल्पना १ फेब्रुवारी रोजी मांडल्या जाणाऱ्या अर्थसंकल्पात मिळण्याची शक्यता आहे.

**इंडिगोच जबाबदार :** कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त नफा कमावण्याचा प्रयत्न विमान कंपन्या करतात आणि याचे दुष्परिणाम आतापर्यंतच्या बहुतेक विमान कंपन्यांना भोगावे लागले असले तरी इंडिगोने त्यापासून धडा घेतला नाही असे दिसते. त्याचाच परिणाम म्हणजे आता या कंपनीला मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. हवाई क्षेत्र खाजगी कंपन्यांसाठी सुरू झाल्यानंतर डेक्कन एअर, गो एअर, जेट एअर लाईन्स, किंगफिशर यासारख्या कंपन्या आल्या आणि गेल्या. इंडिगो याला अपवाद मानली जात होती. वक्तशीरपणा, नवी विमाने या शिदोरीवर इंडिगोने हवाईक्षेत्रात आपले नाव व दबदबा स्थापित केला आणि अचानक इंडिगोचे विमान वादळात सापडले. केंद्र सरकारने जारी केलेल्या दिशानिर्देशांचे पालन या कंपनीने केले नाही. कमीतकमी कर्मचाऱ्यांकडून जास्तीत जास्त काम करवून घेण्याचा प्रयत्न इंडिगो करीत होती. मात्र, सरकारी नियमांचे पालन करण्याची वेळ येताच इंडिगोचे सारे वेळापत्रक कोसळले आणि याचा फटका लाखो विमान प्रवाशांना बसला. येत्या काही दिवसांत इंडिगोची विमानसेवा पूर्ववत् होईल असा दावा कंपनीकडून केला जात आहे. केंद्र सरकारने या कंपनीच्या उड्डाणांची संख्या १० टक्क्यांनी कमी केली आहे. याचा फटका कंपनीला बसणार आहे. आजवर फायद्यात चालणाऱ्या कंपनीला प्रथमच तोटा झाल्याचे सांगितले जाते.

**मोठे संकट :** सध्याचा स्थितीचा आर्थिक फटका या कंपनीला बसणार आहे. याशिवाय उड्डाणांची संख्या १० टक्क्यांनी कमी झाल्याने त्याचाही परिणाम कंपनीच्या उत्पनावर होईल असे मानले जाते. त्यामुळे येणाऱ्या काही दिवसात इंडिगोच्या विमानसेवा सुरळीत सुरू होणार असल्या तरी सध्याच्या संकटाने इंडिगोच्या अस्तित्वावर जे प्रश्नचिन्ह उभे केले आहे ते सहजासहजी जाणारे नाही. येणारे काही महिने 'इंडिगो'साठी वादळी हवामानासारखे ठरणार आहेत. यातून इंडिगो व्यवस्थापन आपल्या कंपनीस कसे बाहेर काढते यासाठी मोठे कौशल्य लागणार आहे.

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# महाराष्ट्र बनले वन्यप्राण्यांचे नंदनवन?

२०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आणि सुधीर मुनगंटीवार वनमंत्री झाले. तेव्हापासून वन्यजीवांच्या संवर्धनासाठी ठोस प्रयत्न सुरू आहे. या १२ वर्षांच्या काळात वाघांची संख्या जवळपास दुप्पट झाली आहे. जगातील सर्वांत रुबाबदार व आकाराने सर्वांत मोठा असलेला जय नावाचा वाघ अचानक गायब झाला. ही एक हानी सोडली तर वाघांचे संवर्धन बऱ्यापैकी झाले आहे. आज महाराष्ट्रात वाघांची एकूण संख्या ४४४ असल्याचे सांगितले जाते. पण, ही आकडेवारी २०२२ च्या वन्यप्राणी गणनेतील आहे. संपूर्ण भारताचा विचार केला तर आज देशात ३ हजार ६८२ वाघ आढळतात. दहा वर्षांपूर्वी ही संख्या अवघी १ हजार ७०६ होती. व्याघ्र संवर्धनात महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे. वाघांचे संवर्धन झाले. परंतु, याच कुळातील बिबट्यांनी मात्र महाराष्ट्रातील नागरिकांच्या मनात दहशत निर्माण केली आहे.

पूर्वी लांडगे गावात शिरून शेळ्या मारायचे. आता लांडगा दुर्मिळ झाला आहे. तरस हा प्राणी तर ताडोबाशिवाय इतर ठिकाणी दिसतही नाही. बिबट्यांची संख्या मात्र झपाट्याने वाढत आहे. महाराष्ट्रात आज ३ हजार ८०० पेक्षाही अधिक बिबटे असल्याचे सांगितले जाते. परंतु, ही आकडेवारी अंतिम असू शकत नाही. बिबट तसा दबा धरून शिकार करणारा प्राणी पण आता तो गावात शिरून कधी खुराड्यातून कोंबड्या पळवितो तर कधी शेतकऱ्यांच्या शेळ्या मारतो. बिबटे नागरिकांवरही हल्ले करीत असल्याने एका गंभीर समस्येला सध्या महाराष्ट्राला सामोरे जावे लागत आहे. बिबट्यांची दहशत सध्या पुण्यापासून नागपूरपर्यंत आहे. नागपूर शहराच्या पारडी भागात काही दिवसांपूर्वी एका बिबट्याने हल्ला करून ८ नागरिकांना गंभीर जखमी केले. पारडी भागात बिबट्याने पंधरा दिवसांत केलेला हा दुसरा हल्ला होता. नोव्हेंबर-डिसेंबरदरम्यान बिबट्यांच्या हल्ल्यात १४ शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. जुन्नर तालुक्यात दीड महिन्यात बिबट्यांनी ३ जणांचा बळी घेतल्यानंतर वनविभागाने ६८ बिबटे पकडले. त्यानंतर पुन्हा संगमनेर भागात बिबट्याने ६ वर्षांच्या मुलाचा बळी घेतल्याने खळबळ उडाली. चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली आदी जिल्ह्यांत दरवर्षी वाघांच्या हल्ल्यात मोठ्या प्रमाणात नागरिकांचा जीव जातो. आता बिबट्यांनीही हल्ले सुरू केल्याने नागरिक हतबल झाले आहेत. वर्धेसारख्या मध्यवर्ती जिल्ह्यातही वाघांसह बिबट्यांची दहशत आहे. बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे निर्माण झालेल्या संकटावर विधिमंडळातही बरीच खलबते झाली. शासनाने २००१ पासून नोव्हेंबर २०२५ पर्यंत बिबट्यांच्या हल्ल्यात ५५ नागरिकांचा मृत्यू तर १५० जण गंभीर जखमी झाल्याची माहिती दिली. याच काळात बिबट्यांनी तब्बल २७ हजार ९५२ पाळीव जनावरांचाही जीव घेतल्याचे सांगण्यात आले. वन मंत्रालयाने या समस्येवर तोडगा काढण्यासाठी जंगलात १ कोटीच्या शेळ्या सोडण्याचा प्रस्तावसुद्धा ठेवला. परंतु, हा निर्णय या समस्येवरील कायमस्वरूपी तोडगा ठरू शकत नाही. कारण, शेळ्या जंगलात सोडल्या तरी त्या घरी परत येऊ शकतात. शिवाय असहाय शेळ्यांवर अन्य हिंस्र प्राणी आपला दावा सांगू शकतात आणि यावरून जंगलातील प्राण्यांमध्ये संघर्ष उद्भवू शकतो. अमरावतीचे आमदार रवी राणा यांनी तर बिबट्याला पाळीव प्राण्याचा दर्जा देण्याची मागणी केली. बिबटे खूप उग्र स्वभावाचे असतात. त्यामुळे त्यांना घरी पाळता येणे शक्य वाटत नाही. केंद्र सरकारने प्रायोगिक तत्त्वावर बिबट्यांची नसबंदी करण्यास परवानगी दिली आहे. हा या समस्येवरील एक प्रमुख उपाय ठरू शकतो. वन आणि वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन करण्यात शासन-प्रशासन यशस्वी झाले. परंतु, आता याच वन्यजीवांमुळे नागरिकांचा जीव धोक्यात आल्याने वनविभागाची डोकेदुखी वाढली आहे. शासन या समस्येवर नेमका कुठला तोडगा काढते, हे आगामी काळात दिसून येईलच.

९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# रामनामाचा प्रसार करणारे संत

गोंदवलेकर महाराज हे रामनामाचा प्रसार करणारे संत होते. रामनामाचा सर्व लहान-थोरांमध्ये प्रसार करणारे, प्रत्येकाला भक्तिमार्गाला लावणारे संत गोंदवलेकर महाराज यांची पुण्यतिथी नुकतीच झाली. गोंदवलेकर महाराज यांचा अवतार म्हणजे नामावतारच होता. साताऱ्याजवळील गोंदवले या गावी राहत असताना त्यांच्याकडे जर एखादा मोठा शास्त्री पंडित आला, तर ते त्याला गावातील हनुमानाच्या मंदिरात रामनामाचा जप करण्यासाठी दिवसभर बसवत असत. परंतु एखादा मजूर त्यांच्याकडे आला, तर ते त्याला आपल्या सोबत शेतावर काम करायला नेत आणि उर्वरित वेळेमध्ये त्याला श्रीराम जय राम जय जय राम हा मंत्र देऊन त्याचा जप करायला सांगत असत.

महाराज म्हणजे मूर्तिमंत नम्रता, प्रेम, वात्सल्य यांची मूर्ती होते. भक्तांचे दु:ख, रोग, कष्ट हे ते आपल्या अंगावर घेत असत. एकदा एक मनुष्य महाराजांकडे आला व त्यांना म्हणाला, ''माझा मुलगा खूप आजारी आहे. तुम्ही याला बरे करा. मी खूप दुरून तुमची कीर्ती ऐकून आलो आहे.'' महाराज त्याला म्हणाले, ''अरेरे, इतक्या दुरून तुम्ही आलात! तुमचे हे कष्ट वाया जात आहेत हे पाहून मला अतिशय दु:ख होत आहे.'' त्यावर तो मनुष्य म्हणाला, ''महाराज, असे बोलू नका. काहीही करा, पण माझ्या मुलाला बरे करा.'' अशी वारंवार विनवणी केल्यानंतर शेवटी महाराज म्हणाले, ''मी तर काही मोठा साधू नाही. माझा तर काही मोठा अधिकार सुद्धा नाही. परंतु मी रामरायाला तुमच्या मुलासाठी साकडे घालीन आणि त्याला आळवीन की यांच्या मुलाला बरे कर.'' यानंतर तो मुलगा बरा झाला. महाराजांनी जे काही केलं, ते सर्व रामरायाला समर्पित केलं.

महाराज इंदूरमध्ये असताना एक किसनराव नावाचा मोठा सरकारी अधिकारी, जो सर्व अवगुणसंपन्न होता, त्याच्या कानावर महाराजांची कीर्ती गेली आणि तो महाराजांना भेटायला आला. महाराजांना पाहून तो म्हणाला, ''तुम्ही जे ढोंग माजविले आहे, ते इतर ठिकाणी खपले असेल, पण इथे तुमची माझ्याशी गाठ आहे. इथे तुमचे काही चालणार नाही.'' त्यावेळेस महाराज म्हणाले, ''तुमचे म्हणणे खरे आहे, पण येथे कोणाचे चालणार नाही, एवढेच आपण बघूया.'' महाराजांच्या या उत्तरावर तो अतिशय संतप्त झाला. तोंडाला येईल ते महाराजांना बोलू लागला. परंतु महाराज अतिशय शांत, प्रसन्न होते. ते पाहून तो जरा चपापला व म्हणाला, ''तुम्ही स्वतःला साधू म्हणता, मग माझे भविष्य सांगून दाखवा. जर तुम्ही बरोबर सांगितले, तर मी तुम्हाला खरा साधू समजेल.''त्यावर महाराज म्हणाले, ''आम्ही तर बोलून चालून एक साधे रामदासी आहोत. एका रामाचे नावच आम्हाला तेवढे माहीत आहे. बाकीचे इतर काही ज्ञान आम्हाला नाही.'' त्यावेळेस महाराजांच्या जवळ गोदू नावाची एक दहा वर्षांची मुलगी उभी होती. महाराजांनी तिच्या पाठीवर थाप मारली व म्हणाले, ''गोदू या रावसाहेबांना त्यांचे भविष्य सांग.'' गोदू चटकन पद्मासनावर बसली, डोळे मिटून रावसाहेबांना म्हणाली, ''आजपासून आठव्या दिवशी तुझी दोन पोरे मरतील. पंधरा दिवसांनी तुझी बायको मरेल आणि त्यानंतर तुझ्यावर सरकारी रोष होईल. पण महाराजांना जर तू शरण आला, तर त्यातून तू मोकळा होशील.'' हे ऐकल्यावर सर्व लोक चकित झाले. हा अधिकारी मनात चरकला, पण वरवर हसत निघून गेला. पुढे ईश्वर इच्छेने त्याची दोन्ही मुले आटलेल्या ओढ्यात खेळत असताना अचानक पाणी आले व ती बुडून मरण पावली. त्यांच्या दु:खाने त्याची बायको वेडी झाली व तिने विहिरीत जीव दिला. याने आतापर्यंत जे पैसे खाल्ले होते, ते उघड झाले व सरकारने त्याला बडतर्फ केले. इतके सगळे झाल्यावर तो महाराजांकडे आला व म्हणाला, ''माझ्या अपराधासाठी आपण मला एवढी मोठी शिक्षा कशी काय केली?'' अत्यंत कळवळून महाराज म्हणाले, ''अरे, हे तू काय बोलतोस? मी शिक्षा करीन ही कल्पनाही मला सहन होत नाही. आतापर्यंतच्या गोष्टी तुझ्या प्रारब्धाने घडलेल्या आहेत. माणसाचे जन्म-मृत्यू हे भगवंताच्या हाती असतात.'' महाराजांनी त्याला रामनामाचा मंत्र दिला. त्यानंतर पश्चात्तापाने दग्ध झालेला तो अधिकारी उठता-बसता रामनाम घेऊ लागला. पुढे त्याच्यावरचे आरोप नष्ट झाले, तक्रार काढून घेतली गेली. त्याला वरची जागाही मिळाली, परंतु आता त्यात आमूलाग्र बदल झालेला होता. जो आधी साधा किसनराव होता, त्याला आता लोक भगत किसनराव म्हणू लागले.

महाराजांची कीर्ती खूप मोठी झाली होती. एका शास्त्रीबुवाला ती पसंत पडली नाही. त्यांनी रामनाम घेणाऱ्या लोकांना म्हटले, ''तुम्ही एका रामदास्याच्या नादी लागून अज्ञान्यासारखे राम-राम म्हणत बसता.'' लोक म्हणाले, ''तुम्हाला जे बोलायचे असेल ते महाराजांशी बोला. आम्हाला काही जास्त माहीत नाही.'' एकदा महाराज रामाच्या दर्शनासाठी राममंदिरात आले असताना शास्त्रीबुवा तिथे आले. त्यांना पाहिल्यावर महाराजांनीच त्यांना नमस्कार केला व जवळ बसवले. शास्त्रीबुवा म्हणाले, ''तुम्ही हे काय लोकांना रामनाम घ्यायला सांगत आहात? तुम्हाला वेदशास्त्र काही माहीत नाही. उगीच राम राम म्हणत बसता आणि इतरांना तसे करायला लावता. तुम्ही निश्चितच नरकाचे धनी व्हाल.''त्यावर महाराज म्हणाले, ''शास्त्रीबुवा, क्षमा करा. मी तर फार अज्ञानी आहे. माझ्यावर आपण संताप करू नये. पण नाम हे भगवंताला फार प्रिय आहे. त्याचा प्रताप आपल्याला लवकरच कळेल. आपणही नाम घेऊ लागाल.'' शास्त्रीबुवा म्हणाले, ''मला वेड लागले तरच मी नाम घेईन. नाहीतर ही जीभ नामाचा उच्चार करणार नाही.'' हे ऐकून महाराज म्हणाले, ''भगवंताची इच्छा तशीच असली तर तेही होईल.'' शास्त्रीबुवा महाराजांना बरेच बोलले व मुक्कामी गेले. त्याच रात्री पहाटे शास्त्रीबुवा एकदम उठले. त्यांनी हातात दोन जळकी लाकडे घेतली, त्यांची टिपरी करून मोठमोठ्याने रामनाम करीत गावभर हिंडले. त्यांना अंगावरच्या कपड्यांची शुद्ध राहिलेली नव्हती. ही वार्ता महाराजांच्या कानावर आल्यावर त्यांनी शास्त्रीबुवांना आणण्यासाठी मनुष्य पाठवला. महाराजांनी त्यांच्या डोक्यावर हात ठेवला, तेव्हा त्यांना गाढ झोप लागली व ते बरे झाले. परंतु त्यांच्या वृत्तीमध्ये एकदम फरक पडला व ते रामनाम घ्यायला लागले.

महाराज नेहमी गृहस्थांना सांगत, ''गृहस्थांनी कुठलेही दान करणे शक्य झाले नाही तरी अन्नदान मात्र जरूर करावे.'' त्यांच्या जीवनात त्यांनी अनेक वेळा मोठमोठे अन्नदान केले. आपल्या दैनंदिन जीवनात आपण बरेच वेळा बिनकामाच्या विषयांवर बोलत असतो. हा सर्व वेळ आपण रामाचे नाव घेण्यात घालवला पाहिजे. पूजनीय गोंदवलेकर महाराजांचे जीवन हे रामनामाला समर्पित जीवन होते. त्यांच्यामुळे सर्वसामान्य माणसाला रामनामाची दीक्षा मिळाली. रामनामाचा मोक्षाकडे जाणारा मार्ग सापडला. रामनामाच्या जपामुळे संपूर्ण समाजात सात्त्विक वातावरण निर्माण करण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न आपण रामनाम घेऊन करू शकतो.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## आजचे संघगीत-७३

सोमवार, १५ डिसेंबर २०२५

### संस्कृति सबकी एक चिरंतन खून रगों में...

विराट सागर समाज अपना हम सब इसके बिंदू हैं
राम कृष्ण गौतम की धरती, महावीर का ज्ञान यहां
वाणी खंडन मंडन करती, शंकर चारों धाम यहां
जिसने दर्शन राहें उतनी, चिंतान का चैतन्य भरा
पंथ खालसा गुरू पुत्रों की बलिदानी यह पुण्य धरा
अक्षय वट अगणित शाखाऐं, जड में जीवन हिंदु हैं ॥१॥

कोटी हृदय हैं भाव एक हैं, इसी भूमि पर जन्म लिए
मातृभूमि यह कर्मभूमि यह, पुण्यभूमि हित मरे जिये
हारे-जीते संघर्षों में, साथ लढे बलिदान हुए
कालचक्र की मजबूरी में रिश्ते नाते बिखार गये
एक बडा परिवार हमारा, पुरखे सब के हिंदु हैं ॥२॥

सबकी रक्षा धर्म करेगा, उसकी रक्षा आज करें
वर्ण-भेद मत-भेद मिटा कर नव रचना निर्माण करें
धर्म हमारा जग में अभिनव, अक्षय है अविनाशी हैं
इसी कडी से जुडे हुए, युग युग से भारतवासी हैं
थाय अथाह जहां की महिमा, गहरा जैसे सिंधु हैं ॥३॥

हरिजन गिरिजनवासी बन के, नगर ग्राम सब साथ चलें
उंच नीच का भाव घटा कर, समता के सद्भाव बढें
ऊपर दिखते भेद भले हों, जैसे वनमें में फूल खिले
रंग बिरंगी मुस्कानों से, जीवन रस पर एक मिले
संजीवनी रस अमृत पीकर, मृत्युंजय हम हिंदु है ॥४॥

## वाचक पत्रे

### सनबर्न फेस्टिव्हल : अश्लीलता आणि अमली पदार्थांची रेलचेल

भारतीय संस्कृतीत, पाश्चात्त्य संस्कृतीने किती घट्ट पाय रोवले आहेत, याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे डिसेंबरमध्ये मुंबईत होऊ घातलेला सनबर्न फेस्टिव्हल. या फेस्टिव्हलला यावर्षी मुंबईमध्ये आयोजित करण्यास महाराष्ट्र सरकारने परवानगी दिली आहे. २००७ मध्ये प्रथमच गोव्यात या फेस्टिव्हलने शिरकाव केला. २०१६ मध्ये पुणे आणि आता मुंबईत डिसेंबरमध्ये हा फेस्टिव्हल होत आहे. या कार्यक्रमात हजारोंचा सहभाग असतो. हजारो विदेशी पर्यटक भारतात येतात. त्यामुळे अत्यंत कमी अवधीत राज्याच्या तिजोरीत कोट्यवधी रुपयांची भर पडते. म्हणजे यात अर्थकारण आहे म्हणूनच ही उठाठेव. परंतु या फेस्टिव्हलमुळे येथील समाजात मद्य, अमली पदार्थ आणि अश्लीलता यांची विषवल्ली रुजते आणि फोफावते आहे हे सरकारला कळू नये याचे आश्चर्य वाटते! याचे किती दूरगामी परिणाम होतील, याची तमा न बाळगता केवळ तिजोरी भरण्यासाठी असल्या फेस्टिव्हल्सला परवानगी मिळत असेल तर छत्रपतींचा महाराष्ट्र म्हणवून घ्यायची आपली पात्रता आहे का? मागच्या वर्षी तिजोरी भरण्यासाठी मद्याची दारे गल्लोगल्ली उघडी केली आणि आता अशा फेस्टिव्हलमुळे अमली पदार्थ आणि अश्लीलता महाराष्ट्रात घराच्या उंबरठ्यावर आणून ठेवली. आधीच पुणे आणि मुंबईत अमली पदार्थांचे साठे सापडत आहेत. त्याकडे दुर्लक्ष करून पुन्हा तरुण पिढीला अशा फेस्टिव्हलच्या निमित्ताने नशाखोर बनवण्याचे काम सुरू आहे. इकडे लाडक्या बहिणी म्हणून गोंजारायचे आणि मद्य आणि अमली पदार्थांमध्ये त्यांच्या नवऱ्यांना आणि मुलांना गुंतवायचे. असे दुहेरी धोरण सध्या दिसते आहे. हे सर्व केवळ राज्य चालवण्यासाठी, आर्थिक गणिते मांडण्यासाठी योग्य वाटत असले, तरी त्यासाठी आपण तरुण पिढीचे भविष्य अंधारात लोटत आहोत, हे वेळीच कळले पाहिजे.

**माधवी पत्की**/नागपूर

### डिजिटल मनोरंजन आणि मुलांवरील त्याचे परिणाम!

आजच्या आधुनिक (डिजिटल) युगात सामाजिक माध्यमे आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहेत. शिक्षण, रोजगार, व्यवसाय, मनोरंजन अशा प्रत्येक क्षेत्रात या माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. मनोरंजनाच्या क्षेत्राचा विचार करता युट्युब आणि नेटफ्लिक्स हे दोन्ही अत्यंत लोकप्रिय प्लॅटफॉर्म आहेत. दैनंदिन जीवनातील अनेक उपयुक्त गोष्टी शिकण्यासाठी युट्युबचा, तर चित्रपट, वेबसीरिज आणि डॉक्युमेंटरी पाहण्यासाठी नेटफ्लिक्सचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. मात्र, आजची वस्तुस्थिती अशी आहे की लहान मुलेही या माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर करताना दिसतात. मुले नेमके कोणते व्हिडीओ पाहत आहेत, याकडे पालकांचे लक्ष नसल्यास या माध्यमांवर उपलब्ध असलेले हिंसक, अश्लील आणि अनैतिक दृश्यांचे व्हिडीओ पाहण्याची दाट शक्यता असते. याचा परिणाम मुलांच्या कोवळ्या मानसिकतेवर होतो. या स्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पालकांनी जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे. मुलांच्या स्क्रीन टाईमवर लक्ष ठेवणे, योग्य कंटेंटची निवड करून देणे आणि त्यांच्याशी संवाद साधणे गरजेचे आहे. तसेच शासनानेही याबाबत कडक नियमांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यासंदर्भात नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने युट्युब आणि नेटफ्लिक्सवरील अश्लील सामग्री पाहण्यासाठी आधार कार्ड आवश्यक असावे, अशी महत्त्वाची शिफारस केली आहे. त्यामुळे लहान मुलांना चुकीच्या कंटेंटपासून दूर ठेवणे शक्य होईल. सर्वोच्च न्यायालयाने उचललेल्या या कठोर पावलामुळे मुलांबरोबरच तरुणांमध्येही पसरणाऱ्या चुकीच्या मानसिकतेवर निश्चितच आळा बसेल, अशी अपेक्षा आहे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

## पान १ वरून



### मावळत्या सुर्याच्या साक्षीने ऐतिहासिक रेल्वे पूलाचा अस्त

**पाच टप्प्यात २० गर्डर उचलले :** मोठ्या क्रेनच्या सहाय्याने दुपारी १ वाजून २५ मिनिटांनी पहिला गर्डरचा अर्धा भाग तोडून खाली उतरवण्यात आला. १ वाजून ५६ मिनिट आणि २२ सेकंदाला दुसरा गर्डर तुकडा दमानी मैदानात उतरवला. अशा पद्धतीने पाच टप्प्यात वीस गर्डर उचलण्यात आले. एकाच वेळी दोन गर्डर उचलण्यात आले. सर्व मिळून २८ टनाचे हे गर्डर होते.

**अत्याधुनिक असा चारपदरी राहणार नवा पूल :** सोलापूर शहरातील भविष्यातील वाढती वाहतूक लक्षात घेऊन येथे अत्याधुनिक चारपदरी नवा रोड ओव्हर ब्रिज उभारण्यात येणार आहे. सुमारे १९ मीटर रुंदीच्या या पुलात एकूण चार कॉम्पोझिट स्पॅन असणार आहेत. ३६ मीटर लांबीचा मुख्य स्पॅन रेल्वे मार्गावर उभारण्यात येणार आहे. अतिरिक्त व्हायाडक्ट व रेल्वे स्पॅन राहील. नव्या पुलाच्या दोन्ही बाजूंना अप्रोच रोड तसेच प्रत्येकी ५.५ मीटर रुंदीचे सर्व्हिस रोड बांधण्यात येणार आहेत. गोयला इन्फ्रा कंपनीला याचा मक्ता देण्यात आला आहे.

**एक वर्षाच्या कालावधीत नव्या पुलाची उभारणी :** नव्या पुलाचे काम एका वर्षाच्या कालावधीत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. मात्र सहा महिन्यातच हा पूल उभारण्याचा प्रयत्न राहील. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणद्वारा नवे तंत्रज्ञान वापरुन अत्याधुनिक पध्दतीने नवा पूल उभारला जाणार आहे. दोन्ही साईडला सर्विस रोड, रिंग रोड राहणार आहे. पूल पूर्ण झाल्यानंतर सोलापूर शहरातील पूर्व-पश्चिम भागांमधील वाहतूक अधिक वेगवान व सुरक्षित होणार आहे, अशी माहिती राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी अनिल विपत यांनी दिली.

**लगतच्या इमारतीसाठी सेवा रस्ता, यू टर्न सुविधा :** दमाणी नगरचा रेल्वे पूल पाडल्यानंतर त्याजागी १९ मीटर रुंदीचा आधुनिक चारपदरी नवीन रोड ओव्हर ब्रिज उभारण्यात येणार आहे. यामध्ये १८.८ मीटरचे अतिरिक्त व्हायाडक्ट, ३६ मीटरचा मुख्य स्पॅन, २४ मीटरचा अतिरिक्त रेल्वे स्पेन आणि पुन्हा १८.८ मीटरचा व्हायाडक्ट असा संयुक्त आराखडा आहे. नवीन पुलाचे बांधकाम सुमारे एका वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. लगतच्या इमारतीसाठी दोन्ही बाजूंना ५.५ मीटर रुंदीची सेवा रस्ता, यू टर्न सुविधा आणि परिसरातील समुदायांच्या सोयींसाठी आवश्यक व्यवस्था प्रस्तावित करण्यात आली आहे.

**तीन गाड्या झाल्या मार्गस्थ :** पाडकामापूर्वी सोलापूर रेल्वे विभागातील हुतात्मा एक्सप्रेस, वंदेभारत, सिध्देश्वर एक्सप्रेस आणि कोकणची एक रेल्वे या गाड्या मार्गस्थ झाल्या. त्यानंतर पाडकामास सुरुवात झाली. दरम्यान, पूल पाडल्यानंतर रेल्वे रुळावर पडलेला मलबा लगेचच काढण्यात येत होते. रात्री ८ नंतरच्या रेल्वेगाड्यांसाठी मार्ग मोकळा करण्याचे काम सुरू होते. सोलापूरकरांची गैरसोय होऊ नये, याची काळजी सोलापूर रेल्वे विभागाच्यावतीने घेण्यात आली होती.

## महत्वाचे...

### डमी शिक्षिका प्रकरणी तिघांना कारणे दाखवा नोटीस

**मंगळवेढा दि. १४ डिसेंबर-**

लक्ष्मी दहिवडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील डमी शिक्षिका प्रकरणाच्या चौकशीसाठी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी दर्शन मेहता यांनी सदर शाळेस प्रत्यक्ष भेट देवून या घटनेच्या मुळाशी जावून चौकशी केली. तसेच शिक्षक, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक यांना कारणेदाखवा नोटीस पाठविल्याचे सांगण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत डमी शिक्षिका कार्यरत असल्याने मुलांच्या अध्यापनाचा प्रश्न गंभीर होवून मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याच्या बातम्या वृत्तपत्रात झळकताच गटशिक्षणाधिकारी दर्शन मेहता यांनी दि.१० डिसेंबर रोजी सदर शाळेस प्रत्यक्षात भेट दिली. शाळा व्यवस्थापन समितीने ठराव करुन सदर महिला शिक्षिकेला स्वयंसेवक म्हणून नेमले असल्याचे मेहता यांनी सांगीतले. तसेच ती शिक्षिका मानधनवर काम करत असुन सर्व शिक्षक स्वयंस्फुर्तीने वर्गणी गोळा करुन तिला मानधन दिले जात असल्याचे सांगीतले. शाळेतील बाळासो कोष्टी हे शिक्षक दि.८ डिसेंबर पासून रजेवर असल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे. रजेवर असल्याचा अहवाल देणे अपेक्षित असताना तो दिला नाही. त्यामुळे सदर शिक्षकाला नोटीस बजावण्यात आली आहे. सदर शाळेला अधिकाऱ्यांनी भेट दिल्यावर ती शिक्षिका अनुपस्थित असल्याचे दिसून आले. मुळ शिक्षक,मुख्याध्यापक,केंद्रप्रमुख यांना कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आल्या असून या घटनेचा सविस्तर अहवाल जिल्हा परिषद शिक्षण विभागाला पाठविण्यात आला असल्याचे गटशिक्षणाधिकारी मेहता यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगीतले.

### अज्ञात चोरट्याने मोटारसायकल पळवली

**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

पार्क केलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ७ डिसेंबर रोजी दुपारी १.३० ते २ वाजण्याच्या दरम्यान भुलाबाई चौक सोलापूर येथे घडली.याप्रकरणी सादिक लालअहमद शेख (वय-३६,रा. मंगळवेढा तालीम जवळ सोलापूर) याने अज्ञात चोरट्याविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. यात फिर्यादी यांची हिरो मेस्ट्रो या कंपनीची मोटरसायकल ( क्रमांक एम एच १३ बी एम ११५८) हे भुलाबाई चौक येथे पार्क केली असताना ती कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. तपास सहाय्यक फौजदार ओव्हाळ हे करत आहेत.

### अज्ञात चोरट्याने खिशातून मोबाईल पळवला

**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

चहा पीत असताना पँटीच्या खिशात ठेवलेला मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेला. सदरची घटना २० मे २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजण्याच्या दरम्यान बळीवेस सोलापुर येथे घडली. याप्रकरणी मनोज रमेश विटकर (वय-३६,रा.बुधवार पेठ वडार गल्ली सोलापूर) यांनी अज्ञात चोटेविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. यात फिर्यादी हे बळीवेस येथील नमो कँटीन या ठिकाणी चहा पीत असताना त्यांचा पँटीच्या खिशात असलेला मोबाईल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला. तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल भद्रशेट्टी हे करत आहेत.

# शिवसेना आजपासून १८ डिसेंबरपर्यंत इच्छुकांचे अर्ज स्वीकारणार : अमोल शिंदे

## महायुतीतूनच आम्ही लढणार; बेस्ट २५ची छाननी करणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**



महापालिका निवडणूक लढण्यासाठी इच्छुक असणाऱ्या उमेदवारांना १५ ते १८ डिसेंबर दरम्यान सकाळी ११ ते ५ या वेळेत शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील शिवसेना शहर जिल्हा संपर्क कार्यालयात अर्ज घेऊन भरता येणार आहे. जे उमेदवार शिवसेना पक्षाकडून निवडणूक लढवू इच्छितात त्यांनी अर्ज भरावा, असे आवाहन जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी पत्रकार परिषदेत केले.

सर्व प्रभागातून १०२ उमेदवारांकडून आम्ही अर्ज भरून घेणार आहोत. परंतु आमचा आग्रह हा महायुतीचाच असणार आहे. विधानसभेदरम्यान भाजपला २५ जागा मागितल्या होत्या त्यांनी त्यावेळेस ते मान्य केले होते त्यामुळे आम्ही आमचे बेस्ट २५ उमेदवार निवडणार आहोत. शिवसेनेचे कमिटी करू आणि त्यामधून बेस्ट २५ उमेदवार छाननी करणार आहोत, त्यानंतर महायुती नाही झाली तर आमचे १०२ उमेदवार तयार असतील.

यावेळी जिल्हाप्रमुख अमर पाटील, शहर प्रमुख सचिन चव्हाण, उपजिल्हाप्रमुख संजय सरवदे, तुकाराम मस्के, सागर शितोळे, अश्विनी भोसले, मनीषा नलावडे, सुनंदा साळुंखे, जयश्री पवार, पूजा चव्हाण, माधुरी कांबळे, सुनंदा साळुंखे आदी उपस्थित होते.

### पाण्यासाठी श्रेयवादाची लढाई कोणीही करू नये

पाण्यासाठी चा डिस्ट्रीब्यूशन लाईन साठीचा आराखडा मंजूर झालेला आहे. तिन्ही पक्ष सांगणार आहेत की हे काम आम्ही केले आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी केल्यामुळेच हे काम झाले आहे. कोणीही एकटा म्हणू शकत नाही की हे काम आमच्यामुळे झाले. श्रेय वादाची लढाई कोणीही करू नये, हे सरकार युतीचे आहे. आता माझ्यामुळे तुझ्यामुळे झालं म्हणण्यापेक्षा सोलापूरकरांना कसे पाणी देऊ याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.



## एक दिवसीय निसर्गायण शिबिरास उत्फूर्त प्रतिसाद

### पर्यावरण तज्ञ दिलीप व वैद्य पौर्णिमा कुलकर्णी यांचे मार्गदर्शन

**सोलापर, दि. १४ डिसेंबर-**

विवेकानंद केंद्र वयम येथे रविवारी एक दिवसीय निसर्गायण शिबिरात शहरातील ८८ पर्यावरण प्रेमींनी सहभाग नोंदवला. या विशेष शिबिरासाठी कुडावळे (जिल्हा रत्नागिरी) येथील पर्यावरण तज्ञ दिलीप कुलकर्णी व वैद्य पौर्णिमा कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

या शिबिराचा मूळ उद्देश सद्य परिस्थितीमध्ये नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर व जीवनशैली कशी असावी? त्याचा उपयोग कसा करावा आणि कशा पद्धतीने पुढच्या पिढीसाठी ते जोपासावे हा होता.चक्रीयता, समग्र विकास (अंतरंग व बाह्य विकास), देवाण-घेवाण आदी उदाहरणासह समजावून सांगितले.

या शिबीराचे उद्घाटन सामाजिक वनीकरण विभागीय वनाधिकारी लक्ष्मण आवारे यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले, सोलापूर जिल्ह्यात वनक्षेत्र खुपच कमी आहे. नैसर्गिक साधन संपत्ति कमी होत आहे याबद्दल चिंता व्यक्त केली. शिबिरासाठी विवेकानंद केंद्र कार्यकर्ते व प्रकल्प प्रमुख सुहासजी देशपांडे,अजित ओक, अजित कोठारी,प्रणोती कोठारी,किरण जामगुंडी, गुरुराज देशपांडे, प्रवीण तळे व प्रशांत स्वामी उपस्थित होते.

## जि.प.शाळेतील 'त्या' स्वयंसेविकेची बदनामी केल्याप्रकरणी एकाविरुध्द गुन्हा

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. १४ डिसेंबर-**

लक्ष्मी दहिवडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील त्या स्वयंसेविका शिक्षिकेची टी. व्ही. चॅनलवर व्हिडीओ पाठवून बदनामी केल्याप्रकरणी राजभाऊ मेतकुटे (रा.लक्ष्मी दहिवडी) याच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी जयश्री औदुंबर सुरवसे (वय ४१) ह्या स्वयंसेविका शिक्षिका असून दि.८ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास लक्ष्मीदहिवडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत यातील फिर्यादी अध्यापनाचे काम करीत असताना आरोपीने शाळेत येवून मोबाईल मध्ये व्हिडीओ शुटींग करुन तुमचे नाव काय? तुम्हाला पगार किती? वगैरे मजकूराची माहिती विचारुन सदरचा व्हिडीओ टी.व्ही. चॅनलवर प्रसारीत करुन बदनामी केली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास लक्ष्मी दहिवडी बीटचे पोलीस हवालदार निंबाळकर हे करीत आहेत.

## वैद्यकीय पुराव्याने उघडकीस आला अॅट्रॉसिटी खटल्यातील खोटेपणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

वैद्यकीय पुराव्याने अॅट्रॉसिटी खटल्यातील खोटेपणा उघडकीस आला आणि येवती ता. मोहोळ येथील बाळासाहेब पाटोळे व त्यांच्या कुंटूंबियांची अॅट्रासिटी प्रकरणातुन निर्दोष मुक्तता झाली. येवती ता. मोहोळ येथे दि. ५/८/२०२० रोजी घरासमोरील अंगणातील फुल तोडण्याचे कारणावरुन झालेल्या वादातून फिर्यादीला जातीवाचक शिवीगाळ करुन खुरप्याने मारहाण केल्याच्या आरोपावरुन बाळासाहेब रामचंद्र पाटोळे (५५) त्यांची पत्नी सौ. संगीता (५०) व उच्च शिक्षित मुलगा महेश यांच्याविरुध्द उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर ग्रामीण यांनी सोलापूरातील विशेष न्यायालयात दोषारोप पत्रक दाखल केले होते. सदर अॅट्रासिटी खटल्याची सुनावणी विशेष न्यायाधीश श्री. जयदीप मोहिते यांचे न्यायालयात झाली.

घटनेदिवशी फिर्यादी आपल्या घरासमोरील अंगणातील झाडांची फुले तोडत असताना आरोपी महेश याचेबरोबर तिची भांडणे झाली. त्या भांडणात आरोपी महेश याने खुरप्याने मारहाण करुन जातीवाचक शिवीगाळ केली असे सरकार पक्षाचे म्हणणे होते. फिर्यादीला ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासले त्यावेळी तपासणी दरम्यान तिने वैद्यकीय अधिकाऱ्याला तिला दगडाने मारहाण झाली असे सांगितले होते.

तपासणीनंतर मोहोळ पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीमध्ये तिला खुरप्याने मारहाण झाली असा आरोप तिने केला होता. वैद्यकीय पुराव्यावरुन तिला झालेली जखम कापीव हत्याराने झालेली नाही असे स्पष्टपणे दिसुन येते. वैद्यकीय पुरावा व प्रत्यक्ष पुरावा हा एकमेकाच्या विरोधात आहे त्यामुळे वैद्यकीय पुराव्याशी विसंगत असलेल्या साक्षीवर विश्वास ठेवणे धोक्याचे आहे, असा युक्तिवाद आरोपी पक्षातर्फे करण्यात आला. वैद्यकीय पुरावा फिर्यादीच्या साक्षीस विसंगतीपुर्वक असल्याने न्यायाधिशांनी पाटोळे कुटूंबियांची निर्दोष मुक्तता केली. विशेष म्हणजे सदर सुनावणी दरम्यान फिर्यादीच्या मुलाने न्यायालयात दिलेल्या साक्षीत आपल्या समक्ष कोणतीही घटना घडली नाही अशी साक्ष देऊन आईने आरोपीविरुध्द केलेल्या आरोपाला दुजोरा देण्यास नकार दिला. या खटल्यात आरोपीतर्फे अॅड. धनंजय माने, अॅड. जयदीप माने ,अॅड. प्रणित जाधव, अॅड. श्रीहरी कुरापाटी, अॅड. रियाज शेख (मोहोळ), अॅड. किरण गवळी यांनी काम पाहिले.

## जन्नतुल फिरदोस कब्रस्तानचा होणार विकास : किसन जाधव

### ५० लाखांच्या विकासनिधीतून संरक्षण भिंत तसेच रस्त्याचे होणार काम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ डिसेंबर-**



अल्पसंख्यांक बहुल भागातील मूलभूत नागरी सुविधांना भक्कम बळ देत सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ येथील जन्नतुल फिरदोस कब्रस्तानसाठी रस्ता काम व सुरक्षेच्या दृष्टीने संरक्षण भिंत उभारणीसाठी प्रत्येकी २५ लाख रुपये, असा एकूण ५० लाख रुपयांचा निधी सन २०२५२६ अल्पसंख्यांक बहुल नागरिक क्षेत्राकरिता क्षेत्रविकास या योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आला आहे.

प्रभागाचे माजी नगरसेवक किसन जाधव तसेच नगरसेवक नागेश गायकवाड यांनी अल्पसंख्यांक बांधवांना दफनविधीच्या वेळी होणाऱ्या अडचणी, पावसाळ्यातील गैरसोय आणि कब्रस्तानच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न सातत्याने शासनदरबारी प्रभावीपणे मांडत ठोस पाठपुरावा केला होता. यापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विशेष निधीतून जन्नतुल फिरदोस कब्रस्तान येथे ५० लाखांचे सांस्कृतिक भवन मंजूर होऊन त्याचे भूमिपूजन नजीब मुल्ला यांच्या हस्ते पार पडले होते. त्याच भूमिपूजन सोहळ्यात किसन जाधव यांनी रस्ता आणि सुरक्षा भिंतीसाठी मागणी मांडली होती. त्या मागणीची दखल घेत नजीब मुल्ला यांनी तत्काळ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे शिफारस केली होती. त्याचा परिणाम म्हणून आज हा निधी प्रत्यक्षात मंजूर झाला आहे. लवकरच या कामाचे प्रत्यक्षात सुरुवात होणार असल्याची माहिती माजी नगरसेवक किसन जाधव यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. या पत्रकार परिषदेस हाफिज सनामुल्ला, तय्यब अली, आसिफ शेख, महंमद आळगी, असलम इनामदार, महबूब कुडले, शहानवाज शेख, सैपन शेख, जाकीर शेख, सुलेमान शेख, फिरोज पठाण आदींची उपस्थिती होती.

## निंबोणी-विजापूर मार्गावर कत्तलखान्याकडे जनावरे घेवून जाणारे वाहन पकडले

### अज्ञात वाहन चालक व मालक यांच्या विरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १४ डिसेंबर**

कत्तल करण्याच्या उद्देशाने निंबोणी ते विजापूर जाणाऱ्या मार्गावर जर्शी गायीचा टेम्पो पकडून अज्ञात वाहन चालक व मालक यांच्या विरुध्द पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी अमोल महादेव चौगुले (रा.कुरुल) हे दि.१३ डिसेंबर रोजी रात्री १० वाजता निंबोणी ते विजापूर जाणाऱ्या रोडवर आयशर टेम्पो क्रमांक एम.एच.२३ डब्ल्यू ८०९० या वाहनात जर्शी गायी घेवून जात असताना मिळून आले.

या वाहनामध्ये दाटीवाटीने जनावरे बांधून त्यांच्या चारा पाण्याची व मेडीकलच्या व्यवस्था न करता तसेच जनावरांना इयर टॅग न करता जनरावरांचे पाय तोंड बांधून क्रूरतेची वागणूक देत विना परवाना वाहतूक करुन कत्तल कारखान्याकडे घेवून जात असताना मिळून आला असून पोलीसांनी जनावरे व वाहनासह ७ लाखाचा मुद्देमाल जप्त केला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस नाईक हजारे हे करीत आहेत.

### चारित्र्यावर संशय; पतीने घातला पत्नीच्या डोक्यात दगड

**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

चारित्र्यावर संशय घेऊन पतीने पत्नीला मारहाण करून तिच्या डोक्यात दगड घालून तीला गंभीर जखमी केल्याची घटना ११ डिसेंबरला दुपारी ३.३०च्या सुमारास संतोष नगर बाळे येथे घडली. याप्रकरणी स्वप्नाली राम सरसे (वय-३५, रा.संतोष नगर बाळे) यांनी पती राम गुलजार सरसे (वय-३८, रा. धरमशी लाईन मुरारजी पेठ) याच्याविरुद्ध फौजदार चावडी पोलीसात गुन्हा दाखल आहे. ११ डिसेंबर रोजी दुपारी यातील फिर्यादी या मुलीला जेवण खाऊ घालत असताना, फिर्यादीचे पती राम हे घरी आले व बाळाला झोपण्यासाठी घातलेले अंथरूण पाहून हे अंथरून इथे कसे काय खरे सांग. तू आत्ता हात पाय का धुवून घेतलीस. असे म्हणून फिर्यादी यांच्यावर संशय घेऊन पोटात लाथानी मारहाण केली. पतीने दारात लावलेला दगड घेऊन डोक्यात मारून गंभीर जखमी केले. तपास महिला पोलीस उपनिरीक्षक सुतार या करत आहेत.

**AHILYANAGAR MUNICIPAL CORPORATION**
**AHILYANAGAR**

**Atirikt Chatai Kshetra Nirdeshan Poti Premium Rakametun Kame Karne - Year 2025 - 26**
**E Tender Notice no. 451 Year 2025 - 26**

E Tender Notice no. 451 Year 2025 - 26 has been published on the government's website http://mahaetenders.gov. in for online bidding through e-tender mode.
However, it should be noted those concerned.

**City Engineer**
**Ahilyanagar Municipal Corporation**
**Ahilyanagar**

**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि ॥ व सब डि ॥ सोलापूर, महानगरपालिका सोलापूर हद्दीतील ता. उत्तर सोलापूर पैकी, शहर सोलापूर पैकी पेठ न्यु पाच्छा पेठ येथील सिटी सर्व्हे नं.१०३८८, फा. प्लॉट नं.३४/अ/१/७२अ, याचे क्षेत्र ८५०.०१ चौ.मी. यापैकी ईस्ट हाईट या ओनरशिप अपार्टमेंटमधील सहावा मजला फ्लॅट नं.६०५ (दु.बी.एच.के.). याचे एकूण बिल्टअप क्षेत्र = ७०.५२ चौ.मी.

| | | |
|---|---|---|
| बाथ | १.२० मी X २.१० मी | = २.५२ चौ.मी. |
| डब्लु.सी. | ०.९० मी X १.२० मी | = १.०८ चौ.मी. |
| बाथरुम | १.२० मी X २.१० मी | = २.५२ चौ.मी. |
| जिना, बाल्कनी आणि टेरेस | = १३.३३ चौ.मी. | |
| एकूण क्षेत्र सुपर बिल्टअप | = ८९.९७ चौ.मी. | |
| शेअर्स | = २.९७%. | |

या फ्लॅटची चतुःसिमाः- पूर्वेस - साईड मार्जीन व रस्ता, दक्षिणेस - साईड मार्जीन व सब प्लॉट नं.३४अ/७२ असे आहे, पश्चिमेस - जिना व पॅसेज व उत्तरेस - प्लॉट नं.६०४ असे आहे. येणेप्रमाणे वर वर्णन केलेली फ्लॅटजागा ही श्री. रमेश सत्यनारायण पसनूर, रा. सोलापूर यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून, सदरची फ्लॅटजागा ही आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून, त्यापोटी आमचे अशिलाकडून इसारादाखल रक्कम स्विकारली आहे. सदरहू वरील फ्लॅटजागेवर युनियन बँकेचे कर्ज असून, सदर कर्जाव्यतिरिक्त निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्रीही आमचे अशिलास दिलेली आहे.

तरी वर नमूद फ्लॅट जागेवर अन्य कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार, टाच, साठेखत, गहाणखत वगैरे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ०८ दिवसाच्या आत त्यांचे हक्काचे पृष्ठयर्थ कागदपत्रासह त्यांची लेखी हरकत नोंदवावी. याप्रमाणे मुदतीत कोणी काही हक्काची जाणीव न दिल्यास, सदर फ्लॅट जागा वर नमूद मालकांचे मालकीची असून ती निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली ता. १४/१२/२०२५.

**सही/-**
**अॅड. पुजा महादेव नाईकवाडे**
**रा. ५७६, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर**
**मो.नं. ९९७०७६७३०६/९५११६५३५७७**
**अशिलातर्फे अॅडव्होकेट**

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर**
**सातरस्ता, कारीगर पेट्रोलपंपा समोर, सोलापूर ४१३००३**
**ई-निविदा सूचना क्रमांक २२ बी-१ सन २०२५-२६ (ऑनलाईन)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२. सोलापूर-४१३००३ निविदा पत्रात नमूद केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करीत व सा. बां. विभागाकडून नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदार यांचे कडून खालील कामाकरिता **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २. सोलापूर. ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्रं. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | ठेकेदाराचा अधीकृत वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | देवगाव पिंपळगाव खडकलगाव आगाळगाव कुसळंब खामगाव तांदुळवाडी बावी पानगाव रास्तापूर सुर्डी यावली तडवळे मुंगशी ते कोठाळी रस्ता प्रजिमा २५ किमी १२/०० ते २७/०० आणि ३४/०० ते ३८/०० आर्थिक देखभाल दुरुस्ती करणे ता. बार्शी, जि. सोलापुर. | बी-१ | ५१.०३ लक्ष | अर्ग ४ अ व त्यावरील |

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दि. १५/१२/२०२५ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते २२/१२/२०२५ (सायं. १८.०० पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | :- | NIL |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांकः | :- | दि २२/१२/२०२५ (सायं. १८.०० पर्यंत) |
| मुळ दस्तऐवज सादर करण्याचा अतिम दिनांक (निविदा शर्त ८.१) | :- | ई-निविदा पोर्टलवर '**बीड लॉक**' झाल्यानंतर ७२ तासात '**हार्ड कॉपी**' प्रतिकारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२. सोलापूर |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ | :- | दि.२४/१२/२०१५ मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२. सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.gov.in 2) www.mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग २. सोलापूर ४१३००३ कार्यालयात सूचना फलक

**सही/-**
**(अ.बा. भोसले)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### स्क्वॅश विश्वचषकात भारत अंतिम फेरीत

**चेन्नई :** भारताने येथे दोन वेळच्या विजेत्या इजिप्ताचा ३-० असा पराभव करत स्क्वॅश विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रथमच प्रवेश केला. दुसऱ्या मानांकित भारताचा सामना अंतिम सामन्यात हाँगकाँग चीनशी होईल. हाँगकाँग चीनने दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात जपानचा पराभव केला. हा अंतिम सामना एक्सप्रेस अव्हेन्यू मॉलमध्ये खेळला जाईल. राष्ट्रीय विजेता वेलावन सेंथिलकुमारने इब्राहिम एलकब्बानीचा ७-१, ७-३, ७-६ असा पराभव करून भारताला विजयी सुरुवात करून दिली. त्यानंतर देशाची अव्वल महिला खेळाडू अनाहत सिंगने नूर हेकलवर ६-७, ७-५, ७-३, ३-७, ७-३ असा चुरशीचा विजय मिळवून भारताला २-० अशी आघाडी मिळवून दिली. २०२३ च्या हांगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत अनाहतसोबत कांस्यपदक जिंकलेल्या अभय सिंगने त्यानंतर अॅडम हवालचा ७-५, ६-७, ७-५, ७-६ असा पराभव करत यजमान भारताने २०१२ आणि २०२३ मध्ये विजेतेपद पटकावलेल्या बलाढ्य इजिप्ता धक्का दिला. २०२३ मध्ये कांस्यपदकावर समाधान मानावे लागल्यानंतर या स्पर्धेत भारताची ही सर्वोत्तम कामगिरी आहे.

### आंध्र प्रदेशची पंजाबवर ५ गड्यांनी मात

**पुणे :** सय्यद मुश्ताक अली चषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी येथे खेळल्या गेलेल्या अ गटाच्या सुपर लीग सामन्यात एम. हेमंत रेड्डीचे नाबाद शतक व एसएनडीव्ही प्रसादच्या नाबाद अर्धशतकाने बळावर आंध्र प्रदेशने पंजाबवर ५ गड्यांनी मात केली.

हरनूर सिंग (४२), अनमोलप्रीत सिंग (४७), सलील अरोरा (नाबाद ४२) व रमनदीप सिंगने (४३) तडफदार फलंदाजी करत पंजाबला मर्यादित २० षटकांत ५ बाद २०५ धावा उभारून दिल्या.

आंध्र प्रदेशच्या फलंदाज- एम. हेमंत रेड्डी व एस.डी.एन.व्ही. प्रसादनेही चोख प्रत्युत्तर दिले. हेमंतने नाबाद शतक व प्रसादने नाबाद अर्धशतक झळकाविले आणि १९.५ षटकांत ५ बाद २११ धावा काढून आंध्र प्रदेशला विजय मिळवून दिला. हेमंतने ५३ चेंडूंत ११ चौकार व ७ षट्कारांच्या मदतीने नाबाद १०९ धावांची, तर प्रसादने ३५ चेंडूंत २ चौकार व ४ षट्कारांसह नाबाद ५३ धावांची विजयी खेळी केली.

### हैदराबादचा राजस्थानवर विजय

**अंबी, १४ डिसेंबर**

सय्यद मुश्ताक अलीक चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत रविवारी येथे खेळल्या गेलेल्या सुपर लीग सामन्यात तन्मय अग्रवालच्या दमदार खेळीच्या बळावर हैदराबादने राजस्थानवर १७ चेंडू शिल्लक ठेवित ६ गड्यांनी विजय नोंदविला. राजस्थानने ९ बाद १७८ धावा फटकावून हैदराबादसमोर १७९ धावांचे लक्ष्य ठेवले, ते त्यांनी १७.१ षटकांत ४ गडी गमावित गाठले. तन्मयने ७३ धावांची खेळी केली व २ झेल सुद्धा पकडले, त्यालाच सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राजस्थानला १७८ धावांचा टप्पा गाठून देताना मधल्या फळीतील फलंदाजांनी उत्तम कामगिरी केली. अव्वल फळी व तळाच्या फळीतील फलंदाज हैदराबादच्या गोलंदाजांसमोर फार वेळ टिकाव धरू शकले नाहीत. हैदराबादकडून चामा मिलिंद व तनय त्यागराजनने प्रत्येकी ३ बळी, तर मोहम्मद सिराजने २ बळी टिपले. हैदराबादला विजय मिळवून देताना तन्मय अग्रवाल व राहुल बुद्धीने अर्धशतके झळकावली.

### शुटिंग बॉल ज्युनिअर, सब-ज्युनिअर निवड चाचणी स्पर्धा १८ डिसेंबरला

**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

सोलापूर शहर आणि जिल्हा शुटिंग बॉल असोसिएशन व समृद्धी स्पोर्टस क्लबच्या वतीने गुरुवारी १८ डिसेंबरला दुपारी २ वाजता ज्युनिअर आणि सब-ज्युनिअर मुले व मुली यांची अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा सुभाष उद्यान, इकबाल मैदानाजवळ आयोजित केली आहे. या निवड चाचणीतून सोलापूरचा संघ लातूर येथे होणाऱ्या ३९व्या राज्य शूटिंगबॉल स्पर्धेसाठी पाठवला जाणार आहे. सब-ज्युनिअर मुले व मुलीसाठी १ जानेवारी २००९ नंतर व ज्युनिअर मुले व मुलीसाठी १ जानेवारी २००७ नंतर जन्मलेले खेळाडू पात्र आहेत. इच्छुक खेळाडूंनी असोसिएशनचे सचिव फैज अहमद बेगमपुरे (मो. ९८५०७७९३८७) किंवा प्रसिद्धी प्रमुख फरहान लालकोट (मो. ९८४४२२५५४१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष संजय सावंत यांनी केले आहे.

# भारताकडून पाकिस्तानचा धुव्वा

### आशिया चषक १९ वर्षांखालील क्रिकेट

**भारताचा ९० धावांनी विजय**

**कनिष्क चौहानची चमकदार अष्टपैलू कामगिरी**



सामनावीर कनिष्क चौहान

**दुबई, १४ डिसेंबर-**

आशिया चषक १९ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत रविवारी येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात अरविंद जॉर्जचे दमदार फलंदाजी आणि कनिष्क चौहानच्या चमकदार अष्टपैलू खेळाच्या जोरावर भारताने पाकिस्तानला ९० धावांनी धूळ चारली. भारताचा हा स्पर्धेतील दुसरा विजय ठरला, तर पाकिस्तानचा पहिला पराभव ठरला. ४६ चेंडूंत ४६ धावा आणि ३३ धावांत ३ बळी टिपण्याची किमया करणारा अष्टपैलू कनिष्क चौहान सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

पाकिस्तानने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. भारताने ४६.१ षटकांत सर्वबाद २४० धावा उभारल्या. प्रत्युत्तर देताना पाकिस्तानचा संपूर्ण संघ ४१.२ षटकांत १५० धावांतच गारद झाला.

आयुष म्हात्रे (३८) व वैभव सूर्यवंशीने २९ धावांची सलामी भागीदारी करत भारताच्या डावाची सुरुवात केली. वैभव वैयक्तिक ५ धावांवर खेळत असताना मोहम्मद सय्यमने त्याला आपल्याच गोलंदाजीत झेलबाद केले. त्यानंतर आयुष म्हात्रेने अॅरोन जॉर्जसोबत दुसऱ्या गड्यासाठी ४९ धावांची भागीदारी केली. मोहम्मद सय्यामच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी म्हात्रे २५ चेंडूंत ३८ धावांचे योगदान दिले. त्यानंतर अॅरोन जॉर्जने विहान मल्होत्रा (१२), वेदांत त्रिवेदी (७) व अभिमन्यू कुंडू (२२) व कनिष्क चौहानच्या साथीने संघाला दोनशे धावांचा उंबरठा ओलांडून दिला. अॅरोन जॉर्जने ८८ चेंडूंत ८५ धावांची खेळी केली, यात त्याने १२ चौकार व एक षट्कार हाणला.

कनिष्कने ४६ चेंडूंत ४६ धावांची भर घालत भारताची धावसंख्या मजबूत केली.

प्रत्युत्तर देताना पाकिस्तानकडून सहाव्या क्रमांकावरील फलंदाज हुझैफा अहानने तेवढी चिवट झुंज देत ८३ चेंडूंत ९ चौकार व २ षट्कारांसह ७० धावांची खेळी केली, मात्र इतर फलंदाज भारतीय गोलंदाजांसमोर फार वेळ टिकाव धरू शकले नाहीत. कर्णधार फरहान युसफ (२३) व सलामीवीर उस्मान खान (१३) हे दोघेच दोन अंकी धावा काढू शकले. एक फलंदाज शून्यावर, तर उर्वरित एक अंकी धावा काढून बाद झालेत.

भारताकडून फिरकीपटू कनिष्क चौहान व मध्यम गती वेगवान गोलंदाज दीपेश देवेंद्रनने प्रत्येकी ३ बळी टिपले. किशोर सिंगने २ बळी, तर खिलान पटेल व वैभव सूर्यवंशीने प्रत्येकी एक बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# भारताची दक्षिण अफ्रिकेवर ७ गडी राखून मात

**तिसऱ्या टी-२० सामन्यात २-१ ने आघाडी**

**अभिषेक-गिलची अर्धशतकीय भागीदारी**



**धर्मशाळा, दि. १४ डिसेंबर-**

भारताने टी-२० मालिकेतील तिसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ७ गडी राखून पराभव केला.

रविवारी धर्मशाला स्टेडियमवर झालेल्या सामन्यात नाणेफेक जिंकून भारताने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ ११७ धावांवर संपुष्टात आला. त्यांचे ३ गडी फक्त ७ धावांवर गेले. क्विंटन डी कॉक १ धाव, रीझा हेंड्रिक्स ० धावांवर आणि डेवाल्ड ब्रेव्हिस २ धावा यांचा समावेश आहे. या परिस्थितीत, एडेन मार्करमने एका बाजूने डाव सांभाळला. तर दुसऱ्या बाजूने गडी बाद होत होते. मार्करमने ६१ धावांची एकाकी झुंज दिली. त्याच्याशिवाय डोनावन फरेराने २० धावांचे योगदान दिले. भारताकडून अर्शदीप सिंग, हर्षित राणा, वरुण चक्रवर्ती आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. हार्दिक पंड्या आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

प्रत्युत्तरात, भारताने १५.५ षटकांत तीन बळीच्या मोबदल्यात ११८ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. शिवम दुबेने सलग चेंडूंवर एक चौकार आणि एक षटकार ठोकून संघाला विजय मिळवून दिला. तो १० धावांवर नाबाद राहिला. तिलक वर्मानेही नाबाद २६ धावा केल्या. कर्णधार सूर्यकुमार यादवने १२, अभिषेक शर्माने ३५ आणि शुभमन गिलने २८ धावा यांनी संघाच्या विजयात साथ दिली. भारताच्या सलामीवीरांनी शानदार सुरुवात केली. अभिषेक-गिल जोडीने ३१ चेंडूंत ६८ धावांची भागीदारी केली. अभिषेक बाद झाल्यानंतर आलेल्या तिलक वर्माने (१८ चेंडूत ३५ धावा) भारताला विजय मिळवून दिला.

# वालचंद शिक्षक व शिक्षकेतर संघांचे दणदणीत विजय

### श्रीमान भाऊसाहेब गांधी स्मृती चषक क्रिकेट स्पर्धा



**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

श्रीमान भाऊसाहेब गांधी स्मृती चषक क्रिकेट स्पर्धेत वालचंद शिक्षक व शिक्षकेतर संघांचे दणदणीत विजय मिळविले.

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी क्रीडांगणावर रविवारी झालेल्या पहिल्या सामन्यात वालचंद नॉन टीचिंग संघाने जैन गुरुकुल प्रशाला संघावर ९ गडी राखून दणदणीत विजय मिळवला. या सामन्याची नाणेफेक जैन गुरुकुल प्रशालेचे मुख्याध्यापक राजकुमार काळे यांच्या हस्ते झाले. नाणेफेक जिंकून वालचंद नॉन टीचिंग संघाने प्रथम गोलंदाजी स्वीकारली. जैन गुरुकुल प्रशाला संघाने ८ षटकांत ६ विकेट गमावत ९७ धावा केल्या. संघाकडून सागर शहा यांनी नाबाद ७२ धावांची देखणी खेळी केली.

प्रत्युत्तरात वालचंद नॉन टीचिंग संघाने अत्यंत आत्मविश्वासपूर्ण फलंदाजी करत अवघ्या ६.५ षटकांत १ विकेट गमावत १०१ धावांचे लक्ष्य सहज पार केले. संघाच्या विजयात समाधान कासार याने नाबाद ६५ धावांची निर्णायक खेळी करत मोलाचा वाटा उचलला.

दुसऱ्या सामन्यात वालचंद टीचिंग संघाने वालचंद पीजीयुजी संघावर १७ धावांनी विजय मि ळवत स्पर्धेतील आपले आव्हान भक्कम केले. याची नाणेफेक एमबीए विभागप्रमुख डॉ. प्रीतम कोठारी यांच्या हस्ते झाली. नाणेफेक जिंकून वालचंद टीचिंग संघाने प्रथम फलंदाजी करत ८ षटकांत ५ विकेट गमावत ८९ धावा केल्या. संघाकडून प्रसन्नकुमार पल्ली यांनी ४० धावांची संयमी खेळी केली. लक्ष्याचा पाठलाग करताना वालचंद पीजीयुजी संघाने जोरदार प्रयत्न केले; मात्र ८ षटकांत ५ विकेट गमावत संघाला केवळ ६४ धावांपर्यंतच मजल मारता आली. संघाकडून परमेश्वर कांबळे यांनी ३६ धावा केल्या; मात्र त्या विजयासाठी अपुऱ्या ठरल्या.




# वकिलांच्या क्रिकेट स्पर्धेस सुरुवात

**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

काकासाहेब थोबडे प्रतिष्ठानने सोलापुर बार असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या सोलापूर जिल्ह्यातील वकिलांच्या कै. काकासाहेब थोबडे स्मृती करंडक जिल्हा क्रिकेट स्पर्धेस नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर सुरुवात झाली.

या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील ३० क्रिकेट संघ त्यामध्ये २ महिला क्रिकेट संघांनी भाग घेतला आहे. याचे उद्घाटन सोहळा वेदा बँक्विट्स येथे कार्यक्रमाचे उद्घाटक मुंबई उच्च न्यायालयातील जेष्ठ विधिज्ञ विनीत नाईक यांच्या हस्ते झाले. यावेळी अॅड. जयंत जायभावे, सोलापुर बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. बाबासाहेब जाधव, अॅड. रियाज शेख, अॅड. बसवराज हिंगमिरे, अॅड अरविंद देडे, अॅड. मीरा प्रसाद यांच्यासह ५०० वकिलांची उपस्थिती होती. यावेळी खेळाडूंसाठी देण्यात येणाऱ्या टी शर्ट व पारितोषकांचे अनावरण करण्यात आले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष अॅड. मिलिंद थोबडे यांनी प्रास्ताविक केले. अॅड. शरद पाटील व अॅड मनोज पामूल यांनी सूत्रसंचालन केले. प्रतिष्ठानचे सचिव अॅड रितेश थोबडे यांनी आभार मानले.,

# खो-खो स्पर्धेत पिसेवाडी शाळेस विजेतेपद

### माळशिस तालुका क्रीडा स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**

**वेळापूर, दि. १४ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा परिषद अंतर्गत माळशिरस तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत मुलांच्या गटात पिसेवाडी शाळेने विजेतेपद पटकाविले. नातेपुते बीट मधील झालेल्या अंतिम सामन्यात पिसेवाडी संघाने पिसे वस्तीवर पाच गुणांनी विजय मिळविला. पंधरा वर्षांपासून विजयाची परंपरा पिसेवाडीने आपल्याकडे कायम ठेवली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिसेवाडी येथे या स्पर्धेचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अण्णासाहेब शेंडे, उपाध्यक्ष अमोल राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बीटविस्ताराधिकारी सिद्धेश्वर भरते, केंद्र प्रमुख बापूसाहेब नाईकनवरे, विठ्ठलराव काळे, बाळासाहेब लावंड, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आबासाहेब पिसे, मुख्याध्यापक जालिंदर बनकर आदींच्या उपस्थिती होते. विजेत्या व उपविजेत्या संघांना पं स. माळशिरसकडून प्रमाणपत्र व ट्रॉफी तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अण्णासाहेब शेंडे यांच्याकडून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा व ट्रॉफी देण्यात आली. पंच म्हणून श्री. अजित व एस के, लखन कांबळे, सुरज शेवाळे, संजय देवकते, वीरेंद्र पत्की, फडणीस जरक, विजय दोलतोडे यांनी काम पाहिले. या स्पर्धा पार पाडण्यासाठी सयाजी माने, कृष्णदेव तुपे, प्रशांत चिंचकर, प्रशांत पाटील, सारिका शिंदे, अवंती सिंदफळकर आदींनी परिश्रम घेतले.

**विजेता संघ :** पवन पिसे, आदित्य जानकर, तन्मय पिसे, सनी जाधव, महेश पिसे, ओम पिसे,प्रथमेश पिसे, सोहम पिसे स्वराज पिसे, रणवीर पवार, कार्तिक भानवसे, संभव राऊत.

# राज्य सॉफ्टफुटबॉलमध्ये सोलापूर शहरला विजेतेपद, ग्रामीण उपविजेता

### डॉजबॉल, टेनिस व्हॉलीबॉल, पेंटॅक्यू ,सॉफ्टफुटबॉल या चारही खेळांचे बक्षीस वितरण प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते संपन्न



**तभा वृत्तसेवा,**

**अक्कलकोट, दि. १४ डिसेंबर-**

राज्य सॉफ्टफुटबॉलमध्ये सोलापूर शहरने विजेतेपद पटकावलेले. सोलापूर ग्रामीण संघास उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट व सोलापूर जिल्हा सॉफ्ट फुटबॉल, टेनिस व्हॉलीबॉल, पेंटॅक्यू व डॉजबॉल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने सब ज्युनियर ज्युनियर व सीनियर राज्यस्तरीय स्पर्धा येथे संपन्न झाली. या स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ युवा नेते प्रथमेश इंगळे, कारीगर पेट्रोल पंप प्रोप्रायटर सचिन किरनळी, डॉजबॉलचे राज्यसचिव शिवछत्रपती पुरस्कार विजेते एकनाथ साळुंके, पेंट्याकूचे राज्य सचिव प्रदीप साखरे, टेनिस व्हॉलीबॉल राज्यसचिव गणेश माळवे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

या स्पर्धेचे आयोजन व नियोजन संयोजन समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, जिल्हा सचिव व सॉफ्टफुटबॉल खेळाचे जनक प्रा.संतोष खेंडे ,खजिनदार गंगाराम घोडके, उपाध्यक्ष वसीम शेख, इकबाल दलाल, परमेश्वर व्हसुरे संचालक श्रीधर गायकवाड, रवींद्र चव्हाण, प्रबुद्ध चिंचोलीकर , संतोष पाटील, प्रशांत कदम, सिताराम भांड सागर जगझाप यांनी केले.

**अंतिम निकाल**

**(प्रथम तीन) : डॉजबॉल**

सब ज्युनिअर मुले : जालना, नाशिक, रायगड. मुली : छत्रपती संभाजीनगर, रायगड शहर, रायगड ग्रामीण. महिला : छत्रपती संभाजी नगर, रायगड, जालना. पुरुष : संभाजीनगर, रायगड, जालना

**सॉफ्टफुटबॉल**

ज्युनियर मुले : सोलापूर शहर, सोलापूर ग्रामीण, परभणी. मुली : सोलापूर शहर, सोलापूर ग्रामीण, लातूर.

**पेंटॅक्यू**

सब ज्युनियर मुले : एकेरी-जळगाव, परभणी. दुहेरी-जळगाव, परभणी. तिहेरी-जळगाव, परभणी. मिश्र दुहेरी-जळगाव, परभणी. शूटिंग : सबज्युनियर मुले- जळगाव, परभणी. एकेरी-ठाणे, लातूर, अहिल्यानगर. दुहेरी-ठाणे, लातूर, अहमदनगर. तिहेरी-लातूर, ठाणे, अहिल्यानगर. मिश्र दुहेरी-लातूर, जळगाव. अहिल्यानगर.पुरुष : ठाणे, लातूर, अहिल्यानगर.

**टेनिस व्हॉलीबॉल**

मिनी गट मुले : सांगली ग्रामीण, ठाणे, पुणे. मुली : सांगली शहर, लातूर, बुलढाणा. मिश्र दुहेरी- पुणे, ठाणे, नाशिक. युथ मुले- पुणे, नासिक, मुंबई सब. मुली- सांगली शहर, बीड, नाशिक. मिश्र दुहेरी- पुणे, सांगली ग्रामीण, मुंबई उपनगर.



# संगमेश्वर कॉलेजच्या राष्ट्रीय पदक विजेत्या खेळाडूंचा सत्कार

**सोलापूर, दि. १४ डिसेंबर**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांच्या मार्फत झालेल्या स्पर्धेमध्ये संगमेश्वर कॉलेजचे सात राष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडूंचा सत्कार श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी यांच्या हस्ते करण्यात आला. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते, प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. **कामगिरी :** विनीत दिनकर (नांदेड येथे राज्यस्तरीय आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवात १००, २०० मीटर धावणे व ४ बाय १०० मीटर रिलेमध्ये सुवर्ण). तनुजा पवार (खेलो इंडिया तायकांदो स्पर्धेमध्ये सुवर्ण), कांचन चौगुले व शर्वरी वाघमोडे ( ग्वाल्हेर येथे झालेल्या या दोघींनी इंटर युनिव्हर्सिटी वेस्ट झोन स्पर्धेमध्ये रौप्य). श्रद्धा दिवटे ( खेलो इंडिया १० मीटर रायफल शूटिंग स्पर्धेत कांस्य) आकृती सोनकुसरे ( खेलो इंडिया स्पर्धेम ध्ये लॉन टेनिस स्पर्धेत सुवर्ण). विपुल कुडक्याल ( शालेय राष्ट्रीय डायव्हिंग एक मीटर स्प्रिंग बोर्ड स्पर्धेमध्ये कांस्य).

## महत्वाचे...



### स्प्रिंट फोर आपत्कालीन प्रकल्पातून होतेय रुग्णसेवा

**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा स्प्रिंग फोर सी.इ. महाराष्ट्र पूर आपत्कालीन प्रतिसाद प्रकल्प अंतर्गत व सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य विभाग, सोलापूर जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय मदत कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर, इंडियन रेड क्रॉस सोसायटी व भारतीय जैन संघटना यांच्या सहकार्याने सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त गावांमध्ये प्रजनन आरोग्य व कुटुंब कल्याणाच्या आरोग्य सेवा देण्याचे कार्य सुरू करण्यात आले आहे. संजवाड या पूरग्रस्त गावातील गरोदर व स्तनदा माता, महिला, पुरुष व युवा मुले, मुली, किशोरवयीन मुला मुलींना, वयोवृद्ध, विधवा, अपंग, अंध, मतिमंद, शारीरिक वाढ खुंटलेली मुले यांना प्रजनन आरोग्याच्या सेवा ८६ लोकांना देण्यात आल्या. कुटुंब नियोजनाची निरोध व आपत्कालीन गर्भनिरोधक गोळ्या वाटप आदी सेवा, युरीन प्रेग्नेंसी टेस्ट, गरोदर व स्तनदा तपासणी, स्त्रीरोग तपासणी उपचार, स्तनाचा व गर्भाशयाच्या कॅन्सरची तपासणी, लिंगभेद आधारित हिंसाचार समुपदेशन, मूत्रमार्गा विकार तपासणी व उपचार, गुप्तरोग तपासणी व एचआयव्ही तपासणी व उपचार, जनरल तपासणी व उपचार, लहान बाळांचे लसीकरण आधी आरोग्य सेवा दिल्या जात आहेत, असे डॉ.श्रीकांत येळेगावकर, डॉ. एन. बी. तेली, सुगतरत्न गायकवाड यांनी सांगितले. प्रकल्प समन्वयक स्वप्निल सोनवणे, डॉ. गौरी कहाते, रेखा पाटील-कपाळे, शकीला मणियार, व्यंकटेश कंची, मल्लिकार्जुन कडकोळ यांच्यासह अविनाश कांबळे, सुनीता पाटील, जिया शेख, कीर्ती ढंगापुरे आदी कर्मचारी सेवा देत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त गावांमध्ये आरोग्य तपासणी शिबिरांच्या आयोजनात डॉ. कल्पना आपटे, असिस्टंट डायरेक्टर जनरल प्रोग्राम अमिता धानू व प्रकल्प प्रमुख डॉ. अमित किटूकले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, डॉ. किशोर घाडगे, डॉ. मोहन शेगर, डॉ. अविनाश खांडेकर, डॉ.अश्विन करजखेडे, महेश भोरे, सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, साहाय्यक अधिकारी अर्चना बिसोई आदींचे मार्गदर्शन लाभत आहे.

## निधन वृत्त...


### प्रभूलिंग सोन्ना-भोगडे



**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

देगाव येथील वीरशैव लिंगायत समाजातील प्रतिष्ठित प्रभूलिंग मल्लिकार्जुन सोन्ना-भोगडे (वय ७४) यांचे आज अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले, दोन मुली व नातवंडे असा परिवार होता. त्यांच्या पार्थिवावर रविवार सायंकाळी तुळजापूरवेस येथील लिंगायत रुद्रभूमीत करण्यात आले.

### डॉ.अशोक गांधी



**माळिशरस, दि. १४ डिसेंबर-**

येथील डॉ.अशोक गांधी (वय ९० वर्षे) यांचे निधन झाले .त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, जावई, नातू असा परिवार आहे. डॉ. अशोक गांधी यांनी माळिशरस, सदाशिवनगर मध्ये ६० ते ६५ वर्षे वैद्यकीय सेवा केली.

### श्रीकांत कटारे



**अक्कलकोट, दि.१४ डिसेंबर-**

येथील प्रसिध्द कापड व्यापारी श्रीकांत विठ्ठल कटारे (वय-६७) यांचे अल्पशा आजाराने शनिवारी निधन झाले. त्यांच्या पार्थीवावर रविवारी हिंदू स्मशानभुमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजातील सर्व स्तरातील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते.

### चंद्रलेखा पाटील



**बार्शी, दि. १४ डिसेंबर-**

बार्शीतील चंद्रलेखा शहाजीराव पाटील यांचे शनिवार १३ डिसेंबर रोजी रात्री वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर रविवारी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुली, एक मुलगा, सून व नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार धैर्यशील शहाजीराव पाटील यांच्या त्या मातोश्री होत.

# शक्तीपीठ महामार्ग आरेखनात सोलापूर जिल्ह्यात बदल करू नका

**सांगोला तालुक्यातील समर्थक शेतकऱ्यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१४ डिसेंबर -**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका टीव्ही चॅनलवर मुलाखत देतेवेळी शक्तीपीठ महामार्गाबाबत धाराशिव पर्यंतचे काम मूळ आरेखनानुसार होणार असून पुढील काम म्हणजेच धाराशिव, सोलापूर, सांगली व कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये थोड्या प्रमाणात रस्ता करण्यास विरोध असल्यामुळे त्याचे आरेखनात बदल करणार असल्याची कबुली दिली आहे. तरी शक्तीपीठ महामार्ग आरेखनात सोलापूर जिल्ह्यात बदल करू नका अशी मागणी सांगोला तालुक्यातील समर्थन करणाऱ्या बाधित शेतकऱ्यांनी रविवार दि.१४ डिसेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये केली.



नागपूर-पत्रादेवी-गोवा शक्तीपीठ महामार्ग महाराष्ट्रातील बारा जिल्हयातून जात असून त्याबाबतचे आरेखण यापूर्वी महाराष्ट्र शासनाने राजपत्र जाहिर करुन वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दीकरण केले होते. त्यान्वये सदर आरेखनाचे काम मोनार्क या कंपनीने केले असून संबंधित रस्त्याच्या खुणा शेतकऱ्यांच्या जागेवर जावून प्रत्यक्ष खांब उभा करून केलेले आहेत. त्यानुसार सदर बाधित शेतकऱ्यास उपअधिक्षक भूमि अभिलेख यांचे मार्फत नोटीसद्वारे कळवून ७५ ते ८० टक्के मोजणीचे काम पूर्ण केले आहे. त्याचप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर व मोहोळ या तालुक्याच्या मोजण्या पूर्ण होऊन बार्शी व सांगोला तालुका पुर्णत्वाच्या दिशेने मोजणीचे काम होत आलेले आहे. तसेच संबंधित भूसंपादन अधिकारी यांनी स्वतः जातीने लक्ष देऊन उर्वरित मोजणीची कामे पूर्ण करण्यात कुठेही हरकत, अडथळा असणार नाही असे मत सांगोला तालुक्यातील शक्तीपीठ महामार्ग समर्थन करणाऱ्या बाधित शेतकऱ्यांनी यावेळी व्यक्त केले.

> मूळ आरेखनामध्ये कोणत्याही स्वरुपाचा बदल न करता जीएमआर पूर्ण करुन सदर रस्ता करण्याबाबत शेतकऱ्यांची पूर्णपणे संमती आहे. अगर बदल केल्यास आम्ही संबंधित भूसंपादन अधिकारी यांचे कार्यालयात जावून आत्मदहन करण्याचा इशारा शक्तीपीठ महामार्ग समर्थन करणाऱ्या बाधित शेतकऱ्यांनी यावेळी दिला.



## भाजप विचारधारेतून सामान्यांचे प्रश्न सोडवणार : वैभव मोरे

**मोरे यांचा रणजित शिंदे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये पक्षप्रवेश**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.१४ डिसेंबर-**

पक्षप्रवेशाचा निर्णय हा विकास, संघटनात्मक बळ आणि जनहिताच्या कामासाठी घेतला आहे. भाजपच्या विचारधारेत काम करताना सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देणार असल्याचे मत वैभव मोरे यांनी व्यक्त केले.मोडनिंब (ता. माढा) येथील शिवसेना शिंदे गटाचे माढा तालुकाध्यक्ष वैभव मोरे यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. भाजप नेते तथा सोलापूर जिल्हा सहकारी दूध संघाचे चेअरमन रणजित शिंदे यांच्या उपस्थितीत हा प्रवेश झाला. यावेळी शिवाजी कांबळे, कैलास तोडकरी, राहुल पाटील, धनाजी लादे, प्रशांतराजे पाटील, राहुल गांधी, शहाजी माळी, सुनील पंडित, संपत महामुनी, अजय चोपडे, चांगदेव वरवडे, सत्यनारायण गिड्डे, संतोष पाटील, राहुल केदार, सोमनाथ टिंगरे, विजयकुमार परबत आदी उपस्थित होते.

## रूईत एकता महिला मंचचा सक्षमीकरण मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग,दि.१४ डिसेंबर-**

रुई (ता.बार्शी) येथील एकता महिला मंचच्या वतीने दि. १४ डिसेंबर रोजी एकता महिला मंचच्या सदस्यांसाठी विशेष मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. महिला क्षमीकरण, व्यसनमुक्ती आणि उद्योग या विषयांवर सखोल मार्गदर्शन या मेळाव्यात करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाले. यावेळी व्यसनमुक्ती तज्ञ डॉ. संदीप तांबारे, मानसोपचार तज्ञ डॉ. मृणाली मोरे, एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर, भाग्यश्री पावले, स्वाती चव्हाण, स्वाती भोसले, क्रांती पाटील, सोनाली भोसले, पल्लवी भोसले, ज्योती चाबुकस्वार, सुशीला जगताप, सुवर्णा पवार, शुभांगी निकम, वंदना चाबुकस्वार, विद्या भोसले, शितल पवार, राधा पाटेकर, सरिता फाटके, सुलक्षणा चाबुकस्वार, सुवर्णा पवार, संध्या भोसले, वर्षा भोसले, अशा भोसले, माधुरी भोसले, अनिता घोडके, राजेश्री चव्हाण, रूपाली कापसे, निकिता कापसे व अन्य सदस्यांची लक्षणीय उपस्थिती होती. डॉ. तांबारे यांनी त्यांच्या मार्गदर्शनात महिलांच्या जीवनातील तीन महत्त्वाच्या पैलूंवर सखोल भाष्य केले. महिला सक्षमीकरण म्हणजे केवळ आर्थिक स्वातंत्र्य नव्हे, तर निर्णय घेण्याची क्षमता आणि आत्मविश्वास वाढवणे होय. प्रत्येक महिलेने आपल्या हक्कांबाबत जागरूक असले पाहिजे आणि समाजाच्या प्रगतीसाठी सक्रिय भूमिका घेतली पाहिजे. महिलांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता, आपल्या अंगी असलेल्या कौशल्यांचा उपयोग करून स्वतःचे छोटे उद्योग सुरू करावेत. शासनाच्या विविध योजनांची माहिती घेऊन, आत्मविश्वासपूर्वक व्यवसाय सुरू केल्यास आर्थिक स्वातंत्र्य मिळवणे सहज शक्य आहे. लघुउद्योग, बचतगट आणि कुटीर उद्योगांच्या माध्यमातून महिला कशा प्रकारे कुटुंबाला हातभार लावू शकतात, यावर त्यांनी अनेक प्रेरक उदाहरणे दिली. डॉ. तांबारे यांनी महिलांना आवाहन केले की, त्यांनी समाजाला व्यसनमुक्त व सशक्त बनविण्यात पुढाकार घ्यावा. मानसोपचार तज्ञ डॉ. मृणाली मोरे यांनी महिलांना त्यांच्या मानसिक आरोग्य आणि कल्याणाविषयी विशेष मार्गदर्शन केले. त्यांनी इतर विविध महत्त्वाच्या विषयांवरही सविस्तर माहिती दिली. क्रांती पाटील यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. सोनाली भोसले यांनी आभार मानले.

## डिवचणाऱ्यांना भारत आता सोडणार नाही

**संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ : सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ डिसेंबर-**

भारत भूमी छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर आणि राणी लक्ष्मीबाई यांच्या शौर्याची, सनातनी संस्कृतीची आहे. दुर्दैवाने मागील ६० ते ६५ वर्षांत आपल्याला अकबर-बाबरसारख्या आक्रमकांना 'महान' म्हणत गुलामगिरीच्या मानसिकतेत बंदिस्त केले गेले. गुलामगिरीची ती सारी चिन्हे आणि बेड्या पूर्णपणे तोडल्या जात आहेत. आता नवीन भारत जागा झाला आहे. जो कुणापुढेही झुकत नाही आणि 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये आपल्या सैनिकांनी दाखवलेले शौर्य जगासमोर सिद्ध झाले आहे. आता भारताला डिवचणाऱ्याला आम्ही सोडत नाही, असे प्रतिपादन केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांनी केले.



नवी दिल्ली येथील भारत मंडपम् येथील 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'तील 'राष्ट्रीय सुरक्षितेत सामाजिक-सांस्कृतिक संस्थांचे योगदान' या विषयावर ते बोलत होते. सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ अधिवक्ता श्रीधर पोतराजू म्हणाले, 'श्रीराम मंदिरासाठी हिंदूंनी न्यायालयाबाहेर दिलेला लढा अपूर्व आहे; मात्र आम्ही अधिवक्त्यांनी त्याविषयी न्यायालयात दिलेला लढा म्हणजे श्रीरामाने आम्हा सर्वांसाठी दिलेली त्याच्या अस्तित्वाची अनुभूतीच आहे. श्रीरामाच्या कृपेमुळेच ऋषितुल्य ज्येष्ठ अधिवक्ता केशव परासरन् यांनी वयाच्या ९२ व्या वर्षीही हा लढा जोमाने दिला. त्यांच्यात दुर्दम्य श्रद्धा निर्माण करणाराही श्रीरामच होता. यावेळी श्रीराम सेनेचे संस्थापक प्रमोद मुतालिक म्हणाले, कर्नाटकातील चिक्कमंगळुरू येथून ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या दत्तपिठाच्या ठिकाणी श्री गुरु दत्तात्रेयाने साधना केली होती; मात्र टिपू सुलतानने तेथे बाबा बुडन दर्गा स्थापन केला. त्यानंतर तेथील शेकडो एकर परिसराचे मजारी, थडगी, दफनभूमी, दर्गा, गोमांसभक्षण यामुळे इस्लामीकरण झाले होते; मात्र गेली ३० वर्षे विश्व हिंदु परिषद, श्रीराम सेना आणि हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी केलेली आंदोलने आणि दिलेला न्यायालयीन लढा यांमुळे ९० टक्के परिसर दत्तभक्तांचा बनला आहे. आता शुक्रवारी नमाजपठण करायला मौलवी येतो. तेही लवकरच न्यायालयाच्या आदेशाने बंद होईल. हिंदु जनजागृती समितीचे महराष्ट्र व छत्तीसगडचे संघटक व मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनिल घनवट म्हणाले, मंदिरे ही हिंदु धर्माची आधारशीला आहेत. 'मंदिर महासंघा'ने १५ हजार मंदिरांचे संघटन केले आहे. त्यातून २ हजार ३०० हून अधिक मंदिरांमध्ये वस्त्रसंहिता लागू आहे. ऑस्ट्रेलियासारख्या देशातही वस्त्रसंहिता लागू झाली आहे. मंदिरे ही धर्मशिक्षणाची केंद्रे होण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे प्रत्येक आठवड्याला २० हजार हिंदू आरतीसाठी एकत्र येतात. त्यामुळे त्यांचे रक्षण करण्यासाठी एक होणे हे आपले धर्मकर्तव्यच असल्याचे घनवट यांनी सांगितले. पत्रकार श्वेता त्रिपाठी यांनी या सत्राचे सूत्रसंचालन केले.

## शिस्तीमुळेच ओळखला जातो संघ व स्वयंसेवक

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हटले की शिस्त ही आलीच. संघाचे हितचिंतक असो अथवा कट्टर विरोधक, या दोघांमध्ये देखील संघाच्या शिस्तीबद्दल निश्चितच एकमत होईल. राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांचा संचय संघ शाखेच्या माध्यमातून स्वयंसेवकांमध्ये निर्माण करत असताना सर्वात प्रथम शिस्तीचा विचार केला गेला आहे.

संघ शाखा असो, बैठकीचे ठिकाण असो अथवा स्वयंसेवकाचे घर असो, या प्रत्येक ठिकाणी पायातील चपला - पादत्राणे - बूट एका रांगेत ठेवलेली असतात. अशा अत्यंत छोट्या गोष्टींपासून संघ स्वयंसेवकातील शिस्त दिसून येते. संघ शाखेवरील निरनिराळे कार्यक्रम, उपक्रम, व्यायाम, खेळ, बौद्धिक चर्चा, पद्य या सर्वातून शिस्त अंगी बाणवली जाते. बौद्धिक कार्यक्रम, परिसंवाद, गटचर्चा यातून शिस्तीचा संस्कार केला जातो. सहकारी कार्यकर्त्यांबरोबर होणारा प्रवास, कार्यक्रम करत असताना एकमेकांबरोबर येणारा संबंध, निवासी अथवा अनिवासी प्रशिक्षण वर्गातून मिळणारा सहवास यातून शिस्तीचे महत्व स्वयंसेवक समजावून घेतात व शिस्तीतूनच आपण आपले ध्येय गाठू शकतो यावरचा त्यांचा विश्वास दृढ होत जातो. आपण ज्या बैठकीला अपेक्षित आहोत तेथेच उपस्थित राहिले पाहिजे, अकारणपणे कोणतीही गोष्ट करणे योग्य नाही, मला जे काम सांगितले आहे ते महत्त्वाचे असो अथवा दुय्यम दर्जाचे असो ते प्रामाणिकपणे पार पाडले पाहिजे, एखादी जबाबदारी देताना मला हे काम जमणार नाही ते बदलून द्यावे अशी आपली वृत्ती ठेवून चालणार नाही अशा अनेक गोष्टी संघ कार्यपद्धतीतून स्वयंसेवक सहजपणे शिकत जातात. संघाच्या गणवेशापासून समाजातील संपर्कापर्यंत प्रत्येक गोष्टीमध्ये मर्यादा पालन करून वागले पाहिजे, बोलले पाहिजे, काही गोष्टी करायच्या टाळल्या पाहिजेत या गोष्टी स्वयंसेवक आपल्या वर्तनातून दाखवून देतात, त्यामुळेच स्वयंसेवकातील शिस्त ही सामान्य जनतेच्या नजरेत भरते व ते स्वयंसेवक आदरास पात्र ठरतात. कामामध्ये शिस्त असेल तर ते काम उत्कृष्टपणे पार पडते ही गोष्ट अनेकदा समाजाच्या नजरेत येते याचे कारण म्हणजे स्वयंसेवक प्रत्येक गोष्ट शिस्तबद्धरित्या करतात. अनेकदा एखादी गोष्ट मनाविरुद्ध करणे अथवा आवडत नसताना देखील करणे या गोष्टी शिस्तबद्ध स्वयंसेवक कोणत्याही तक्रारीविना करतात. शिस्त पाळत असताना मानसिक स्तरावरील समर्पण देखील स्वयंसेवकाला करावे लागते. शरीर व मनाला शिस्त लागल्यामुळे वेळेच्या पालनापासून समाज व राष्ट्राचे अहित होईल अशा कोणत्याही गोष्टी न करण्यापर्यंत स्वयंसेवक मर्यादांचे पालन करताना दिसून येतात. संघ म्हणजे शिस्त हे समीकरण हजारो - लाखो - कोट्यवधी स्वयंसेवकांनी आपल्या आचरणातून निर्माण केले आहे.

**मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग - १२**
**- डॉ. सचिन लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख रा.स्व.संघ.**
**मो.क्र.७५८८२१६५२६**

### शिस्तीमध्ये घडलेल्या स्वयंसेवकांचे समाजाप्रती योगदान

आपले राष्ट्र घडवायचे असेल, उन्नत बनवायचे असेल तर शिस्तबद्ध नागरिकच हे करू शकतात. संघाचे शिस्तबद्ध स्वयंसेवक गेली शंभर वर्षे हे राष्ट्र घडवण्याचे काम करीत आहेत. अनेक आपत्तीच्या प्रसंगातून देशाला ही गोष्ट प्रत्ययाला आली आहे. संघ कार्यकर्ते आपल्या शरीर व मनाला शिस्त लावून घेतात व या शिस्तीच्या बळावर समाजाच्या कोणत्याही क्षेत्रात काम करत असताना ते उत्कृष्ट करतात. एखादा स्वयंसेवक शासकीय नोकरीत असेल तर त्या कार्यालयातील इतर सर्व कर्मचाऱ्यांपेक्षा स्वयंसेवक कर्मचाऱ्याचे काम हे निश्चितच उजवे असते. एखादा स्वयंसेवक शिक्षक म्हणून नोकरी करत असेल तर तो अत्यंत समर्पित भावनेने काम करतानाच दिसून येईल. एखादा स्वयंसेवक व्यापारी असेल तर तो सचोटीच्या मार्गानेच व्यापार करेल, असे आपल्याला अनेक - अनेक उदाहरणातून दिसून येईल. याचाच अर्थ स्वयंसेवक केवळ संघाचे काम शिस्तबद्ध रितीनेच करतात असे नाही तर समाजाच्या भल्यासाठी जे काम करायला हवे ते-ते सर्व काम शिस्तीत करतात.

आपल्या उद्योग व्यवसायामध्ये, नोकरीमध्ये अथवा अर्थार्जन करणाऱ्या कोणत्याही कार्यामध्ये स्वयंसेवक समाजाचे व राष्ट्राचे हित पाहूनच आपली सेवा देताना दिसून येतात. असे स्वयंसेवक सार्वजनिक कामांमध्ये देखील याच पद्धतीचा व्यवहार करतात. आपल्या हातून कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची सतत काळजी घेत स्वयंसेवक आपले योगदान देताना दिसून येतात. समाज व राष्ट्रावर ज्या - ज्या वेळी संकट आले त्या - त्या वेळी स्वयंसेवक निस्वार्थ भावनेने केवळ धावूनच जात नाहीत तर जे काम करावे लागेल ते संकोच न बाळगता समर्पण वृत्तीने करतात व यातून त्या आपत्तीमध्ये अनेकांना मदत होते. वेगवेगळ्या आपत्तीप्रसंगी ढिगारे उपसून मृतदेहांचा शोध घेण्यापासून त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यापर्यंत व स्वतःचा जीव धोक्यात घालून आपतग्रस्तांना मदत करण्यापर्यंत सर्व गोष्टी स्वयंसेवक अत्यंत निस्वार्थीपणाने प्रसिद्धीपासून दूर राहून करतात, याचे कारण म्हणजे संघाची शिस्त होय. आपल्या वागण्या - बोलण्यातून समाजामध्ये द्वेष - तेढ निर्माण होणार नाही, गट - तट तयार होणार नाहीत याची देखील स्वयंसेवक काळजी घेताना दिसून येतात. प्रत्येक ठिकाणी मागे राहून आपले काम कर्तव्य भावनेने करणाऱ्या शिस्तबद्ध स्वयंसेवकांचे योगदान हे खरोखरच आदर्शवत व प्रेरणादायी असेच आहे. संघ स्वयंसेवकांनी शिस्तीचा आदर्शच भारतीय समाजासमोर ठेवला आहे. संघाच्या कार्यपद्धतीतून निर्माण झालेल्या शिस्तबद्ध स्वयंसेवकांमुळे समाजातील अनेक समस्या आजपर्यंत मार्गी लागल्या आहेत व आजही देशभर चालणाऱ्या दोन लाखांपेक्षा अधिक सेवा प्रकल्पातून समाज व राष्ट्राचे भले करण्याचा प्रयत्न होतो आहे, असे स्वयंसेवक समाजाचा खरोखरच आधार आहेत.

**- डॉ.सचिन वसंतराव लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख, रा.स्व.संघ**
**मो.क्र.७५८८२१६५२६**

## अद्ययावत ऑर्थोकेअर सुविधेचे व एआय इनोव्हेशन लॅबचे अनावरण

**संचेती हॉस्पिटलची ६० वर्षे पूर्ण**

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि.१४ डिसेंबर-**

भारतात आर्थोपेडिक केअर मध्ये सर्वांत विश्वसनीय संस्थांपैकी एक असलेल्या संचेती हॉस्पिटलची ६० वर्षे पूर्ण झाली असून त्यानिमित्ताने भविष्यकेंद्रित उपक्रमांची घोषणा करण्यात आली.त्यामध्ये अद्ययावत ऑर्थोकेअर सुविधा,एआय इनोव्हेशन लॅब, एआय चलित डायग्नोस्टिक्स व रिहॅबिलिटेशन सुविधेमध्ये विस्तार,गरजू रुग्णांपर्यंत पोहचण्यासाठी मोबाईल ऑर्थो केअर युनिटस आणि एआय ने प्रेरित सॅनबो मॅस्कॉटचे अनावरण या सर्व उपक्रमांचा समावेश आहे.



पद्मश्री,पद्मभूषण व पद्मविभूषण डॉ.के. एस.संचेती यांनी या संस्थेची स्थापना १२ डिसेंबर १९६५ ला केली. १० बेडसच्या छोट्या रूग्णालयापासून ते दरवर्षी लाखो रुग्णांवर उपचार करण्याच्या क्षमतेपर्यंत रूग्णालयाने प्रवास केला आहे.मोबिलिटी इज डिग्निटी या तत्त्वाद्वारे संचेती हॉस्पिटलने अस्थिरोगशास्त्र,पुर्नवसन,संशोधन आणि वैद्यकीय शिक्षणात आपला ठसा उमटवला आहे. गेल्या ६ दशकांमध्ये हॉस्पिटलने सांधेरोपण,मणक्याचे उपचार,बाल अस्थिरोग शास्त्र,ट्रॉमा,स्पोर्ट्स मेडिसिन,ऱ्हुमॅटोलॉजी, न्युरो रिहॅबिलिटेशन आणि इतर उपशाखांमध्ये व्यापक सेवा परिसंस्था निर्माण केली आहे.भारत आणि भारताबाहेरील रूग्णांसाठी संचेती हॉस्पिटल हे गुंतागुंतीच्या अस्थिरोग परिस्थितीवर उपचारासाठी रेफरल सेंटर म्हणून नावलौकिक कमावले आहे. सहा दशकांचा हा महत्त्वाचा टप्पा पार करत असताना संचेती डव्हान्स्ड ऑर्थोकेअर हॉस्पिटल ही नवीन १५० बेडसची सुविधा सुरू करण्यात आली असून यामुळे पायाभूत सुविधा आणि वैद्यकीय उपचार क्षमतेमध्ये विस्तार झाला आहे.या नवीन सुविधेमध्ये अद्ययावत निदान,बहुशाखीय उपचार,अद्ययावत रोबोटिक रिहॅबिलिटेशन आणि स्पेशालिटी क्लिनिक्सचा समावेश आहे.या नवीन सुविधेसह संचेती हॉस्पिटलची आता एकत्रित क्षमता ३०० बेडसपर्यंत पोहचली आहे. हा टप्पा गाठत असताना भविष्यातील वाटचालीसाठी संचेती आर्टिफिशियल इंटेलिजन्स विभाग,संचेती एआय इनोव्हेशन लॅब आणि एआयएमडी (आर्टिफिशियल इंटेलिजन्स एमडी) प्लॅटफॉर्म सुरू करण्यात येणार आहे.या परिसंस्थेमध्ये रूग्ण,अस्थिरोग तज्ञ,फिजिओथेरपीस्ट,भूलतज्ञ आणि वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी समर्पित एआय टूल्स सादर करण्यात येणार आहेत.जेणे करून निदान, पुर्नवसनाची योजना,शिक्षण आणि वैद्यकीय निर्णयांमध्ये मदत होऊ शकेल. संचेती हॉस्पिटल द्वारे नुकतेच अद्ययावत रोबोटिक रिहॅबिलिटेशन सुविधा सुरू करण्यात आली होती. या सुविधेद्वारे वेदना कमी करणे,हालचालींमध्ये सुधारणा,क्रीडा दुखापतींपासून बरे होणे आणि न्युरो रिहॅबिलिटेशन या सर्व गोष्टींमध्ये चांगले परिणाम दिसून येत आहेत.या तंत्रज्ञानामुळे रिहॅबिलिटेशन सेवा नव्याने परिभाषित झाली असून अचूक व शाश्वत परिणाम मिळत आहेत,असे मत संचेती हॉस्पिटलच्या फिजिओथेरपी विभागाच्या प्रमुख डॉ.दर्शिता नरवाणी यांनी व्यक्त केले. संचेती हॉस्पिटलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.पराग संचेती म्हणाले की,६० वर्षे पूर्ण करणे हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# ‘रेल्वे ब्रिज १९२२’ झाला इतिहास जमा!





(छायाचित्रे : केवल तिवारी)

**103 वर्षांचा जुन्या पुलाचे 11 तासात विसर्जन**

**पाडकाम होताना ज्येष्ठ नागरिक झाले होते भावूक**

**प्रथमच घेण्यात आला साडेबारा तासांचा मेगाब्लॉक**

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि.१४ डिसेंबर-**

गिरणगाव आणि स्वातंत्र्यलढाचा साक्षीदार असलेल्या दमाणी नगर येथील १०३ वर्षे जुना ब्रिटिशकालीन रेल्वे ब्रिज रविवार, १४ डिसेंबर २०२५ रोजी ११ तासांच्या पाडकाम प्रक्रियेनंतर अखेर इतिहास जमा झाला. शेकडो कर्मचारी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून या पुलाचे विसर्जन झाले-अखेरचा निरोप देण्यात आला. सोलापूर शहराच्या औद्योगिक, ऐतिहासिक स्वातंत्र्यलढ्याचा आणि आर्थिक विकासाचा एक बंध आज काळाच्या पडद्याआड गेला. सोलापूरच्या इतिहासातील साक्षीदार ठरलेला एक महत्त्वाचा अध्याय आज संपुष्टात आला. सदर पुलाच्या पाडकामाच्या अनुषंगाने सोलापुरात प्रथमच साडेबारा तासाचा रेल्वे मेगाब्लॉक घेण्यात आला. आता याच जागेवर एका वर्षभरात अत्याधुनिक पध्दतीने नवा प्रशस्त असा पूल उभारण्यात येणार आहे. या कामासाठी सोलापुरात प्रथमच साडेबारा तासाचा रेल्वे मेगाब्लॉक घेण्यात आला.

ब्रिटिशांनी १९२२ च्या सुमारास उभारलेला हा पूल स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजपर्यंत शहराच्या जडणघडणीचा साक्षीदार राहिला. लाखो नागरिक, वाहनधारक आणि असंख्य रेल्वेगाड्यांची सुरक्षित वाहतूक या पुलावरुन होत होती. मात्र काळानुसार जुना झालेला आणि वाढती वाहतूक, अरुंद रचना आणि संरचनात्मक मर्यादा लक्षात घेता हा पूल आता धोकादायक झाला होता. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने हा पूल पाडून त्याजागी अत्याधुनिक चारपदरी नवा रोड ओव्हरब्रिज उभारण्याचा निर्णय घेतला. ब्रिटिशकालीन रेल्वे पुलाचा पहिला गर्डर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक (भय्या चौक) बाजूने उभ्या असलेल्या क्रेनच्या साह्याने उचलण्यात आला. पुलाचा दुसरा गर्डर मरिआई चौकाकडील बाजूला उभारण्यात आलेल्या क्रेनच्या मदतीने उचलण्यात आला.

प्रत्येक टप्प्यावर अत्यंत काटेकोर वेळेचे नियोजन आणि तांत्रिक दक्षता घेतली होती. दरम्यान, या कामासाठी कोल्हापूरहून २०० टन क्षमतेच्या तीन अवजड क्रेन सोलापूरमध्ये दाखल झाल्या होत्या. तब्बल २८ टन वजनाचे एकूण २० गर्डर सहा तासांच्या ब्लॉकमध्ये टप्प्याटप्प्याने खाली उतरविण्यात आले. रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत आणि तांत्रिक पथकाच्या सतत देखरेखीखाली ही संपूर्ण कारवाई पार पडली. कोणतीही दुर्घटना घडू नये म्हणून रेल्वे वाहतूक आणि रस्ते वाहतूक काही काळासाठी पूर्णतः बंद ठेवण्यात आली होती. पोलीस बंदोबस्त तैनात होता. परिसरात मोठ्या संख्येने नागरिकांनी गर्दी केली होती. अत्याधुनिक, रुंद, सुरक्षित आणि वाहतूकक्षम असा चारपदरी नवा रोड ओव्हर ब्रिज उभारण्यात येणार आहे. हा पूल पुढील शंभर वर्षांसाठी सोलापूर शहराच्या वाढत्या वाहतुकीचा मजबूत आधार ठरणार आहे.

## आठवणींच्या कोंदणातील रेल्वेचा ब्रीज

मरिआई चौक ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक म्हणजेच पूर्वीचा भय्या चौक असा हा रेल्वे ब्रीज बांधला होता इंग्रजांनी, आता तो पाडला जातोय. कारण त्याचे वय झाले १०३ वर्षे. जुन्याच्या या पाऊलखुणा आता नाहीश्या होतील. पण आठवणीच्या कोंदणात मात्र कायमच्या राहतील. या रेल्वे ब्रीजने सोलापूरचा सुवर्णकाळ जवळून पाहिला आहे. जुनी मिल, लक्ष्मी विष्णू मिल, नरसिंग गिरिजी मिल, जामश्री मिल या सर्वांच्या भरभराटीच्या सुवर्णकाळाचा अर्थात सोलापूरच्या सुवर्ण काळाचा हा जवळचा साक्षीदार होता, तोच आज ढासळताना आपण पाहत आहोत. माझ्या आठवणी या ब्रीज सोबतच्या आहेत. कधी चालत पायी जाताना, कधी बैलगाडीत बसून जाताना, कधी सायकलवरून जाताना, कधी दुचाकीवरून जाताना तर कधी चारचाकी मधून जाताना, कधी रेल्वेमधून ब्रीज खालून जाताना हा आपला विश्वासू साथीदार वाटत असे. मिलमधील कामगारांच्या सोयीसाठी याच ब्रिजवर खाऊवाले, भाजीवाले, भजीवले, फळवाले यांची जणू जत्राच भरत असे. या ब्रिजवर उभे राहून तासन्तास रेल्वे ग्राऊंडवर चालणारी क्रिकेटची मॅच पाहण, हे शाळेला जातानाचा आवडता कार्यक्रम असे. शाळेला जाण्याची पायपीट या ब्रीजने पाहिलेली आहे. विकासाच्या आणि प्रगतीच्या वाटेत अडसर न ठरता आत्मसमर्पण करून आपलाही हातभार लावला पाहिजे, हेच जणू तो आज आपल्याला शिकवत आहे, असे किसन दाडगे यांनी सांगितले.

## कितीतरी वेळा रेल्वेच्या शिट्टया ऐकल्या

पूल आमच्या पिढीसाठी केवळ रस्ता नव्हता, तर ती एक ऐतिहासिक आठवण आहे. लहानपणी या पुलावरून कितीतरी वेळा रेल्वेच्या शिट्टया ऐकल्या आहेत. पाडताना जुन्या आठवणींना उजाळा मिळाला, पण मनात थोडी हुरहुर वाटली. विकासासाठी हे आवश्यक होतं, पण या आठवणी कधीच विसरता येणार नाहीत, असे दीपक भोसले यांनी सांगितले.

## ७७ वर्षे होता साथीदार

गेल्या २० वर्षांपासून जुनी लक्ष्मी चाळ शेजारी राहत असून येथील पुलावर आम्ही आजवर ये-जा केलाय, माझ्या लहानपणापासून म्हणजे गेली ७७ वर्षे हा पूल माझ्यासारख्यांचा जणू साथीदार होता. भक्कम आधार होता. वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन असंच भक्कम पूल बांधावा, असे मधुकर सुरवसे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.



## अखेरचा हा तुला दंडवत!

‘‘रेल्वे ब्रिज १९२२‘‘....
लोखंड नव्हे, इतिहास होतास तू,
संघर्षांचा साक्षी, अभिमानाचा ऋतू,
धुरात गिरण्यांचा श्वास गुंफलास,
स्वातंत्र्याच्या ज्वालेचा साक्षीदार...

आज जातोस तरी मिटत नाहीस,
मनामनांत कोनशिला होऊन राहतोस.
१९२२ नाव नव्हे, श्वास आहे हा,
कृतज्ञ आम्ही, सदा...

अखेरचा हा तुला दंडवत
पावलं किती तरी पिढ्यांची वाहिली तू,
आनंददुःखांची सावली झालास तू.
रस्ते नव्हे, मने जोडणारा दुवा तू,
आठवणींच्या ओझ्यानेही उभा राहिलास तू.

पडतोस आज, पण संपत नाहीस कधीच,
काळाच्या कप्प्यात कोरली आहेस तूच.
सोलापूरच्या श्वासात मिसळलेला इतिहास,
‘‘रेल्वे ब्रिज १९२२’’
आमच्या हृदयात... चिर स्मरणात राहील !

**-किरण बनसोडे**




## ...पण कोनशिला दिमाखात उभी

तत्कालीन गिरणगावच्या जडणघडणीचा साक्षीदार असलेला ब्रिटिशकालीन रेल्वे पूलासह अन्य सर्व गोष्टी पाडण्यात आल्या. परंतु या ठिकाणी दोन्ही बाजूला असणाऱ्या दगडांवर ‘‘१९२२‘‘ कोरलेली कोनशीला जैसे थे होते. १०३ वर्षानंतरही पूल पडला पण येथील कोनशीला ही आजही दिमाखात उभी असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## निरोप देणे थोडे जड गेले

शहराची वाढती लोकसंख्या आणि गरजा पाहता, हा बदल अपरिहार्य होता. सोलापूरची ओळख असलेल्या या पुलाला निरोप देणे थोडे जड गेले. नवीन पूल वेळेत आणि दर्जेदार व्हावा, सोलापूरचा विकास अधिक वेगाने होईल, हीच अपेक्षा आहे, असे विशाल चंदेले यांनी सांगितले.



## मी ‘‘रेल्वे ब्रिज १९२२’’ बोलतोय!

मी ‘‘रेल्वे ब्रिज १९२२‘‘ बोलतोय! लोखंडाचा सांगाडा म्हणून नव्हे, तर सोलापूरच्या श्वासात मिसळलेला एक जिवंत इतिहास म्हणून! माझ्या खालून रेल्वे धावल्या, पण माझ्या कुशीतून माणसांचे स्वप्न, श्रम आणि संघर्ष धावले. गिरण्यांचा सोन्याचा धूर मी पाहिला... कामगारांच्या हातातील घाम आणि डोळ्यातील स्वप्न अन् आशा मी ओळखल्या...! मी उभा राहिलो, तेव्हा गिरणगाव धगधगत होते. अर्धा लाख कामगारांची पावले माझ्या सावलीत उमटत होती. चाळी जाग्या होत्या आणि सोलापूरचे हृदय इथेच धडधडत होते.मी पाहिलं मे १९३० चं रण. स्वातंत्र्यासाठी उसळलेला संताप, लक्ष्मीविष्णू गिरणी परिसरात उठलेला आवाज, ब्रिटिशांच्या गोळ्यांचा थरकाप आणि त्याहीपेक्षा प्रखर स्वातंत्र्याची आग. त्या चार दिवसांच्या स्वातंत्र्याचा श्वास माझ्या प्रत्येक लोखंडी श्वासात भरुन राहिला. मी फक्त दोन भूभाग जोडले नाहीत, तर मी काळ जोडला. भूतकाळ, वर्तमान आणि भविष्यातील सोलापूर...! पूर्वपश्चिम नाही, तर माणसांना माणसांशी जोडणारा मी एक दुवा होतो. १०३ वर्षे मी उभा राहिलो. वादळं आली, काळ बदलला, गिरण्या शांत झाल्या. पण आठवणी कधीच थांबल्या नाहीत. आज मला पाडलं जातंय! हो, माझं लोखंड झिजलं असेल. पण माझ्या आठवणी अजून मजबूत आहेत. आज जेव्हा तुम्ही माझ्याजवळ थांबून मोबाईलचा फ्लॅश लावता... सेल्फी काढता, तेव्हा मला जाणवतं, मी अजूनही तुमच्या मनात उभा आहे. माझा निरोप हा शेवट नाही. मी मातीमध्ये जाईन, पण इतिहासात कायम राहीन. मी पाडला जातोय, पण पुसला जात नाहीय. माझ्या सोलापूरकरांनो.... आज तुम्ही मला डोळ्यात साठवताय, मनात कोरताय आणि पुढच्या पिढ्यांना सांगणार आहात.. ‘‘हा फक्त पूल नव्हता, तर हा आमचा अभिमान होता!’’ मी ‘‘रेल्वे ब्रिज १९२२‘‘.... आज निरोप घेतोय, पण तुमच्या आठवणीत कायम उभा राहणार आहे!! होय... कभी अलविदा ना कहना...!

**शब्दांकन-किरण बनसोडे**

## अप्रोच रोडचे बांधकाम, सर्व्हिस रोड प्रस्तावित

सुमारे १९ मीटर रुंदीचा चारपदरी रोड ओव्हर ब्रिज (आरओबी) उभारण्यात येणार आहे. यामध्ये ४ संयुक्त (कॉम्पोझिट) स्पॅन असतील. यामध्ये १८.८ मीटर (अतिरिक्त व्हायाडक्ट), ३६ मीटर (मुख्य स्पॅन), २४ मीटर (अतिरिक्त रेल्वे स्पॅन) आणि १८.८ मीटर (अतिरिक्त व्हायाडक्ट) असा समावेश आहे. या पुलासह दोन्ही बाजूंनी अप्रोच रोडचेही बांधकाम करण्यात येणार आहे. शेजारील इमारती व परिसरातील रहिवाशांच्या सोयीसाठी दोन्ही बाजूंना प्रत्येकी ५.५ मीटर रुंदीचे सर्व्हिस रोड प्रस्तावित करण्यात आले आहेत. या प्रकल्पात यू-टर्न सुविधेचाही समावेश असणार आहे. भविष्यात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक व आसपासच्या परिसरातील वाहतूक कोंडी कायमची दूर होणार आहे

## पूल पाडण्यासाठी तैनात असणारी यंत्रसामग्री अशी

* ब्रेकरसह ४ एक्स्कॅव्हेटर लॉंग बूमसह २२० क्षमता * २०० मेट्रिक टनपेक्षा जास्त क्षमतेच्या ३ क्रेन (२ कार्यरत+१ अतिरिक्त स्टँडबाय) * २ ट्रॅक्टर ब्रेकर * ४ जेसीबी, * कॅस कटिंग किट-२० नग आणि ४ एक्स्कॅव्हेटर * टिप्पर-४ * ट्रॉलीसह ट्रॅक्टर ४ * हायड्रा-२, रुग्णवाहिका १, डीजी-२

## अधिकारी, कर्मचारी होते तळ ठोकून

रविवारी एकूण ११ तासाच्या कालावधीत ऐतिहासिक अशा या रेल्वे ब्रिजच्या विसर्जनाची प्रक्रिया पार पडली. याप्रसंगी सोलापूर विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजित मिश्रा, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक अंशुमाली कुमार, गतिशक्ती विभाग प्रमुख शैलेंद्रसिंह परिहार, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रकल्प संचालक स्वप्निल कासार, अनिल विपत, विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील, वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता अनुभव वार्षणेय, वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त आदित्य, अतिरिक्त सुरक्षा आयुक्त दिनेश कनोजिया यांच्यासह रेल्वे, आरपीएफ व महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी-कर्मचारी तळ ठोकून उपस्थित होते.




**प्रथम पुण्यस्मरण**



**डॉ. शिवानंद सिद्राम झळके**
मृत्यू दि. १५/१२/२०२४

चंदनापरी देह झिजविला कष्टातून
वसंत फुलविला, उरली नाही
साथ आम्हाला, आठवण येते
क्षणाक्षणाला आजही तुमची वाट
पाहतो, यावे पुन्हा जन्माला...

शोकाकुल
**झळके, लोभे, माळी, कोरे, कोले, दिवटे परिवार**
**मंद्रूप, कंदलगाव**




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# 'श्री शिवजन्मोत्सव-अश्विनी'च्या वतीने महाआरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर -**

श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ आणि अश्विनी सहकारी रुग्णालयाच्या वतीने म ोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात बालरोग तपासणी, त्वचा रोग तपासणी, हृदयरोग तपासणी, दमा तपासणी, पोटाचे विकार तपासणी, अस्तिरोग तपासणी, मेंदूचे विकार तपासणी, पक्षाघात तपासणी, संधिवात तपासणी, इ सी जी तपासणी, बी पी तपासणी, शुगर तपासणी, स्त्रीरोग तपासणी, प्रसूतीपूर्व व प्रसूतीपश्चात तपासणी करण्यात आली.

शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, घाडगे गुरुजी, राजन जाधव, चंद्रकांत वानकर, श्रीकांत डांगे, श्रीकांत घाडगे, माऊली पवार, बाबासाहेब जाधव, शैलेश पिसे, भाऊ रोडगे, लहू गायकवाड, जितू वाडेकर, सदाशिव पवार, जीवन यादव, दिनेश जाधव, प्रतापसिंह चव्हाण, जयवंत सलगर, जयंत शेळके, प्रकाश ननवरे, बसू कोळी, अंबादास शेळके, विवेक फुटाणे, बजरंग जाधव, नागेश वडणे, नितीन मोहिते, सचिन चव्हाण, राजू व्यवहारे आदींच्या प्रमुख उपस्थितीत शिबीराचे उद्घाटन करण्यात आले.

डॉ.कविता सोनकांबळे, डीएमओ डॉ. रमेश जक्कापुरे, डॉ.संतोष स्वामी, डॉ.सचिन चौधरी, डॉ.प्रणव पाटील, डॉ.राजकुमार बहिरप्पा आदींनी रुग्णांची तपासणी केली. महाआरोग्य शिबीराच्या यशस्वीतेसाठी अवधूत कुलकर्णी, उमेश शिवशरण, उज्वला लांबतुरे, सचिन स्वामी, देविदास घुले, निशांत सावळे आदींनी परिश्रम घेतले.





## चर्चला रंगरंगोटी...

नाताळच्या पार्श्वभुमीवर सोलापुरातील दि फर्स्ट चर्च पहिली ख्रिस्त मंडळी चर्चला रंगरंगोटी करण्यात येत आहे.



## पेटल्या शेकोट्या...

सोलापुरातील तापमान घसरत चालल्यामुळे ठिकठिकाणी शेकोटी पेटत असल्याचे दिसून येत आहे.



## खा.शरद पवार यांचा वाढदिवस साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर -**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा खासदार शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त हॉटेल सिटी पार्क येथे केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार सांस्कृतिक सेल सोलापूर शहराध्यक्ष राकेश सोनी यांच्या वतीने शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

यावेळी शहराध्यक्ष महेश गादेकर, प्रदेश उपाध्यक्ष ॲड. शंकरराव पाटील, युवक अध्यक्ष सरफराज शेख, प्रशांत बाबत, चंद्रकांत पवार, संजय जाबा, राकेश सोनी, रविकांत चौगुले, कीरन इटकर, सुनिता वरगंटी, मुरलीधर सोनी, अब्दुल शेख, युवराज तमशेट्टी, सचिन जाधव, मुकेश सोनी आदी उपस्थित होते.

# 'भाजपा'कडून उमेदवारी अर्ज : १०१२ नेले, ६०० दाखल झाले

- उमेदवारी पदरात पाडून घेण्याकामी अनेकजण प्रयत्नशील
- अन्य पक्षातून आलेले खर्ची घालताहेत राजकीय वजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर -**

सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीचे वारे जोरात वाहू लागले आहे. भारतीय जनता पार्टीकडून उमेदवारी मिळविण्याकामी पक्षकार्यालयात तोबा गर्दी झाली होती. १०१२ उमेदवारी अर्ज नेण्यात आले. मात्र त्यापैकी ६०० उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. प्राप्त अर्जांची छाननी स्थानिक कोअर कमिटीकडून करण्यात आली. पक्षाने घालून दिलेल्या सर्व नियमात बसणाऱ्या योग्य उमेदवारांचेच अर्ज येत्या दोन दिवसात प्रदेश कार्यालयाकडे पाठवून दिले जाणार आहे, असे सांगण्यात आले.

### नियोजनबध्द निवडणूक कार्यक्रम

२६ प्रभागांसाठी भाजपाकडून विनामुल्य अर्ज वाटप केल्याने हजाराच्यावर अर्ज गेले आहेत. स्थानिक कोअर कमिटीमध्ये पालकमंत्री जयकुमार गोरे, आ.विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख, आ.देवेंद्र कोठे यांच्यासह शहराध्यक्ष, स्थानिक नेतेमंडळींचा समावेश आहे. पक्षश्रेष्ठींनी ठरवून दिल्याप्रमाणे नियोजनबध्द निवडणूक कार्यक्रम राबविण्यात येत आहे, असे शहराध्यक्ष तडवळकर यांनी सांगितले.

महापालिकेच्या २६ प्रभागातील एकूण १०२ जागांवर भाजपाकडून निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांसाठी उमेदवारी अर्ज नेण्याकामी १३ डिसेंबर ही अंतिम तारीख देण्यात आली होती. त्यानुसार १०१२ अर्ज इच्छुकांनी घेवून गेले होते. यामध्ये माजी महापौर श्रीकांचना यन्नम, माजी उपमहापौरद्वय दिलीप कोल्हे, पद्माकर काळे, शशिकला बत्तुल, महिला व बालकल्याण समितीच्या माजी सभापती रामेश्वरी बिर्रु, माजी नगरसेवकद्वय नरेंद्र काळे, बिज्जू प्रधाने, मेघनाथ येमूल आदींचा समावेश आहे.

भारतीय जनता पार्टीचे आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि संघ परिवारातील कार्यकर्ते असलेले अनेकजण उमेदवारी पदरात पाडून घेण्याकामी आपापल्या परीने प्रयत्नशील आहेत. तर दुसरीकडे अन्य पक्षातून भारतीय जनता पार्टीत दाखल झालेलेही उमेदवारी मिळविण्यासाठी आपापले राजकीय वजन खर्ची घालत आहेत. दरम्यान, उमेदवारी देताना नेतेमंडळींची डोकेदुखी बनणार आहे, असे सांगण्यात येते.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मंगळवारपासून स्वीकारणार अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर -**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सर्वच्या सर्व म्हणजे १०२ जागा लढविण्यात येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांकडून मंगळवार, १६ ते गुरुवार, १८ डिसेंबर या कालावधीत दररोज सकाळी ११ ते दुपारी २ यावेळेत जुनी मिल कपाऊंड येथील राष्ट्रवादी भवन येथे अर्ज स्वीकारले जाणार आहे, अशी माहिती शहर-जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी दिली.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, सोलापूरचे संपर्कमंत्री अण्णासाहेब बनसोडे, ना.दत्तात्रय भरणे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली पक्षसंघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते कामाला लागले आहेत अब की बार ७५ पारचा नारा देण्यात आला आहे. इच्छूक उमेदवारांचे अर्ज स्वीकारल्यानंतर वरिष्ठांच्या आदेशाने मुलाखतीची तारीख, वेळ आणि ठिकाण ठरविण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

## अमोल शिंदे यांच्या हातून अनेक समाजकार्य घडो : देशमुख



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर -**

नागरिकांना लागणाऱ्या रोजच्या जीवनामध्ये महत्त्वाची कागदपत्रे काढण्याचे राहिलेल्यांसाठी महासेवा शिबिर हे एक उत्तम कार्य माजी नगरसेवक, जिल्हा प्रमुख अमोल शिंदे हे यांच्या हातून होत आहे. येणाऱ्या काळात त्यांच्या हातून असे अनेक समाजकार्य घडो अशा शब्दात सोलापूर भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष माजी नगरसेवक किरण देशमुख यांनी कौतुक केले.

शिवसेना शहर जिल्हा कार्यालय येथे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या पुढाकारातून घेण्यात येणाऱ्या महासेवा शिबिराला माजी नगरसेवक किरण देशमुख, विनोद भोसले यांनी सदिच्छा भेट दिली. शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या वतीने विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी शिबीर घेण्यात आले. यावेळी मोहसिन शेख, अमित अजनाळकर आदी उपस्थित होते. १८ डिसेंबरपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील शिवसेना शहर जिल्हा संपर्क कार्यालयात शिबीर सुरु राहणार असल्याचे सांगण्यात आले.

# श्रीक्षेत्र बाळे येथील खंडोबा मंदिरात यात्रेच्या शेवटच्या रविवारी भाविकांची मांदियाळी

### येळकोट येळकोट जय मल्हार जयघोषाने दुमदुमला मंदिर परिसर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर -**



अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाते मल्हारी मार्तंड श्री खंडोबा देवाची यात्रा मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न होत आहेत. तीर्थक्षेत्र बाळेस्थित श्री खंडोबा मंदिरात पवित्र मार्गशीर्ष महिन्यात देवाची यात्रा दर रविवारी भरत असते. यात्रेचा हा तिसरा व शेवटचा रविवार असल्याने अबालवृद्ध भाविकांनी पहाटेपासूनच श्रींचे दर्शन घेण्यासाठी एकच मांदियाळी केली होती. अनेक भाविकांनी ''येळकोट येळकोट जय मल्हार''; सदानंदाचा येळकोट घे ''मल्हारी मार्तंड की जय! घोषणांचा निनाद करत बेलभंडाऱ्याची मुक्त उधळण केली. यावेळी श्रींच्या गर्भ गाभाऱ्यात मल्हारी मार्तंड आणि देवी म्हाळसाकांत यांच्या मूर्तीला आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. सर्वत्र प्रसन्नतेचे आणि धार्मिकतेचे वातावरण दिसून आले.

कुलदैवत असणाऱ्या अनेक भाविकांनी मार्गशीर्ष महिन्यात दर रविवारी देवाचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात पहाटेच हजेरी लावली होती.

कोटंबा आणि वारू घेऊन भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले. त्यानंतर अनेक भाविकांनी मंदिर परिसरात देवाचे नाव घेऊन वारू सोडला. मंदिरात पहाटे पाच वाजता काकडा आरती, सकाळी आठ वाजता महा अभिषेक व महापूजा संपन्न झाली. त्यानंतर श्री यांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांना मंदिर खुले करण्यात आले. तदनंतर महापूजा व घोडा नंदिध्वजसह पालखी सोहळा रात्री साडेआठ वाजता संपन्न झाला. यात्रेची सांगता पौष शुद्ध षष्ठी बांगरषष्ठी शुक्रवार दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी महाप्रसाद वाटपाने होणार असून सर्व मानकरी पाटील, तोडकरी, कांबळे, सुरवसे, गावडे आणि गावकरी तसेच भाविकांच्या उपस्थितीत प्रसाद वाटप करून यात्रेचा समारोप होतो.

### भंडारा व खोबरे उधळून प्रसाद वाटप

श्रीखंडोबाच्या उपासनेत भंडारा (हळदीची पूड) फार महत्त्वाचा आहे. खंडोबाच्या कुलधर्मासाठी व चंपाषष्ठी या दिवशी ठोम्बरा (जोंधळे शिजवून त्यात दही व मीठ घातलेले), कणकेचा रोडगा, वांग्याचे भरीत, पातीचा कांदा व लसूण हे पदार्थ नैवेद्यात असतात. देवाला नैवेद्य देण्यापूर्वी तळी भरण्याचा विधी असतो. तळी भरणे म्हणजे एका ताह्मणात विड्याची पाने, पैसा, सुपारी, भंडारा व खोबरे हे पदार्थ ठेवून ते ताह्मण ''सदानंदाचा येळकोट' किंवा ''येळकोट येळकोट जय मल्हार' असे मोठ्याने तीन वेळा म्हणत उचलतात, नंतर दिवटी-बुधली घेऊन आरती करतात. देवाकडे तोंड करून भंडारा व खोबरे उधळून प्रसाद वाटला जातो.

### यात्रेतील शेवट रविवार असल्याने सकाळपासूनच भाविकांची मांदियाळी

बाळे येथील श्री खंडोबा देवाची पारंपरिक मार्गशीर्ष चंपाषष्ठी यात्रा यंदा मार्गशीर्ष शुद्ध षष्टी, बुधवार दि. २६ नोव्हेंबर २०२५ पासून ते आज दि.१४ डिसेंबर या शेवट रविवारी उत्साहात संपन्न झाली आहे. मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी ते मार्गदर्शन पर्यंत येणाऱ्या प्रत्येक रविवारी श्री खंडोबाची यात्रा भरत असते. रविवार दि. ३०/११/२०२५, ०७/१२/२०२५ आणि १४/१२/२०२५ या तीन रविवारीसह एकूण चार दिवस यात्रा भरली.महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेशातून मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी येत असतात. आज यात्रेतील १४ डिसेंबर शेवट रविवार असल्याने भाविकांची सकाळपासूनच मोठी गर्दी होती, असे मंदिराचे पुजारी गणेश पुजारी यांनी सांगितले.

### श्रीची पालखी, घोडा व मानाचे नंदीध्वज मिरवणूक

यात्रा कालावधीत पहाटे ५.०० वाजता काकड आरती, तर सकाळी ८.०० वा. आणि रात्री ७.०० वा. महापूजा व अभिषेक करण्यात आले. दिवसभर जागरण गोंधळ, वाघ्या-मुरळी नृत्य, तळी-भंडारा उचलणे, भंडार खोबरे उधळणे वारू सोडणे, नवस फेडणे, जावळ काढणे यांसह विविध धार्मिक पार पाडले. यात्रा कालावधीत श्री खंडोबा देवाची मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी व यात्रेतील प्रत्येक रविवारी श्रीची पालखी ,घोडा व मानाचे नंदिध्वज मिरवणूक मोठ्या मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणामध्ये संपन्न झाली, असे देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विनय ढेपे यांनी सांगितले.



# ऊस दरासंदर्भात शेतकऱ्यांनी केले भजन आंदोलन

### बीबीदारफळ येथील लोकमंगल कारखाना पाडला बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर -**

सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी उसाच्या दरासंदर्भात कारखानदारांना निर्वाळीचा इशारा देत, शेतकऱ्यांना पहिली उचल ३४०० देण्याची मागणी करत आक्रमक आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. बीबीदारफळ येथील लोकमंगल साखर कारखान्याचे गव्हाण बंद पाडून शेतकऱ्यांनी भजन आंदोलन केले.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांसह लोकमंगल साखर कारखान्यावर धडक मोर्चा काढला. शेतकऱ्यांनी गव्हाणीमध्ये ठिय्या मांडून साखर कारखान्याचे कार्य बंद पाडले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पहिली उचल ३४०० दिलीच पाहिजे, अशा घोषणा दिल्या. गेल्या काही दिवसांपासून ऊस उत्पादक शेतकरी आणि कारखानदार यांच्यात संघर्ष सुरू झालेला दिसत आहे. या वर्षाचा गळीत हंगाम सुरू झाला. तरी देखील अद्याप उसाचा दर जाहीर झाला नाही. काही कारखानदारांनी उसाचा दर जाहीर केला, नसल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे.

सोलापूर दौऱ्यावर आलेल्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माजी खासदार राजू शेट्टी आपल्या सोलापूर दौऱ्याप्रसंगी ऊस दराबाबत साखर कारखानदार, प्रशासनाला सावध केले होते. परंतु याकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही. त्यामुळे आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागला, असे आंदोलकांकडून सांगण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १२९७

**मग मोकलिलें जेथ जाईल । तेथूनि नियमुचि घेऊनि येईल ।**
**ऐसेनि स्थैर्यची होईल । सवेयया कीं ॥**

योगाभ्यासकाचा मार्ग कोणता व कसा असतो, याची माहिती भगवंतानी अर्जुनाला सांगीतली. त्यानंतर हा मार्ग मला किंवा सामान्यांना पत्करता येईल का ? आणि पत्करला तर तो मार्गक्रमण करता येईल का ? असे प्रश्न अर्जुन विचारत आहे. अर्जुनाला हा मार्ग कठिण वाटत आहे. श्रीकृष्ण सांगत आहेत की, अर्जुना औषध कडू असले तरीही जगण्यासाठी ते घ्यावे लागते. असे कडू औषध जिभेला घ्यावे वाटत नाही. तरी पण ते घेतल्याशिवाय रोग बरा होत नाही. त्याप्रमाणे आपल्या हितासाठी पोषक असणारा हा दिव्यमार्ग कठिण असला तरीही तो आपल्यासाठी चांगला व आवश्यक आहे. केवळ तो इंद्रियांना क्लेशकारक वाटतो म्हणून हा मार्ग सोडू नये. चित्ताला विषय सुखापासून परावृत करुन आपणाला आपला स्वत:चा आत्मपरिचय करुन आत्मसुख देणारा हा मार्ग असल्याने हा मार्ग सोडता कामा नये. आत्म सुखात तल्लीन राहणा-याला पर्वता एवढी दु:खाची संकटे कोसळली तरी त्याला त्याचे कांही वाटत नाही. जेव्हा आत्मसुखाची ओढ मनाला लागते तेव्हा मन आपोआप विषयसुखापासून दूर जाऊ लागते. म्हणून मनाला आत्मसुखाच्या ओढी लावावी.



हा योग अवघड असला तरीही काम, क्रोधावर नियंत्रण करुन व इंद्रियांचे नियमन करुन या मार्गावर पदार्पण करावे. दृढ निश्चयाने व निष्काम कर्मयोगी होऊन या मार्गावर चालू लागल्यास मनाला वैराग्य प्राप्त होते. त्यामुळे संकटाची ये-जा संपून, बुध्दी मोठया सुखाने धैर्याच्या राजवाडयात नांदू लागते. या मार्गावर जाण्याचा पहिला टप्पा म्हणजे मनावर नियत्रंन करणे होय. मनावर नियंत्रण करणे तसे अवघड काम आहे. प्रयत्नाअंती नियंत्रण करता आले तर फारच छान, पण जर नियंत्रण शक्यच होत नसेल तर काय करावे ? हे सांगतांना भगवंत म्हणाले, मग **मोकलिलें जेथ जाईल । तेथूनि नियमुचि घेऊनि येईल । ऐसेनि स्थैर्यची होईल । सावियाची ॥** अर्थात, निग्रहाच्या निश्चयाने चित्त स्थिर झाले तर सहजच ते कामास आले असे समजावे. पण एवढयाने जर मन स्थिर झाले नाही तर मनाला धावू दयावे. स्वैरपणे भटकणा-या मनाला निग्रह करुन पुन्हा पुन्हा परत आणावे. असे पुष्कळ वेळा घडले म्हणजे ते आपोआप स्थिर होईल, असे भगवंत म्हणाले. निग्रहाचा अभ्यास पुन्हा-पुन्हा केल्याने स्थिरपणा आपोआप येऊ लागतो. योगाभ्यासाला कठीण मार्गावरुन जाणे शक्य नसणा-यांसाठी हा सोपा मार्ग भगवंतानी सांगीतला आहे. आपण दैनंदिन जीवनात पाहतो की, एखादी कठीण बाब सुध्दा प्रयासाअंती प्राप्त होऊ शकते. मला हे जमणारच नाही, असे म्हणून गप्प बसले तर आपणाला कांहीही प्राप्त होणार नाही. पण प्रयत्न करायला काय हरकत, म्हणून पुन्हा-पुन्हा प्रयत्न केला तर, असाध्य ते साध्य करीता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे. असे म्हटल्याप्रमाणे असाध्य सुध्दा साध्य होऊ शकते. आपणाला अशी अनेक उदाहरणे पाहायला मिळतात की ज्यांनी अतिप्रयासानंतर खुप कठीण असे साध्य, साध्य केले आहे. म्हणून आपणही प्रयास चालू ठेवला पाहिजे. आपल्या मुलांना एखादी गोष्ट येत नाही म्हणून त्यांच्यावर चिडण्यापेक्षा त्यांच्याकडून ती गोष्ट पुन्हा-पुन्हा करुन घ्यावी. अर्थात, एकदम नकारात्मक भूमिका घेण्यापेक्षा, सकारात्मक भुमिकेतून माणसाने वागण्याचा प्रयत्न ठेवला तर यश निश्चितच मिळते. जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# ‘लोकअदालत’मध्ये १० हजारांपर्यंत प्रकरणे निकाली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१४ डिसेंबर-**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशाप्रमाणे तसेच अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर यांच्या अध्यक्षेताखाली १३ डिसेंबर रोजी सोलापूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयामध्ये चौथ्या राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. सोलापूर स्थानिक न्यायालय तसेच सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोकअदालत घेण्यात आली.



या लोकअदालतीमध्ये ४३,६२० प्रलंबित प्रकरणे आणि ३९,२३६ दाखलपूर्व प्रकरणे अशी एकूण ८२,८४६ प्रकरणे लोकअदालतीमध्ये ठेवण्यात आली होती. या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जिल्हयातील एकुण ९,९४५ प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली व लोकअदालतीच्या माध्यमातून एकुण रक्कम रु. ५५,२५,७४,२४१/- इतके मुल्य असणाऱ्या प्रकरणांमध्ये सामंजस्याने तडजोड करण्यात आली. सदर लोकअदालतीमध्ये न्यायालयीन प्रलंबित प्रकरणे तसेच विविध बँका, वित्तिय संस्था, सोलापूर पंचायत समिती दक्षिण सोलापूर, बीएसएनएल, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शहर वाहतूक शाखा, तसेच विविध पोलिस स्टेशनचे अधिकारी यांनी सहभाग नोंदविला. राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजनापूर्वी ०८/१२/२०२५ ते दि. १२/१२/२०२५ या कालावधीमध्ये सोलापूर जिल्हयातील सर्व न्यायालयामध्ये विशेष मोहिम राबविण्यात आली. विशेष मोहिमेमध्ये एकुण ३,४६८ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामध्ये एकूण ठेवलेली प्रलंबित प्रकरणे ४३६१०, तडजोड झालेली प्रलंबित प्रकरणे ३४०२ , प्रलंबित प्रकरणातील तडजोड रक्कम ४१,८२.९३,९०५/- इतकी आहे. या लोकअदालतीमध्ये दाखलपूर्व प्रकरणे ३९२३६, तडजोड झालेली दाखलपूर्व प्रकरणे ६५४३ तसेच दाखलपूर्व प्रकरणातील तडजोड रक्कम १३,४२,८०,३३६/- रूपये इतकी असून ५ वैवाहिक प्रकरणामध्ये सुध्दा तडजोड करण्यात आली आहे. लोक अदालत यशस्वी करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रशांत पेठकर, अधिक्षक शमशोद्दीन नदाफ, तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सर्व लोकअभिरक्षक, कर्मचारी वृंद, पॅनल विधीज्ञ तसेच जिल्हा न्यायालयीन कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



# विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच छंद जोपासला पाहिजे

## उपायुक्त लोकरे; श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या चित्रकला स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

विद्यार्थ्यांनी मोबाईल, टीव्हीमध्ये वेळ न घालवता अभ्यास करावा. त्याचबरोबर चित्रकला, अवांतर वाचन असा एखादा छंद जोपासला पाहिजे. श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानाचे काम कौतुकास्पद आहे. अतिशय सुंदर उपक्रम राबविण्यात येतात, असे प्रतिपादन महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले.

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी ‘चित्रकला‘ स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. सोलापूर महापालिका उद्यान विभागाचे अजयकुमार चव्हाण, समाजसेवक जवहार मुंदडा, मारवाडी युवा मंचाचे अध्यक्ष आनंद शर्मा, संस्थेचे अध्यक्ष महेश कासट आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ दृश्यकला विभागाचे धनजय टाकळीकर, दयानंद पटणे यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. दोन गटांमध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

सूत्रसंचालन प्रथमेश कासार यांनी मांडले तर आभार गणेश येळमेली यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संतोष अलकुंटे, दीपक बुलबुले, अभिजीत व्हनकळस, श्रीरंग रेगोटी, महेश भाईकट्टी, सुरेश लकडे, राजेश केकडे, श्रीनाथ श्रीगन, शिला तापडिया, सुजाता सक्करगी, अक्षता कासट, मनुश्री कासट, आर्या लचके, श्रेया लचके, शुभांगी लचके, रुपा कुत्ताते आदींनी परिश्रम घेतले.

### स्पर्धेचा निकाल असा

**बक्षिस लहान गट (३ री ते ५ वी)- प्रथम क्रमांक - पृनित बोराडे, द्वितीय - चेचक राका, तृतीय- स्वरा मनाळे, उत्तेजनार्थ- ऋतुजा हुळ्ळे व आयुष दंतकाळे. मोठा गट (६ वी ते ८ वी) - प्रथम - सृष्टी हराळे, द्वितीय- आरवी राका, तृतीय - ध्रुवी राका, उत्तेजनार्थ- कार्तिकी स्वामी व शर्य हलकुडे आदी.**

# शिक्षणाच्या गुणवत्तेविषयी निष्काळजीपणा चालणार नाही

## सीईओंनी दिली झेडपी शाळांना भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी पंढरपूर तालुक्यातील पुळुजवाडी व रांझणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या शाळांना भेट देऊन कामकाजाची सखोल तपासणी केली. भेटीदरम्यान प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख व मुख्यालय विस्तार अधिकारी हरीश राऊत उपस्थित होते. सीईओ जंगम यांनी विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था, उपस्थिती नोंद, वर्गातील स्वच्छता, उपलब्ध शैक्षणिक साहित्याचा वापर, तसेच इयत्तानिहाय अध्ययन स्तर निश्चितीनुसार विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता यांची तपासणी केली.

सीईओंनी पुळुजवाडी शाळेच्या तपासणीदरम्यान विद्यार्थ्यांच्या मराठी व इंग्रजी वाचनाची गुणवत्ता, अध्ययन स्तर निश्चितीनुसार इयत्तानिहाय प्रगती, वर्ग व्यवस्थापन, उपस्थिती नोंद, स्वच्छता, शैक्षणिक साहित्याचा वापर आदी बाबींमध्ये शैक्षणिक गुणवत्तेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. गुणवत्तेच्या ढासळलेल्या स्थितीमुळे संबंधित शाळेला तात्काळ नोटीस काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच धोकादायक वर्गखोल्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट पूर्ण होऊनही पाडकाम न झाल्याबाबतही नाराजी व्यक्त करून त्वरित पाडकाम करण्याचे आदेश देण्यात आले.

रांझणी येथे सेमी-इंग्रजी विभागातील अध्यापन समाधानकारक असल्याचे आढळले. मात्र इतर वर्गांमधील शैक्षणिक प्रगती अत्यंत ढासळलेली असल्याचे निदर्शनास आल्याने सीईओंनी नाराजी व्यक्त केली. शाळेचे बांधकाम प्रगतिपथावर असले तरी, ते त्वरित पूर्ण करण्याचे आदेश मुख्याध्यापकांना देण्यात आले.

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या जेवणाच्या तपासणीदरम्यान विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहाराचा दर्जा अत्यंत खालावलेला दिसून आल्याने नाराजी व्यक्त केली. यावेळी मुख्याध्यापकांना तात्काळ सुधारणा करण्याचे आणि लेखी स्वरूपात कारणे व सुधारात्मक अहवाल सादर करण्याचे कठोर निर्देश दिले आहेत.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : सोमवार
दि. १५ डिसेंबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - मार्गशिर्ष कृ. एकादशी
ऋतु - हेमंत
नक्षत्र- चित्रा (११.०२)
योग - शोभन (१२.२९)
करण - बव (०८.०२)
राहू काल...
सोमवार : स. ७.३० ते ९.००

दिनविशेष -
१७४९: छत्रपती शाहूजी महाराज यांचे निधन.
१९७०: व्हेनेरा-७ हे रशियाचे अंतराळयान यशस्वीपणे शुक्र ग्रहावर उतरले.
१९७१: बांगलादेश स्वतंत्र झाला.
१९९१: चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रे यांना ऑस्कर पारितोषिक जाहीर झाले.

# साई कंपनीकडून सलगर जि.प.शाळेस शैक्षणिक साहित्य भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

आंध्र प्रदेशातील हैद्राबाद येथील नामांकित शिर्डी साई इलेक्ट्रिकल कंपनीचे कार्यकारी संचालक एम. विश्वेश्वरा रेड्डी यांच्याकडून अक्कलकोट तालुक्यातील सलगर जि.प. शाळेस शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले.



कोरोना महामारी काळापासून विद्यार्थ्यांना दर्जेदार व अत्याधुनिक पद्धतीने शिक्षण मिळावे, ही भावना ठेवून शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार हे कामकाज करीत आहे. कंपनीचे कार्यकारी संचालक एम. विश्वेश्वरा रेड्डी यांनी विद्यार्थ्यांना दिलेल्या संदेशाचे वाचन करण्यात आले. यापुढेही शाळेस कायम मदत करण्याचे आश्वासन एम. विश्वेश्वरा रेड्डी यांनी दिल्याचे मुख्याध्यापक पोतदार सर यांनी सांगितले व त्यांच्या मदतीबाबत आभार व्यक्त करण्यात आले.याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षक हणमंतराव गुंडरगी, तबस्सूम बागवान, गोदा पाटील, संध्या बशेट्टी, दिनकर भारती, सोनाली भारती, मयुरी फुलारी, फजल रामपूरे उपस्थित होते.

# श्राविका, एसव्हीसीएस, डब्ल्यूआयटी जैन मंदिर प्रथम

## ‘वालचंद’ची राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ डिसेंबर-**

वालचंद कॉलेजमध्ये झालेल्या अहिंसा तत्त्वज्ञान राज्य प्रश्नमंजुषा स्पर्धेत माध्यमिक गटात उमाबाई श्राविका विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय गटात एस.व्ही.सी.एस., वरिष्ठ महाविद्यालय गटात डब्ल्यूआयटी जैन टेम्पल, तर खुल्या गटात शुद्धोहम स्वाध्याय मंडळ वैराग यांनी पहिला क्रमांक पटकाविला.



श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा यांच्या पुढाकाराने वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, भगवान महावीर अध्ययन केंद्र आणि श्रीमान भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा उत्साहात रंगली. पारितोषिके प्रतिष्ठानचे अध्यक्ष व मानद सचिव डॉ. रणजित गांधी, जैन तत्त्वज्ञान अभ्यासक डॉ. त्रिशला नाडगौडा पाटील (रबकवी, कर्नाटक), डॉ. सरिता कोठाडिया, विश्वस्त पराग शहा, वैभव गांधी, सुनील गांधी, प्रदीप शहा आणि इतर उपस्थित होते. विजेत्या संघाला १२०० चे पारितोषिक, तर द्वितीय व तृतीय क्रमांक विजेत्यांना अनुक्रमे ८०० आणि ६००, तसेच स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**गटनिहाय प्रथम तीन क्रमांक निकाल याप्रमाणे : माध्यमिक** : उमाबाई श्राविका विद्यालय, महावीर हायस्कूल, विलासचंद्र मेहता माध्यमिक विद्यालय उत्तेजनार्थ जिल्हा परिषद शाळा, हनमुर्गी; नूतन विद्यालय, आष्टी.

**कनिष्ठ महाविद्यालय** : एस.व्ही.सी.एस. कनिष्ठ महाविद्यालय, वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स ज्युनियर कॉलेज, मातोश्री गंगूबाई केकडे ज्युनियर कॉलेज. उत्तेजनार्थ- डी.ए.वी. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स; हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स

**वरिष्ठ महाविद्यालय** : डब्ल्यूआयटी जैन टेम्पल, वालचंद आर्ट्स अँड सायन्स वरिष्ठ महाविद्यालय, डब्ल्यूआयटी उत्तेजनार्थ- सेठ गोविंदरावजी आयुर्वेदिक महाविद्यालय; कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन

**खुला** : शुद्धधोहम स्वाध्याय मंडळ वैराग, सर्वज्ञदेशना स्वाध्याय मंडळ मरूदेवी महिला स्वाध्याय मंडळ जेऊर उत्तेजनार्थ- दिगंबर जैन मंदिर स्वाध्याय मंडळ, लातूर; शुद्धोहम स्वाध्याय ग्रुप; स्वाध्याय मंडळ, कुपवाड.

# ८९२ कोटी पाणीपुरवठा योजनेचे निघाले टेंडर

## जागतिक बँकेकडून मिळणार अर्थसहाय्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ डिसेंबर-**

महापालिकेच्या शहर जलवितरण सुधारणेच्या ८९२ कोटींच्या योजनेसाठी जागतिक बँकेने ६०० कोटी रुपये देण्याची तयारी दाखविली आहे. उर्वरित ३०० कोटींपैकी २०० कोटी रुपये बाँडच्या माध्यमातून तर ९२ कोटी स्वनिधीतून उभारण्याची तयारी महापालिका प्रशासनाकडून आहे. या योजनेला नगरविकास खात्याची मंजुरी मिळाली असून निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

दुहेरी जलवाहीनीचे काम पूर्ण झाले. आता शहरातील अंतर्गत जलवाहिनीच्या कामाला या प्रक्रियेनंतर गती येणार आहे. मुख्यमंत्री कार्यालयाचे आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी यांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्यासोबत काल पाणीपुरवठा योजनेवर बैठक घेतली. या बैठकीत नव्या योजनेच्या आराखड्यावर चर्चा झाली. उजनी ते सोलापूर समांतर जलवाहिनी पूर्ण झाल्यानंतर शहरासाठी १७० एमएलडी जादा पाणी मिळाले आहे. परंतु, हे पाणी साठवून ठेवणे आणि वितरण करण्याची पुरेशी व्यवस्था नसल्याचे समोर आले. त्यानंतर पालिकेने शहर जलवितरण सुधारणेसाठी ८९२ कोटींची योजना तयार केली.

या नव्या योजनेत पाणी साठविण्यासाठी कोंडी येथे तीन, जुळे सोलापूर येथे तीन टाक्या बांधणे, जलवितरणासाठी हद्दवाढ भागात नव्या २३ टाक्या उभारण्याचा समावेश आहे. ४० हजार घरांना मीटर बसविण्यात येणार आहे.

पाण्याच्या टाक्या भरण्यासाठी ६५ किलोमीटरची नवी पाइपलाइन, जुन्या पाइपलाइन बदलणे आणि काही भागांत नव्याने करणे यासाठी ७२० किलोमीटर पाइपलाइन बदलण्याच्या कामाचा समावेश आहे.

# ‘शासकीय अभियांत्रिकी’साठी आपण का कमी पडतोय?




**कलेक्टर कचेरीतून**
**अविनाश गायकवाड**
**मो. 9421876340**

१९६६ साली सोलापूरला मंजूर झालेले शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय तब्बल ६० वर्षांच्या प्रतिक्षेनंतरही सोलापूरला मिळालेले नाही. गतवर्षी आपल्या शहरापेक्षा लहान असलेल्या लातूरला अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू झाले मात्र सोलापूरकर लोकप्रतिनिधी किंवा शासकीय तंत्रनिकेतन प्रशासन प्रस्ताव देण्यास कुठे कमी पडले आहे का? हे स्थानिक नागरिकांना अद्यापही समजले नाही. दरम्यान, गरिबांच्या लेकरांना उच्च शिक्षण घेण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची सोलापुरात नितांत गरज आहे. याबाबत आ. देवेंद्र कोठे यांनी हिवाळी अधिवेशनात नुकताच आवाज उठविल्याने पुन्हा या अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विषय शासनाच्या अजेंड्यावर आला आहे. दरम्यान, आता भविष्यात आम्ही महाविद्यालयाबाबतचे सर्व प्रस्ताव तयार करून सर्व संबंधित कार्यालयांना पाठवू मात्र राजकीय क्षेत्रातून आ. कोठे यांनीच यासाठी पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा कॉलेज प्रशासनातील काही कर्मचाऱ्यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना व्यक्त केली.



मागील पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सोलापूरला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मंजूर केले आहे. यासाठी तब्बल ३०० कोटीच्या निधीची घोषणाही केली होती. या महाविद्यालयाच्या मंजुरीसाठी दिल्ली येथील ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन संस्थेकडे सोलापुरातून तत्कालिन प्राचार्य अशोक उपाध्याय यांनी सविस्तर प्रस्ताव त्यावेळी पाठविला होता; विशेष म्हणजेच लातूरकडूनही याच काळात प्रस्ताव दाखल झाला होता. गतवर्षी लातूरला हे महाविद्यालय सुरू झाले मात्र सोलापुरात का सुरू झाले नाही; याबाबत कोणीही लोकप्रतिनिधी किंवा महाविद्यालयाच्या प्रशासनाकडून चिंतन केले नसल्याची चर्चा सध्या सुरू आहे. मागील काही वर्षांपूर्वी प्रशासनाकडून पाठविलेला प्रस्ताव दिल्लीच्या त्या कार्यालयाने काही तांत्रिक कारणे देत रद्द केला होता. आता नव्याने प्रस्ताव आम्ही पाठवितो; आ. कोठे यांनी यासाठी राजकीय वजन वापरून महाविद्यालय तत्काळ मंजुरीसाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा शासकीय तंत्रनिकेतनमधील प्रशासकीय कर्मचारी आणि प्राध्यापकवृदांची आहे.

सध्या सुरू असलेल्या शासकीय तंत्रनिकेतनच्या ३४ एकर जागेचा आणि उपलब्ध इमारतींचा उपयोग करून २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सोलापुरात सुरु व्हावे, अशी मागणी नुकतीच आमदार कोठे यांनी अधिवेशनात लावून धरली आहे. आ. कोठे यांची निवड झाल्यापासून आजतागायत शहरात विविध विकासकामे त्यांनी केली आहेत. आ. कोठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे यांचाही चांगला विश्वास चांगला संपादन केल्याने त्यांनीच या विषयावर पाठपुरावा केल्यास नक्कीच हे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू होईल, असा आशावाद शिक्षकवृंदांकडून व्यक्त होत आहे. लातूरसारख्या ठिकाणी गतवर्षी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू झाले असून, सोलापुरात का होत नाही? असा सवाल काही पालकांनीही तंत्रनिकेतच्या विविध पालक बैठकीत वारंवार उपस्थित केला होता. मात्र याबाबत कोणीही गांभीर्य दाखवित नसल्याचेच दिसून येत आहे. आ. कोठे यांनी हिवाळी अधिवेशनात केलेल्या अभ्यासपूर्ण मांडणीमध्ये सोलापुरातील आयटी पार्क, उड्डाणपूल, बी टू जमिनी, डीपी रोड, सोलापूरला मंजूर झालेल्या १०० इलेक्ट्रिकल बस प्राधान्यक्रमाने सोलापूरला मिळाव्यात, गो-तस्करी आदी मुद्दयांवर अभ्यासपूर्ण मांडणी करताना शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचा मुद्दाही लावून धरला आहे. यासाठी आता आमदार कोठे यांनी मनावर घेवून त्यांच्याच मतदार संघातील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयाची नवीन मुहूर्तमेढ रोवावी, अशी अपेक्षा तंत्रनिकेतन प्रशासनासह तमाम सोलापूरकरांची आहे.

## महत्वाचे...



### शिक्षण क्षेत्रातील जीवन-गौरव पुरस्काराने संभाजी घाडगे सन्मानित

**बार्शी, दि. १४ डिसेंबर-**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बार्शी यांच्यावतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना डॉ. कुंताताई नारायण जगदाळे जीवन-गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येतो. शिक्षण, सामाजिक, साहित्य, वैद्यकीय, पत्रकारिता, कृषी, क्रीडा आदी नऊ क्षेत्रांतील व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. यावर्षीचा शिक्षण क्षेत्रातील जीवनगौरव पुरस्कार जिजाऊ गुरुकुल, खांडवीचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजेंद्र दास, सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. रणजीत धुरे तसेच कामगार नेते कॉं. तानाजी ठोंबरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यापूर्वीही संभाजी घाडगे यांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.



### मायेची पाखर, परिमळ, आठवणींचा दरवळ या तीन पुस्तकांचे प्रकाशन

**बार्शी, दि. १४ डिसेंबर-**

येथील कवी कालिदास मंडळाच्या माजी अध्यक्षा व लेखिका सुमन चंद्रशेखर यांच्या मायेची पाखर (कादंबरी), परिमळ (काव्यसंग्रह) व आठवणींचा दरवळ (ललित लेखसंग्रह) या तीन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न झाला. कवी कालिदास मंडळ व चंद्रशेखर परिवार आयोजित प्रकाशन सोहळा ज्येष्ठ लेखिका डॉ. श्रुती वडगबाळकर यांच्या हस्ते, वक्त्या डॉ. रजनी जोशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी साहित्यिक दत्ता गोसावी, कवयित्री सुमन चंद्रशेखर, शिवानंद चंद्रशेखर, मंडळाचे अध्यक्ष रामचंद्र इकारे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे अध्यक्ष रामचंद्र इकारे यांनी, सूत्रसंचालन सुरभी चंद्रशेखर यांनी तर आभारप्रदर्शन अभिजीत चंद्रशेखर यांनी केले. हर्षा स्वामी यांनी परिमळ या काव्यसंग्रहातील कवितावाचन केले. पुष्पा स्वामी यांचे संदेश वाचन गीता चंद्रशेखर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश गव्हाणे, आबासाहेब घावटे, शारदा पानगावकर, अजिंक्य स्वामी, आदिती स्वामी, वर्षा स्वामी, विश्वनाथ स्वामी, भगवंत कपाळे आदींनी परिश्रम घेतले. यावेळी कवयित्री वंदना कुलकर्णी, आरती काळे, लेखक हरिश्चंद्र पाटील उपस्थित होते.



### नाझरे येथे रंगनाथ स्वामी यांचा जन्मदिन व पुण्यतिथी साजरी

**सांगोला,दि.१४ डिसेंबर -**

नाझरे (ता. सांगोला) येथे राजयोगी रंगनाथ स्वामी यांचा जन्म दिन व पुण्यतिथी सोहळा मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाला. राजयोगी रंगनाथ स्वामींनी धर्मरक्षणासाठी घरदार सोडले व बारा वर्षे तपश्चर्या करून श्री दत्तगुरूंनी त्यांना दर्शन दिले. तसेच बारा वर्षानंतर रंगनाथ स्वामी पंढरपूरला आले व त्यानंतर नाझरे येथे आले. तसेच त्यांनी अनेक वर्षे निगडी येथे वास्तव्य केले. राजयोगी रंगनाथ स्वामी महाराजांचे धर्मरक्षणाचे कार्य मोठे असून अशा या संतांच्या विचाराची आज ही गरज आहे, असे उदगार हभप.वंदनाताई कापरे यांनी याप्रसंगी काढले. यानिमित्त श्री रंगनाथ श्रीकृष्ण दीक्षित सेलूकर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली विष्णू याग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. तसेच दिंडी प्रदक्षिणा घालून महाप्रसाद वाटप करण्यात आला.

# बार्शी न्यायालयातील राष्ट्रीय महालोकअदालतीत यात्रेचे स्वरुप

## १४६९ प्रकरणे तडजोडीने निकाली : ३ कोटी ७५ लाख २१ हजार ९१६ रुपयांची वसुली

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ डिसेंबर-**

बार्शी न्यायालयात आयोजित राष्ट्रीय महालोक अदालतीत २३१ प्रलंबित दिवाणी तसेच तडजोडपात्र फौजदारी खटले व दाखल पुर्व १ हजार २३८ असे १ हजार ४६९ प्रकरणे तडजोडीने मिटवण्यात आली. यामध्ये प्रलंबित प्रकरणात ३ कोटी २६ लाख ६६ हजार ८२४ तर दाखलपुर्व प्रकरणांत ४८ लाख ५५ हजार ९२ रुपयांची वसुली झाली.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार, अध्यक्ष,जिल्हा विधी सेवा प्राधिकरणे सोलापूर एम. एस. शर्मा यांचे मार्गदर्शनाखाली व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर पी. पी. पेटकर यांच्या सहकार्याने, बार्शी तालुका विधी सेवा समिती, बार्शी व वकील संघ बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती बार्शी तथा जिल्हा न्यायाधीश विक्रमादित्य के. मांडे यांचे अध्यक्षतेखाली ही राष्ट्रीय महा लोकअदालत झाली.

या राष्ट्रीय महालोक अदालतीत बार्शी न्यायालयात प्रलंबित असलेले दिवाणी व फौजदारी असे ३ हजार ७३८ व दाखलपूर्व ४ हजार ६२४ असे ८ हजार



पॅनल क्रमांक ४ मधील पक्षकारास अवॉर्ड सुपूर्त करताना अध्यक्ष श्री व्ही के मांडे व पॅनल प्रमुख श्रीमती राऊत मॅडम

३६२ प्रकरणे लोकअदालत पॅनलमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. या लोकअदालतीमध्ये बार्शी न्यायालयातील एकुण सात पॅनल करण्यात आले होते. त्यात जिल्हा न्यायाधीश-१ विक्रमादित्य के. मांडे, जिल्हा न्यायाधीश-२ श्रीमती व्ही. एस. मलकलपट्टे-रेडड्री, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर पी. बी. लोखंडे, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर श्रीमती पी. व्ही. राऊत, २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर जी. एस. पाटील, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती एच. यु. यु. पाटील, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती आर.पी. बागडे असे एकुण सात पॅनल होते. विशेष बाब म्हणजे पॅनल क. ३ मधील दिवाणी न्यायालय व स्तर पी. बी. लोखंडे यांचे न्यायालयातील १० वर्षे जुनी दरखास्त तडजोडीने निकाली काढण्यात आले. तसेच पॅनल क. ६ मधील श्रीमती आर.पी. बागडे यांचेकडील ७८ वर्षीय जेष्ठ महिला पक्षकार यांचा वाटपाचा दावा तडजोडीने निकाली करण्यात आला. जिल्हा न्यायालयातील मोटार अपघात प्रकरणांत एकुण २ प्रकरणे तडजोडीने मिटून त्यात सुमारे ३२ लाख ५० हजार इतक्या रक्कमेची नुकसान भरपाई मंजुर करण्यात आली.

एन. आय. ॲक्ट १३८ च्या एकुण १७ प्रलंबित प्रकरणांत तडजोड होवुन त्यात सुमारे ३२ लाख २८ हजार ५१ रुपयांची वसुली, तर रक्कम वसुलीच्या ४२ प्रकरणांत तडजोड होवुन त्यात २ कोटी ५६ लाख ८४ हजार ६६९ रुपयांची वसुली झाली. न्यायालयातील प्रलंबित तडजोडपात्र फौजदारी प्रकरणांत १२ इतकी प्रकरणे व कबुलीची ९२ प्रकरणे तडजोडीने निकाली करण्यात आली. त्यात सुमारे ८० हजार ७०० रुपयांची दंड वसुल करण्यात आला. सदर लोकअदालतीमध्ये पक्षकारांनी मोठया प्रमाणांत सहभाग नोंदविला. बार्शी वकील संघाचे अध्यक्ष रणजित गुंड, पॅनल विधीज्ञ, सर्व कर्मचारी, पोलीस, बँका तसेच फायनान्स कंपन्या, पंचायत समिती बार्शी, विज वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी यांचे विशेष सहकार्य लाभले.

# देशात चार वर्षात होणार दोन लाख सोसायट्या

## केंद्र सरकारच्या नव्या धोरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला होणार फायदा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ डिसेंबर-**

देशातील सहकाराचे जाळे अधिक मजबूत होण्यासाठी केंद्रिय सहकारमंत्री अमित शहा यांनी २०२९ पर्यंत देशात नव्या दोन लाख बहुउद्देशीय विविध कार्यकारी सहकारी संस्थांची स्थापना करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्याअंतर्गत आतापर्यंत ३२ हजार संस्थांची स्थापना करण्यात आली आहे. ही योजना पूर्णत्वास गेल्यानंतर देशातील प्रत्येक ग्रामपंचायतीत किमान एक सहकारी सेवा संस्था असणार आहे. सहकार मंत्रालयाच्या स्थापनेनंतर तीन वर्षांत ११४ हून अधिक निर्णय घेण्यात आले आहेत. यासंदर्भात केलेले आदर्श उपविधींना (मॉडेल बाय लॉज) केरळ वगळता देशातील ३२ राज्यांनी मान्यता दिली आहे.

केंद्र सरकारने देशातील ७९ हजार संस्थांचे संगणकीकरण सुरू केले असून, त्यासाठी २ हजार ९०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सरकारने आदर्श उपविधी (मॉडेल बाय लॉज) तयार करून या संस्थांना बहुद्देशीय स्वरूप दिले असून,



त्यामुळे सहकारी सेवा संस्थांना विविध प्रकारचे २५ व्यवसाय करता येणे शक्य झाले आहे. संगणकीकरणामुळे कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होत आहे. परिणामी, ग्रामीण स्तरावर शेतकऱ्यांना विविध सेवा अधिक वेगाने, पारदर्शकपणे आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध होत आहेत, ज्याचा थेट फायदा ग्रामीण अर्थव्यवस्थेला होत असल्याचे सांगण्यात आले आहे.

**साठवण क्षमतेची निर्मिती होणार**

या उपक्रमांतर्गत आतापर्यंत ११ राज्यांतील ११ गोदामांची उभारणी पूर्ण करण्यात आली आहे. पायलट प्रकल्पाचा विस्तार करण्यासाठी ७०४ संस्थांची निवड केली असून यामुळे सुमारे ६० हजार मेट्रिक टन साठवण क्षमतेची निर्मिती होणार आहे. ही गोदामे भाडेतत्त्वावर उपलब्ध व्हावीत, यासाठी करार करण्यात आले आहेत.

**धान्याची नासाडी कमी होईल**

१९६३ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय सहकार विकास महामंडळामार्फत २०१४ पर्यंत सहकारी संस्थांना केवळ ४५ हजार कोटी रुपयांची मदत करण्यात आली; परंतु गेल्या ११ वर्षांत केंद्र सरकारने आतापर्यंत ४ लाख २१ हजार कोटी रुपयांची मदत दिली आहे. देशातील एकूण धान्य उत्पादनाच्या तुलनेत साठवणूक क्षमतेत सुमारे १६६ दशलक्ष टनांची कमतरता आहे. धान्य साठवणुकीसाठी एका योजनेवर सरकारने काम सुरू केले आहे. ही योजना पूर्णत्वास गेल्यानंतर धान्याची नासाडी कमी होईल, वाहतूक खर्चात बचत होईल आणि शेतकऱ्यांना त्याचा थेट लाभ मिळणार आहे.

# भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ डिसेंबर-**

तालुक्यातील एका गावात पैशाच्या कारणावरुन सुरू असलेले भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या एका महिलेचा विनयभंग केल्याची संतापजनक घटना घडली आहे. याप्रकरणी पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरुन सचिन अशोक गरड (रा. तांदुळवाडी, ता. बार्शी) याच्या विरोधात बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना दि.१२ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली. संबंधित गावात एका चौकात शाश्वत सिंग आणि शेतमालक कल्याण दत्तात्रय आगलावे यांच्यामध्ये पैशाच्या व्यवहारावरुन वाद सुरु होता.

हा वाद विकोपाला गेल्याने तिथे उपस्थित असलेल्या पीडित महिला हे भांडण सोडवण्यासाठी मध्ये गेल्या होत्या. त्या दरम्यान तिथे उपस्थित असलेला संशयित आरोपी सचिन गरड याने महिलेच्या पाठीमागून येत असभ्य वर्तन केले आणि त्यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले.

पीडित महिलेने त्याला जाब विचारला. 'तू असे का केले?' असे विचारताच संशयित आरोपीने महिलेला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत दमदाटी केली आणि घटनास्थळावरुन पळून गेला. महिलेने या अनोळखी व्यक्तीबद्दल तिथे उपस्थित असलेल्यांकडे चौकशी केली असता, त्याचे नाव सचिन अशोक गरड (रा. तांदुळवाडी) असल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी पीडित महिलेने बार्शी तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार आरोपी सचिन गरड याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलीस फौजदार (अरक) गवळी हे करत आहेत.

# टेंभुर्णी बसस्थानकात मोबाईल चोरीचा प्रयत्न हाणून पाडला

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब,दि.१४ डिसेंबर-**

टेंभुर्णी (ता. माढा) बसस्थानक परिसरांत मोबाईल चोरीचा प्रयत्न पोलिसांच्या सतर्कतेमुळे हाणून पाडण्यात आला.

रविवारी (दि. १४) सुमारे पावणे बाराच्या सुमारास टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पो.कॉ. सी.एम.कुलकर्णी हे पेट्रोलिंग करीत असताना बसमध्ये चढत असलेल्या एका प्रवाशाचा मोबाईल चोरीस गेल्याची तक्रार करण्यात आली. तक्रार मिळताच पोलिसांनी तात्काळ बसस्थानक परिसरात संशयिताचा शोध सुरू केला. यावेळी बसस्थानकातून बाहेर पडताना एक संशयित व्यक्ती आढळून आला. पोलिसांनी त्याचा पाठलाग सुरू करताच संशयिताने,



पोलिसांना संशय येताच जुना पुणे-सोलापूर महामार्गावर मोबाईल फेकून देत रस्त्यावरील वाहतुकीचा फायदा घेत पसार झाला.दरम्यान, मोबाईल चोरीस गेलेल्या व्यक्तीचे नाव दीपक शिरसकर (रा. जेऊर) असल्याचे पोलिस कर्मचारी कुलकर्णी यांनी सांगितले. या घटनेनंतर संबंधित प्रवाशाने पोलिसांच्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करत टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# शिवदारे कॉलेजमध्ये आजपासून विज्ञान प्रदर्शन

## नाविन्यपूर्ण कल्पनांना वाव; विविध प्रकारचे ड्रोन व त्याची माहिती मिळणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ डिसेंबर-**

जुळे सोलापूर शहरातील शिवदारे महाविद्यालयाच्या प्रांगणात शिवदारे जन्मशताब्दी महोत्सव प्रतिष्ठान आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने १५ आणि १६ डिसेंबर रोजी विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले आहे. या अत्याधुनिक विज्ञान प्रदर्शनात इलेक्ट्रिक, बायोटेक्नॉलॉजी, मेडिकल, इंजिनिअरिंग अशा विविध क्षेत्रातील विद्यार्थी तसेच कनिष्ठ, वरिष्ठ, शालेय विद्यार्थी यासह खुल्या गटातील स्पर्धक आपले नाविन्यपूर्ण विज्ञान प्रदर्शन सादर करणार आहेत. या प्रदर्शनाचे खास वैशिष्ट्य म्हणजे ड्रोनद्वारे केली



जाणारी प्रगत शेती या विषयावर ड्रोनचे प्रात्यक्षिक दाखवले जाणार आहे. विविध प्रकारचे ड्रोन त्यांची माहिती आणि प्रत्यक्ष येथे पहावयास मिळणार आहे. आत्मनिर्भर भारत हे विज्ञान प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे. या माध्यमातून नवीन पिढीमध्ये नाविन्यता तसेच आत्मनिर्भरता निर्माण करणे हा आमचा मुख्य उद्देश असल्याचे सोलापूरचे प्रसिद्ध आणि जेष्ठ वैज्ञानिक वेंकटेश गंभीर यांनी सांगितले. हे विज्ञान प्रदर्शन अनोखे आणि नाविन्यपूर्ण आहे. यामध्ये सर्व वयोगटातील स्पर्धक मोठ्या उत्साहात सहभागी होणार आहेत.

हे अत्याधुनिक विज्ञान प्रदर्शन पाहण्यासाठी याचा अनुभव घेण्यासाठी प्रत्येक विज्ञानप्रेमींनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन गंभीर यांनी यावेळी केले आहे.

**ड्रोनद्वारे अवघ्या सात मिनिटात पिकांवर औषध फवारणी**

सध्या जग आधुनिक शेतीकडे वाटचाल करत आहे. शेती आता मनुष्यविरहित बनली आहे. अनेक ठिकाणी मशनरी तसेच टेक्नॉलॉजीचा वापर केला जात आहे. त्याचा प्रत्यक्ष अनुभव या प्रदर्शनात पहावयास मिळणार आहे. विविध प्रकारचे ड्रोन हे या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य आहे. आपल्या भारतातील तसेच सोलापुरातील अनेक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट असे दोन निर्मित केले आहेत. ज्याचा वापर करून शेती सुलभ पद्धतीने करणे शक्य होणार आहे. ड्रोन चा वापर करून अवघ्या सात मिनिटात पिकांवर औषध फवारणी करता येणार आहे. याचे प्रात्यक्षिक या प्रदर्शनात दाखवले जाणार आहे. यांसह त्याची माहिती ऑपरेटिंग सिस्टीम याबद्दल देखील सविस्तर माहिती दिली जाणार आहे.

**- वेंकटेश गंभीर, ज्येष्ठ वैज्ञानिक**




# आतंकवाद्यांना उत्तरासाठी घरोघरी छत्रपती शिवाजी महाराज जन्माला येतील

## देशाच्या राजधानीत घुमला 'सनातन राष्ट्रा'चा शंखनाद!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ डिसेंबर-**

पूर्वी जिहादी आतंकवादी वाट्टेल तिथे स्फोट करायचे, आता मात्रा त्यांना चोख प्रत्युत्तर दिले जात आहे. त्यामुळे सेक्युलवाद्यांच्या पोटात दुखत आहे. दिल्लीत स्फोट करून लोकांमध्ये भय निर्माण करण्याचा प्रयत्न केला असला, तरी आमच्यात भय निर्माण होणार नाही. उलट तुम्ही जेवढे जिहादी आतंकवादी निर्माण कराल, तेवढे छत्रपती शिवाजी महाराज घरोघरी निर्माण होतील, असा स्पष्ट इशारा दिल्लीचे सांस्कृतिक कार्यमंत्री कपिल मिश्रा यांनी दिला.

नवी दिल्ली येथील 'भारत मंडपम्' येथे 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशन' आणि 'सनातन संस्था' आयोजित 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा' च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी रामनामाचा सामूहिक जप, शंखनाद आणि वेदमंत्र पठण झाले. प.पू. शांतिगिरी महाराज, सनातन संस्थेचे संस्थापक डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारीणी श्रीसत्शक्ति बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्शक्ति अंजली गाडगीळ, 'सेव्ह कल्चर



सेव्ह भारत फाउंडेशन'चे अध्यक्ष आणि भारताचे माजी माहिती आयुक्त उदय माहूरकर, जेष्ठ पत्रकार सुरेश चव्हाणके, हिंदु जनजागृति समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक डॉ. चारुदत्त पिंगळे, प्रवक्ते अभय वर्तक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. मिश्रा पुढे म्हणाले, पूर्वीच्या सरकारच्या काळात राष्ट्राच्या खऱ्या प्रश्नावर चर्चेसाठी सरकारचा विरोध असायचा मात्र आज होत असलेल्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'ला केंद्र आणि राज्य सरकार अशा दोघांचेही समर्थन आहे. यापुढील काळात धर्म आणि संस्कृती यांचे रक्षण व उत्थान यांच्यासाठी सतत कार्यरत रहाण्याचा संकल्प प्रत्येकाने करायला हवा.

'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल उपस्थितांनी 'वंदे मातरम्'चे सामूहिक गायन केले. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाचेही सहकार्य लाभले. यावेळी सनातन संस्था निर्मित 'संकल्प रामराज्य का' या हिंदी ग्रंथाचे, तर संरक्षण मंत्रालयाचे अपर सचिव वेदवीर आर्य लिखित 'क्रॉनोलॉजी ॲन्ड ओरिजिन्स ऑफ इन्डो युरोपियन सिविलाइजेशन' या इंग्रजी पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

हा महोत्सव सनातन राष्ट्र शंखनाद डॉट इन या संकेतस्थळावर लाइव्ह पाहता येणार आहे. त्यामुळे तो पाहण्याचे आवाहन सनातन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

**'विकृती सामृगी मुक्त देश'विषयी संकल्पाची गरज**

आज 'ओटीटी', सामाजिक माध्यमे यांसारख्या विविध माध्यमांतून अश्लिलतेचा प्रचार केला जात आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी ज्यापध्दतीने हिंदवी स्वराज्य निर्माण केले. त्याप्रमाणे हिंदु राष्ट्र स्थापन करण्यासाठी देशातील शिक्षा पध्दती कठोर होणे आवश्यक आहे. भारत 'विकृती सामृगी मुक्त' देश व्हावा, असा संकल्प करण्याची गरज आहे, असे उदय माहूरकर यांनी यावेळी बोलताना केले.

**अडीच आघाड्यांवर लढाई**

यावेळी सनातन संस्थेचे प्रवक्ते अभय वर्तक म्हणाले की, आज देशात एकही जिल्हा व राज्य असे नाही की, जेथे आतंकवाद्यांचे स्लीपर सेल नाहीत. दोन आघाड्यांवर सेना आणि सरकार लढत आहे. अर्ध्या आघाडीवर जनतेला लढायचे आहे. तरच या आतंकवाद्यांना पायबंद बसणार आहे. यासाठी देशाच्या राजधानीत, कुरूक्षेत्राजवळ 'सनातन राष्ट्रा'चा शंखनाद करत आहोत, असे सांगण्यात आले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मंदिर समितीकडून सुलभ दर्शन व्यवस्था

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि १४ डिसेंबर-**



भाविकांनाकमीत कमी वेळात सुलभ स्वामी दर्शनाचा लाभ होण्यासाठी मंदीर समितीच्यावतीने सोय करण्यात आली आहे. त्यामुळे अनेकांना त्याचा फायदा होत आहे. वयोवृद्ध व विकलांग भाविकांसाठी व्हीलचेअरची व्यवस्था आहे. महिला व पुरुष भाविकांची स्वतंत्र रांगेतून स्वामी दर्शनाची सोय करण्यात आली आहे. मंदिरात गर्दी असली तरी शिस्तीत दर्शन होत आहे.

> कुटुंबासमवेत येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात श्री. स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. मंदीर समितीने भाविकांसाठी केलेले नियोजन पाहून सामाधान वाटले. मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी मंदीरात भजन, कीर्तन, हरीनाम सप्ताह, पायी चालत येणाऱ्या दिंडी व पालखी सोहळ्यामधील भाविकांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल आनंद वाटला. **- ॲड.सुहास खर्डे, स्वामी भक्त ,नाशिक**



### महत्त्वाचे



## विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**माळशिरस, दि.१४ डिसेंबर-**

येथील विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन माळशिरस पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विकास दिंडुरे यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड.मिलिंद कुलकर्णी, जनरल सेक्रेटरी रामभाऊ दोशी, मानसी कुलकर्णी, प्राचार्या अपर्णा कुलकर्णी, श्रीरंग तरडे, धनंजय मस्के, धोंडीराम मस्के, नामदेव पाटील, बाजीराव पिसे, नंदकुमार घाडगे यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. काठी न घोंगडे घेऊ द्या की, मला बी जत्रेला येऊ द्या की..या पारंपारिक गाण्यासह नवीन गाण्यांवर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर करून सर्वांची मने जिंकली. आपल्या पाल्याचे नृत्य पाहण्यासाठी व त्यांचे फोटो काढण्यामध्ये पालक व्यस्त होते. लहान मुलांसह मोठ्या मुलांनी सादर केलेल्या सादरीकरणास सर्वांनी दाद दिली.

## ट्रॅक्टरने पाठीमागून धडक दिल्याने सर्जापूरमधील एकाचा मृत्यू

**वैराग, दि १४ डिसेंबर-**

शेतातून गावाकडे सायंकाळी येत असताना ट्रॅक्टरने पाठीमागून धडक देऊन गंभीर जखमी झालेल्या इसमाचा मृत्यू झाला आहे . सदरची घटना वैराग -धामणगाव रोडवर शनिवारी १३ डिसेंबर रोजी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली आहे .वैराग पोलिसात मयताचा चुलत भाऊ विलास शिवाजी गायकवाड यांनी फिर्याद दिल्याने रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. सर्जापूर येथील नितीन भिमराव गायकवाड ( वय ४५ वर्ष) हे आपल्या शेतातून सर्जापूर गावाकडे वैराग-धामणगाव रोडने चालत येत होते. दरम्यान या रस्त्यावरील सर्जापूर हद्दीतील ओढयावर ट्रॅक्टर (एम एच २३ बी एन २७७३) चालक नवनाथ तुकाराम डोंगरे (रा. कासारी जि.बीड) याने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टरने नितीन गायकवाड याला पाठीमागून जोराची धडक देऊन त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरला आहे. याबाबत ट्रॅक्टर चालका विरुद्ध वैराग पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल सचिन मुंडे हे करीत आहेत.



## थकबाकीदारांसह नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या

**पिलीव, दि.१४ डिसेंबर-**

राज्यातील शेतकरी सध्या अतिवृष्टी, महापुर, हमीभाव न मिळणे ,ऊसाला एफआरपी न मिळणे अशा अनेक कारणांमुळे अडचणीत आला आहे. विविध बँका, सोसायट्या यांच्या कर्जामुळेही शेतकरी संकटात आहे. महायुती सरकारने निवडणुकीत कर्ज माफीचे आश्वासन दिले होते मात्र त्याची अंमलबजावणी कधी होणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. थकबाकीदारांसह नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना तत्काळ कर्जमाफी देण्याची मागणी हेत आहे. शासन प्रत्येक वेळी फक्त थकबाकीदार शेतकऱ्यांचाच विचार करते मात्र जे शेतकरी अडचणीत असूनही वेळेत कर्ज भरतात याचा शासन विचार करीत नाही. अशी नाराजी सध्या शेतकऱ्यांमधुन आहे. सरकारने एकदा संपूर्ण सातबारा कोरा करुनच शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यातून बाहेर काढणे आवश्यक आहे. सध्या शासनाने अतिवृष्टीग्रसत भागातील शेतकऱ्यांच्या कर्ज वसुलीस एक वर्षाची स्थगिती दिली आहे .पण अद्यापही शासनाचा आदेश न आल्यामुळे शेतकऱ्यांच्या मागे कर्ज वसुलीचा तगादा सुरूच आहे.शासन सर्व शेतकऱ्यांचा सात बारा उतारा कोरा करणार की फक्त थकबाकीदारांना दिलासा देणार अशी चर्चा सध्या शेतकऱ्यांतून सुरू आहे. यापूर्वी सरकारने २०१७ मध्ये दीड लाखापर्यंत तर २०१९ मध्ये दोन लाखापर्यंत कर्जमाफी दिली होती.

## बार्शी-कुर्डुवाडी रोडवर पिकअप आणि कारचा भीषण अपघात; एक जखमी

**बार्शी, दि.१४ डिसेंबर-**

बार्शी-कुर्डूवाडी रोडवर खांडवी शिवारात भरधाव पिकअप आणि कार यांच्यात जोराची धडक होऊन अपघात झाला. या अपघातात कारचालक जखमी झाला असून दोन्ही वाहनांचे सुमारे दोन-अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी पिकअप चालकाविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी बार्शी-कुडुवाडी रोडवरील बारबोले फार्म हाऊस (खांडवी शिवार) जवळ हा अपघात घडला. संशयित आरोपी चालक अहमद रजा शेख (रा. गुणवडी रोड, शेख वस्ती, बारामती) हा आपल्या ताब्यातील पिकअप (एमएच ४२ बीएफ २४१९) घेऊन जात होता. यावेळी त्याने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत हयगयीने आणि अविचाराने भरधाव वाहन चालवले. यामुळे समोरुन येणाऱ्या कारला (एमएच १२ जीआर ७६९७) जोराची धडक बसली. या धडकेत कारचालक चतुर्भुज तुकाराम शेळके (रा. शेळका-धानोरा, ता. कळंब) हे जखमी झाले आहेत. तसेच या अपघातात पिकअपचे एक लाख आणि कारचे दीड लाख असे मिळून एकूण अडीच लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. याप्रकरणी पिकअपचा मालक फिर्यादी हुसेन आमिन शेख (वय २९, रा. समर्थनगर, बारामती, जि. पुणे) यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरुन पिकअप चालक अहमद रजा शेख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक घोळवे करत आहेत.

# विष्णूपद मंदिर परिसरात घाणीचे साम्राज्य

### कायमस्वरुपी स्वच्छतेसाठी विशेष प्रयत्नांची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ डिसेंबर -**

येथील गोपाळपूर रस्त्यावरील अत्यंत प्राचिन अशा विष्णूपद मंदिर आणि परिसरात नियमित स्वच्छता राखण्याची गरज आहे. कारण धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने हे एक महत्वाचे ठिकाण आहे. पंढरपूरात विठुरायाच्या दर्शनासाठी आलेला प्रत्येक जण विष्णूपद येथे दर्शनासाठी आवर्जून जात असतोच. शिवाय मार्गशिर्ष महिन्यात संपुर्ण महिनाभर या मंदिरातच विठ्ठलाचे वास्तव्य असल्याची अख्यायिका सांगितली जाते. यावर्षी आता मार्गशिर्ष महिना संपत आलेला आहे. मात्र सध्या पाहिले तर या मंदिराच्या परिसरात घाणीचे मोठे साम्राज्य पसरलेले दिसत आहे. त्यामुळे या मंदिर परिसराकडे येथील नगरपालिका तसेच विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती यांनी विशेष लक्ष देवून या ठिकाणी कायमस्वरुपी स्वच्छता राहिल, भरपूर उजेडाची सोय राहिल याची खबरदारी घेतली पाहिजे.

येथील चंद्रभागेच्या पात्रात असलेले विष्णूपद मंदिर हे एक प्राचिन मंदिर आहे. विठ्ठलाच्या दर्शनासाठी येथे येणारा प्रत्येक भाविक विष्णूपद मंदिराला भेट देत असतो. सध्या या मंदिर परिसरात घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसत आहे. चंद्रभागा नदी मध्ये बऱ्या पैकी पाणी असून देखील सगळीकडे शेवाळे साठलेले दिसत आहे. मंदिराच्या समोरील बाजूस चंद्रभागा नदीच्या पात्रात तसेच वाळवंटा मध्ये बेसुमार वाळू उपसा झालेला असल्यामुळे पात्रात अनेक ठिकाणी खड्डे पडलेले असून त्याचा देखील भाविकांना धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या बरोबरच मंदिराच्या बाजूला नदीपात्राच्या कडेला बाभळी सारखी झाडे, झुडपे वाढलेली दिसत आहेत. ती देखील काढून मंदिराकडील चंद्रभागेचा तीर देखील स्वच्छ करण्याची गरज आहे. मंदिराच्या बाजूला असलेल्या मारुतीच्या कट्यावर देखील पाणी आहे. या पाण्यात देखील शेवाळे आणि बऱ्याच ठिकाणी आळ्या झाल्याचे सहजदृष्टीस पडत आहे. मारुतीच्या कट्यावर देखील पाण्यात द्रोण, फाटक्या कापडाच्या चिंध्या, उष्टे,खरकटे अन्न पडलेले सर्रास दिसत आहे.

मंदिर परिसरातील चंद्रभागेच्या पात्रातील पाण्याला सध्या अक्षरशः वास येऊ लागलेला आहे. पात्रात शेवाळ साठल्यामुळे नदीच्या पाण्यावर त्या शेवाळाचा थर जमा झालेला आहे. मंदिर परिसरात असणाऱ्या हॉटेल, रसवंती गृहांच्या मालकांनी मंदिर परिसरात घाणी होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. चंद्रभागेच्या पात्राची देखील कायमस्वरुपी स्वच्छता राखली जावी. मुख्य रस्त्यावरुन मंदिराकडे जाणाऱ्या नदी पात्रातील दगडी पूलाला कायमस्वरुपी बॅरेकेटींग करण्यात यावे अशी देखील मागणी भाविकांमधून केली जात आहे.





**पंढरपूर : येथील अतिप्राचिन अशा चंद्रभागेच्या पात्रात असलेल्या श्री विष्णूपद मंदिर परिसरात सगळीकडे सध्या घाणीचे साम्राज्य पसलेले दिसत आहे.**

> मार्गशिर्ष शुध्द प्रतिपदा ते मार्गशिर्ष वद्य अमावस्या या काळात येथील मंदिरात संपुर्ण महिनाभर विठुरायाचे वास्तव्य असल्याची अख्यायिका आहे. त्यामुळे या ठिकाणी महिनाभर दररोज पहाटे व संध्याकाळी विठुरायाची आरती होत असते. या शिवाय विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन देखील येथे करण्यात येत असते. त्यामुळे पंढरपूर शहर तसेच आसपासच्या गावातील तसेच खास परगावाहून येणाऱ्या भाविकांची देखील या मंदिरात मोठी गर्दी असते. याच काळात नाताळ सुट्या असल्याने बाहेरगावच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सहली देखील येथे येत असतात. यावर्षी मार्गशिर्ष महिना आता संपत आलेला आहे. या ठिकाणी संपुर्ण महिनाभर भाविकांची गर्दी झाल्यामुळे या परिसरात सगळीकडे उष्टे, खरकटे अन्न, खरकट्या पत्रावळी, द्रोण,प्लास्टिकचे ग्लास सगळीकडे पडलेले दिसतात. त्यामुळे या ठिकाणी जर नियमीत स्वच्छता राखली गेली तर आलेला भाविक समाधानाने या ठिकाणी दर्शन घेऊन विसावु शकेल अशी व्यवस्था पालिकेकडून येथे करण्यात यावी अशी मागणी देखील भाविकांमधुन केली जात आहे.

### अशी आहे विष्णूपद मंदिराची अख्यायिका

चंद्रभागा पात्रातील विष्णूपद मंदिरात गायीच्या पावलांचे ठस्से , कृष्णाने राधा तसेच गायींसाठी वाजविलेली बासरी तसेच या ठिकाणी कृष्णाने आपल्या संवगड्यासह काला करुन खाल्लेली काल्याच्या वाटीच्या खुणा दगडा मध्ये कोरलेल्या दिसून येतात. या बरोबरच या ठिकाणी भगवान विष्णूची पावले देखील उमटलेली दिसतात. त्यामुळे या ठिकाणाला विष्णूपद असे नाव पडल्याचे सांगितले जाते.

## अक्कलकोट तीर्थक्षेत्री भाविकांचा महापूर

**वाहनांची कोंडी ▌पोलीस हतबल ▌ रस्ते अरुंद ▌वाढते अतिक्रमण**



**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि १४ डिसेंबर**

दत्तगुरुचे अवतार श्री वटवृक्ष स्वामी समर्थ महाराज यांच्या दर्शनार्थ तीर्थक्षेत्र अक्कलकोटी भाविकांची प्रचंड गर्दी होत आहे. वाहनांची प्रचंड संख्या, अरुंद रस्ते, अतिक्रमण, रस्त्यावर उभी वाहने, ॲटो रिक्षा यामुळे भाविकांना दर्शनार्थ जाणेही प्रचंड त्रासदायक होत आहे. यामुळे वटवृक्ष मंदिर समाधी मठ परिसर, गुरु मंदिर परिसर तातडीन रस्ते रुंदीकरण करणे गरजेचे आहे. अन्यथा भाविकांना ही गर्दी जीवघेणी , अपघाताला आमंत्रण देणारी, चेंगराचेंगरी अशा घटनांना सामोरे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शनिवार रविवार बुधवारी रात्री गुरुवार पोर्णिमा अशा वेळी अक्कलकोट तीर्थक्षेत्र भाविकांच्या प्रचंड गर्दीने व्यापुन जात आहे. भाविकांची प्रचंड वाहने पार्किंग करिता अपुरी जागा अरुंद रस्ते वाढते प्रचंड अतिक्रमण दुकाने फेरीवाले विक्रेते यामुळे अरुंद होणारी रस्ते यामुळे मंदिर परिसरात वाहनापासुन दर्शनबारी पर्यंत भाविकाना जाणे प्रचंड त्रासदायक जीवघेणे ठरत आहे. लहान मुले, वृद्ध, महिला, आजारी व्यक्ती यांचे तर या गर्दीमध्ये प्रचंड हाल होत आहेत. यामुळे दिवसेंदिवस वटवृक्ष स्वामी मंदिर परिसर, मैंदर्गी रस्ता, फत्तेसिंह चौक, बाह्य वळण रस्ता, मंगरुळे चौक , माणिक पेठ रस्ता आदि भागात प्रचंड वाहने रस्त्यावर उभी राहत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. यामुळे या भागातून दर्शन बारी रांगेपर्यत भाविकांना जाणे प्रचंड त्रासदायक बनत आहे. यामुळे तातडीने रस्ते रुंद करणे अतिक्रमण काढणे गरजेचे बनले आहे.

## शेततळी लाभार्थी शेतकऱ्यांचेही अडकले ३७ लाख रुपये

### जिल्हा पाणलोट विभागाची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

यंदाच्या आर्थिक वर्षात मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे योजनेसाठी शून्य टक्के निधी वितरित केल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत लेखी उत्तरात दिली. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर राज्यातून ४६ लाख ५८ हजार ३२० लाभार्थ्यांची निवड केली असून, यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील ५६ शेतकऱ्यांचेही ३७ लाख रूपये अडकले असल्याची माहिती सोलापूर जिल्हा पाणलोट विभागाकडून आज (दि. १४) मिळाली.

अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी नागपूरच्या अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. शेतकऱ्यांनी कृषी योजनांतील अनुदानाच्या मागणीकरिता ४८ लाख अर्ज दाखल केले होते. कृषी यंत्रे तसेच अवजारांवर मिळणारे अनुदान, सूक्ष्म सिंचन योजनेतील अनुदान, मुख्यमंत्री कृषी अन्न प्रक्रिया अनुदान, फलोत्पादन योजना, शेततळ्यांसाठी शेतकऱ्यांनी खर्च केलेल्या रकमेसह अनुदान मिळत नसल्याचे निदर्शनास आल्याचे खोडके यांनी लेखी प्रश्नात म्हटले आहे.

कृषी विभागाच्या विविध योजनांसाठी अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद केली आहे. मात्र, वितरणात हात आखडता घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळ्यांसाठी १०० कोटी रुपयांचा निधी अर्थसंकल्पामध्ये मंजूर केला होता. या निधीला प्रशासकीय मान्यता आहे. मात्र, यातील एकही रुपया वितरित करण्यात आलेला नाही, यामुळे राज्यातील शेततळी लाभार्थीधारक शेतकऱ्यांचे पैसे अडकून पडले आहेत.



> मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेसाठी ४०० कोटींपैकी १० कोटी तर भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेसाठी १०४ कोटी ५० लाख निधीपैकी ६२ कोटी ७० लाख रुपये वितरित केले आहेत. मुख्यमंत्री कृषी अन्न प्रक्रिया योजनेसाठी ७५ कोटींपैकी ३२ कोटी रुपये तर एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजनेसाठी १७५ कोटी निधीपैकी ६ कोटी निधी वितरित केला आहे. शेततळी धारकांसाठी मात्र एप्रिल ते आजअखेर या चालू आर्थिक वर्षात अजिबात मदत केली नसल्याने शेतकरी बांधवांतून संताप व्यक्त होत आहे.

# निकाल जवळ आल्याने नगरपालिका उमेदवारांची वाढली धाकधुक

### मंगळवेढा नगरपरिषदेसाठी साडे अठ्ठावीस हजार मतदान

### प्रचाराचा धुरळा; २१ डिसेंबरला ठरणार नगर कारभारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. १४ डिसेंबर-**

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मंगळवेढा नगरपालिका आणि अनगर नगरपंचायत यांच्या निवड प्रक्रियेला स्थगिती आदेश दिले होते. आता सुधारित कार्यक्रम ानुसार येथील निवडणूक प्रक्रिया घेतली जाणार आहे. नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांशी संबंधित न्यायालयीन प्रकरणांमुळे अडकलेली निवडणूक आता २० डिसेंबर रोजी होणार असून, राज्य निवडणूक आयोगाने सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. सध्या उमेदवारांनी प्रचारमोहीम सुरू असून, १९ रोजी सायंकाळी या प्रचाराची सांगता होणार आहे. याही उमेदवारांचा दुसऱ्यांदाही होम टु होम प्रचारावरच दणका आहे. मंगळवेढ्याबरोबर सांगोला येथील २ जागांसाठीही निवडणूक होणार आहे. दरम्यान, २ डिसेंबर रोजी झालेले मतदान आणि २० डिसेंबरचे मतदान या दोन्हीचाही निकाल २१ डिसेंबर रोजी असल्याने सर्वांचे लक्ष आता २१ डिसेंबरच्या रविवारकडेच लागले आहे. मतदानाची परीक्षा दिलेल्या उमेदवारांची धाकधुक वाढली आहे.

मंगळवेढा नगराध्यक्षपदाच्या उमेदवारी अर्जांवर एकूण तीन अपील जिल्हा न्यायालयात दाखल झाली होती. या अपिलांवर २७ नोव्हेंबरपर्यंत निर्णय न झाल्याने निवडणूक आयोगाने संपूर्ण निवडणूक प्रक्रिया स्थगित केली होती. जिल्हाधिकाऱ्यांनीही याबाबतची माहिती राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवली होती. यामुळे पूर्वीच्या कार्यक्रमानुसार मतदान २ डिसेंबरला आणि मतमोजणी ३ डिसेंबरला होणार होती. मात्र न्यायालयीन अडथळ्यांमुळे संपूर्ण कार्यक्रम रद्द करावा लागला. सुधारित निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे आता ११ डिसेंबर रोजी चिन्ह वाटप झाले आणि आखाड्यात उतरणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी जाहीर झाली आहे.

या निवडणुकीसाठी २० डिसेंबर रोजी मतदान आणि दुसऱ्याच दिवशी म्हणजे २१ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी होणार आहे. तर २३ डिसेंबरपूर्वी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.

दरम्यान, निकालाचा दिवस जसजसा जवळ येईल तसतशी उभारलेल्या उमेदवारांची धाकुधूक वाढत आहे. काहीजण गेल्या १५ दिवसांपासून धार्मिक स्थळांना भेटी देत धार्मिक विधी करीत करून देवदेवतांना विजयासाठी साकडे घालत आहेत. एकंदरीत, नगरपालिकांसाठी कोण ठरणार बाजीगर हे २१ डिसेंबरलाच कळणार आहे.

## खासगी सावकाराच्या जाचास कंटाळून मेडदमध्ये तरुणाची आत्महत्या

### तिघांविरूध्द गुन्हा, दोघे अटकेत तर एक फरार

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.१४ डिसेंबर-**

खाजगी सावकारांनी व्याजासह पैसे परत देण्यासाठी दिलेल्या त्रासाला कंटाळून तरूणाने आत्म हत्या केल्याची घटना माळशिरस तालुक्यातील मेडद येथे घडली. याप्रकरणी तीन खाजगी सावकारां विरोधात पोलिसात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



माळशिरस पोलीसांच्या माहितीवरून रणजित उर्फ सोन्या श्रीकांत सोनटक्के असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने दि. ६ रोजी राहत्या घरी लोखंडी अँगलला साडीने गळफास घेवून आत्महत्या केली. याप्रकरणी त्याचे काका माणिक बाबूराव सोनटक्के यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार तीन खाजगी सावकार पोपटराव भानुदास लवटे (मेडद), रामचंद्र बबन पांढरे, व अक्षय साठे (रा. नातेपुते) यांच्या विरोधात पोलिसांत दि. डिसेंबर रोजी गुन्हा नोंदवला आहे.

माळशिरस पोलिसांनी तात्काळ गुन्ह्यातील आरोपी पोपटराव लवटे व रामचंद्र पांढरे यांना अटक करून न्यायालयात हजर केले असता दि.१३ ते १५ डिसेंबर तीन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. राम चंद्र पांढरे कोठडीत आहेत. तर पोपट लवटे यांस बीपी वाढल्याने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे. अक्षय साठे फरार आहे. सदर गुन्ह्याचा तपास माळशिरस पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व्ही. सी.दिंडोरे करीत आहेत.